25-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
AJIT/ ST/ D/ 10:00

**(सभापतीस्थानी उप सभापती )**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

**उप सभापती** : सभागृहात सन्माननीय सदस्यांची उपस्थिती देखील कमी दिसते. मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 10.01 वाजता 5 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर )

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ. शी.** :राज्याच्या लोकायुक्तांनी सिकलसेल नियंत्रण संस्था स्थापन करण्याचे आदेश देऊनही त्याची पूर्तता न होणे

**मु. शी.** :राज्याच्या लोकायुक्तांनी सिकलसेल नियंत्रण संस्था स्थापन करण्याचे आदेश देऊनही त्याची पूर्तता न होणे, या संबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"देशातील सिकलसेल आजाराच्या समूळ उच्चाटनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात या आजाराचा समावेश करणे, परंतु विदर्भातील 11 जिल्ह्यांसह 19 जिल्हे प्रभावित करणाऱ्या सिकलसेल आजारावर राज्य शासनाची नियंत्रण संस्थाच स्थापन न होणे, सिकलसेल रुग्णांना केव्हाही व कुठेही उद्‌भवणारा सिकलसेल क्रायसिस टाळण्यासाठी नियमित व ठराविक वेळेत प्रत्येक रुग्णांची आरोग्य तपासणी, जिल्हा रुग्णालय व शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये डे केअर सेंटर, प्रत्येक रुग्णांला विशेष प्रकारची आरोग्य पुस्तिका, उपचार व आरोग्य तपासणीकरिता एसटी प्रवास भाड्यात सवलत, तसेच, या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्यासाठी 90 दिवसांच्या आत सिकलसेल नियंत्रण संस्था स्थापन करण्याचे आदेश राज्याच्या लोकायुक्तांनी 20 एप्रिल, 2011 रोजी देऊनही त्यांची पूर्तता आजतागायत न होणे, शासनाच्या या उदासिन धोरणामुळे सर्वसामान्य जनतेत पसरलेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>निवेदनानंतर</u>

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सिकलसेल हा रोग खऱ्या अर्थाने आयुष्यभर वाहत नेणारा रोग आहे. 1999 मध्ये सिकलसेल आजारावर नियंत्रण ठेवण्याबाबत कार्यवाही सुरु करण्याचे ठरविले. परंतु अद्यापपर्यंत राज्यात सिकलसेलचे किती रुग्ण व वाहक आहेत याचा सर्व्हे झालेला नाही. लोकायुक्तांनी दि.20 एप्रिल, 2011 रोजी सिकलसेल नियंत्रण संस्था स्थापन करण्याबाबतचे आदेश दिले होते. तरी सुध्दा ती संस्था स्थापन न केल्यामुळे शेवटी माननीय राज्यपालांकडे तक्रार करावी लागली. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये नमूद केले आहे की, माननीय राज्यपालांकडे या बाबतचा अहवाल दि.9/5/2013 रोजी पाठविला आहे. 1999 पासून आतापर्यंतचा कालावधी सिकलसेल रुग्णांना त्रास देणारा आहे. लोकायुक्तांनी दि.20 एप्रिल, 2011 रोजी 90 दिवसांच्या आत सिकलसेल नियंत्रण संस्था स्थापन करण्याबाबत आदेश देऊन सुध्दा दि.9 मे, 2013 पर्यंत त्या संदर्भात कार्यवाही का केली नाही ? महोदय, प्रत्येक रुग्णाची विशिष्ट प्रकारची आरोग्य पुस्तिका असावी, असे सांगून सुध्दा अद्यापपर्यंत आरोग्य पुस्तिका ठेवण्यात आलेली नाही. आरोग्य तपासणीसाठी सिकलसेल रुग्णांना एस.टी.प्रवासामध्ये सवलत देण्याचे सांगितले असताना सुध्दा तशा प्रकारची सवलत देण्यात आलेली नाही.

लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "जिल्हा स्तरावर जिल्हा सिकलसेल समन्वयक यांची नेमणूक करण्यात आली आहे. चंद्रपूर येथे् जिल्हा रुग्णालयात सिकलसेल संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी जिल्हा शल्य चिकित्सक व नॅशनल इन्स्टिटय़ूट ऑफ इम्यूनो हिमॅटोलॉजी यांच्यामध्ये करार करण्यात आला असून लवकरच संशोधन केंद्र सुरु करण्यात येत आहे." परंतु अद्यापपर्यंत संशोधन केंद्र देखील सुरु झालेले नाही. कारण आजपावेतो या संदर्भातील सर्व्हेच केलेला नाही. या निमित्ताने माझा प्रश्न आहे की, सिकलसेल नियंत्रण संस्था स्थापन करण्यात इतका कालावधी गेल्यानंतर, किमान आता तरी या बाबी गंभीरतेने करण्यासाठी प्रयत्न करणार आहात काय ? तसेच सिकलसेल रुग्ण आणि वाहक किती आहेत याचा सर्व्हे करुन आकडा निश्चित करण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : महोदय, राज्य सरकार सिकलसेलचा कार्यक्रम अतिशय गंभीरतेने घेत आहे. सिकलसेल आजाराबाबत जनजागृती करण्यात येत आहे, रुग्णांची स्क्रिनिंग, त्यांच्या सोल्युबिलीटी टेस्ट प्राथमिक अरोग्य केंद्राच्या स्तरावर होते. वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण वर्ग घेतले जात आहे. रुग्णांचे इलोक्ट्रोफोरेसिस टेस्टींग व समुपदेशन केले जात आहे. सिकलसेल रुग्ण वाहकांना पिवळे, सिकलसेल रुग्णांना लाल आणि नॉर्मल सिकलसेल रुग्णांना पांढऱ्या रंगाचे अशा प्रकारे वेगवेगळे कार्ड देण्यात येते.

महोदय, स्पेशालिटी ट्रिटमेंटसाटी जिल्हा रुग्णालय किंवा उप जिल्हा रुग्णालयातून उपचार दिले जातात. शिवाय आता सिकलसेल आजाराचा राजीव गांधी योजनेमध्ये सुध्दा समावेश करण्यात आला आहे.

महोदय, माननीय लोकायुक्तांच्या आदेशाबाबत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. मी त्यांना सांगू इच्छिते की, लोकायुक्तांनी जे मुद्दे मांडले होते त्यांची पूर्तता करण्यात आली आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या पूर्ततेबाबत त्यांना कळविण्यात आले आहे. माननीय राज्यपालांकडे सुध्दा त्या बाबतचा अहवाल पाठविण्यात आलेला आहे. या राज्यात 2008 ते 2013 या कालावधीत 20 जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत 72 लाख 94 हजार 260 इतक्या लोकांची तपासणी वा स्क्रीनिंग करण्यात आली आहे. त्यात 1 लाख 4 हजार 298 वाहक आणि 9992 रुग्ण आढळून आलेले आहेत.

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ...

सभापती महोदय, 11 ते 17 डिसेंबर या कालावधीत सिकलसेल सप्ताह आयोजित करण्यात येतो. त्यामध्ये सर्व्हे सुध्दा करण्यात येतो. सन्माननीय सदस्यांनी एस.टी.च्या पासच्या संदर्भात प्रश्न विचारला. खरे तर एस.टी.चा पास देणे खूप आवश्यक आहे असे मला वाटते. खासकरुन जे रुग्ण आहेत त्यांना आणि त्या रुग्णासोबत एखादा त्यांचा कंपेनियन असेल त्या संदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळासाठी तयार करण्यात आलेला आहे आणि लवकरच त्यावर निर्णय होऊन त्यांना एस.टी.चा पास देण्याची सुविधा देण्यात येईल. चंद्रपूर येथील सिकलसेल इन्स्टिटयूट बाबत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला. त्या बाबतीत चंद्रपूरमध्ये जमीन देण्याचा प्रश्न आहे. जमीन दिली तर केंद्र शासन त्या ठिकाणी ही इन्स्टिटयूट सुरु करु शकते. त्या इन्स्टिटयूटमध्ये प्री-डायग्नोस्टीक रिलेटेड ज्या ॲक्टिव्हीजीज आहेत, त्यामध्ये जेनेटीक्स सुध्दा आहे, ते होणार आहे. जागा देण्याच्या बाबतीत करार करण्यात आलेला आहे. तसे त्यांना कळविले आहे. लवकरच ती संस्था सुरु होईल. त्याप्रमाणे नागपूरमध्ये सुध्दा प्री-नेटल डायग्नोस्टीक सेंटरसाठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या डीएमईआरकडे 60 लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत. लवकरात लवकर ही इन्स्टिटयूट सुध्दा सुरु होणार आहे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अतिशय गंभीर विषयावर ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे. उत्तरामध्ये प्रशासन असे म्हणते की, 2008 ते 2013 या कालावधीमध्ये 20 जिल्ह्यात 72 लाख 94 हजार म्हणजे जवळजवळ 73 लाख लोकांची चाचणी करण्यात आली. त्यामध्ये सिकलसेलच्या आजाराच्या संदर्भात सोल्युबिलिटी टेस्ट वगैरे केल्यानंतर 1 लाख 4 हजार एवढे वाहक सापडले. म्हणजे चाचणी केलेल्यांपैकी जवळजवळ 18 ते 19 टक्के वाहक सापडले आणि जवळजवळ 9 टक्के रुग्ण सापडले. इतका हा गंभीर विषय आहे. मंत्री महोदयांनी उत्तर देताना एस.टी.प्रवास आणि कंपेनियनबाबत बाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर विचारासाठी येणार आहे असे सांगितले. हा प्रस्ताव एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर आणणार का ? चंद्रपूरच्या संदर्भात करार करण्यात आला आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. चंद्रपूरमध्ये ज्या इन्स्टिटयूटच्या संदर्भात करार झाला त्यासाठी राज्य

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार ....

सरकारने बजेटमध्ये काही तरतूद केली आहे का ? आपल्याला लोकआयुक्तांचे आदेश 2011 मध्ये आले आणि आपण चाचणी 2013 मध्ये केली. दोन वर्षाच्या दिरंगाईचे कारण काय आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, एस.टी. बाबतचा प्रस्ताव फास्ट ट्रॅकवर लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर आणण्यात येईल. कदाचित एक महिन्यापेक्षा कमी कालावधीत सुध्दा प्रस्ताव येऊ शकतो. ते आम्ही लवकरात लवकर करु. त्यामध्ये काही अडचण नाही. सन्माननीय सदस्यांनी बजेटच्या संदर्भात प्रश्न विचारला. यासाठी 100 टक्के केंद्र शासनाचे बजेट आहे. आपण जागा दिली तर केंद्र शासन ती संस्था स्थापन करणार आहे. केंद्र शासनाकडून ते करण्यात येईल. त्याच्या बजेट वगैरेची समस्या नाही. नागपूरची जी संस्था आहे त्यासाठी डीएमईआरकडे 60 लाख रुपये दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी दिरंगाईच्या संदर्भात विचारले. यामध्ये दिरंगाईचा प्रश्न नाही. शासन सातत्याने याबाबत अंमलबजावणी करीत आहे. आता 20 जिल्ह्यांमध्ये संपूर्णपणे हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे हा सिकलसेल आजार गरीब आणि त्या खालच्या आर्थिक स्तरावरील लोकांना होणारा आजार आहे. हा आजार एड्सपेक्षाही भयंकर आहे. आपल्याच परिस्थितीमुळे निर्माण होणारा हा आजार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

गेली 2-3 वर्षे माननीय आरोग्य मंत्री श्री.सुरेश शेट्टी आणि माननीय राज्यमंत्री महोदया या विषयाबाबत उत्तर देत असताना लवकरात लवकर, लवकरात लवकर असेच उत्तर देत आहेत. लवकरात लवकर असे उत्तर ऐकूनही 3 वर्षे हा प्रश्न सुटलेला नाही. याचा अर्थ माननीय मंत्री आणि माननीय राज्यमंत्री मंत्रिमंडळाला या प्रश्नाचे महत्व पटवून देण्यात अपयशी ठरलेले आहेत. डिसेंबर, 2012 च्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी यांनी तेव्हाही लवकरात लवकर असे उत्तर दिले होते. त्यावेळी आपण त्यांच्या बाजूला बसला होता. त्यामुळे आज मंत्री महोदयांनी ठराविक तारीख सांगावी. गरीब व झोपडपट्टीतील रहिवाशांना होणारा हा भयंकर आजार आहे. त्यांच्यासाठी सोयी होणे जास्त गरजेचे आहे. राज्यामध्ये एड्सच्या आजारासाठी बाहेरच्या देशातून बराच पैसा खर्च केला जातो. या आजाराबाबत राज्य सरकारने काही तरी केले पाहिजे. मंत्री महोदय, याबाबत ठोस काही करणार आहे का ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने यासंबंधी ठोस कार्यवाही केलेली आहे तेच मी सांगत आहे. शासनामार्फत या आजाराचा निर्मूलन करण्यासाठी अनेक कार्यक्रम राबविले आहेत. त्याचा फायदा अनेक रुग्णांना होत आहे. एस.टी.पासेसबाबत मी यापूर्वीच सांगितले आहे की, एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव जाईल. लोकायुक्तांच्या 11 शिफारशींपैकी 9 शिफारशींवर शासनाने कार्यवाही केली आहे. उर्वरित 2 शिफारशींबाबत कार्यवाही चालू आहे. त्यामुळे शासनाने हा विषय कोठेही सहज घेतलेला नाही किंवा दिरंगाई केलेली नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून मनाला वेदना होत आहेत. या राज्यामध्ये अडीच ते तीन लाख रुग्णवाहक आहेत. परंतु निवेदनामध्ये केवळ 1 लाख 10 हजार रुग्ण वाहक नमूद केलेले आहेत. विदर्भात सर्वात जास्त या आजाराचे रुग्ण आहेत. तरीही तेथे केवळ 1-2 डे केअर सेंटर्स आहेत. या गैरसोयीमुळे त्यांना 20 हजार रुपये खर्च करुन रक्ताची तपासणी करुन घ्यावी लागते. मी दोन महिन्यापूर्वी नागपूर येथे सिकलसेलच्या रुग्णांची बैठक घेतली होती. त्यांनी माझ्यासमोर दु:ख व्यक्त करुन असे सांगितले की, आमच्यासाठी कोणतीही सोय नाही. शासनाच्या डे केअर सेंटरचा ठराविक लोकांना लाभ

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्रीमती शोभा फडणवीस....

दिला जातो. त्यांच्याकडून रिपोर्ट घेतले जातात. आम्ही 3.5 लाख लोक आहोत. त्याची अद्याप शासन दरबारी नोंद नाही. मुंबई व पुणे या ठिकाणी सर्व सोयी केलेल्या आहेत. विदर्भामध्ये हा आजार मोठ्या प्रमाणावर असूनही तेथे आरोग्य पुस्तिका नाही. त्यांच्याकडे जाण्याची काही सोय नाही. प्रत्येक वेळी 20-20 हजार रुपये खर्च करुन रक्त तपासून घेण्याची त्यांची आर्थिक स्थिती नाही. विदर्भात मोठ्या संख्येने हे रुग्ण असल्यामुळे तेथे डे केअर सेंटर्सची संख्या वाढवून त्यामार्फत सर्व सोयी करुन तेथील सिकलसेलच्या रुग्णांची व वाहकांची तपासणी किती दिवसात करणार काय ? लोकायुक्तांनीही शासनाला कंटाळून राज्यपालांना कळविले आहे. शासनाकडून प्रत्येक वेळी आम्ही कार्यवाही केली असे सांगितले जाते. शासनाने कार्यवाही केली असती तर लोकायुक्तांना राज्यपालांकडे तक्रार घेऊन जाण्याची आवश्यकता भासली नसते. सन 2011 मध्ये हा प्रश्न उपस्थित झाला होता. दिनांक 9.5.2013 रोजी शासनाने राज्यपालांना कळविले आहे. गेल्या दोन वर्षापासून हा प्रश्न सोडविलेला नाही. सिकलसेलच्या रुग्णांवर शासन अन्याय करीत आहे. निदान आता तरी दोन महिन्याच्या आत सर्व्हे करुन त्यांना सवलती देण्यासाठी वेगळी व्यवस्था करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने सर्व ठिकाणी या रुग्णांसाठी सोय केलेली आहे. मी याबाबत सभागृहाला माहिती देऊ इच्छिते. त्यानंतर सन्माननीय सदस्यांच्या लक्षात येईल. शासनाने 30 जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : मी वैद्यकीय अधिकाऱ्यांना व वैद्यकीय महाविद्यालयातील लोकांना बोलविले होते. दोन महिन्यांपूर्वी त्यांच्याकडून घेतलेली माहिती मी मंत्री महोदयांना सांगितलेली आहे.

प्रा.फौजिया खान : मी सन्माननीय सदस्यांना माहिती देत आहे. 14 जिल्हा रुग्णालयांमध्ये डे केअर सेंटर्स सुरु केलेली आहेत.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

MSS/ D/ ST/ पूर्वी श्री. खंदार 10:20

प्रा. फौजिया खान...

4 महिला रुग्णालयामध्ये डे-केअर सेंटर सुरु केलेली आहेत. 3363 रुग्णांनी या डे-केअर सेंटरचा लाभ घेतलेला आहे. तसेच ठाणे जिल्हा रुग्णालय, नाशिक जिल्हा रुग्णालय, नंदूरबार जिल्हा रुग्णालय, अमरावती जिल्हा रुग्णालय, गोंदिया जिल्हा रुग्णालय व महिला रुग्णालय, गडचिरोली जिल्हा रुग्णालय, नागपूर जिल्हा रुग्णालय, चंद्रपूर जिल्हा रुग्णालय, भंडारा जिल्हा रुग्णालय, जळगाव जिल्हा रुग्णालय, वाशिम जिल्हा रुग्णालय, अकोला महिला रुग्णालय, बुलढाण जिल्हा रुग्णालय, रायगड जिल्हा रुग्णालय, हिंगोली जिल्हा रुग्णालय या प्रमाणे 18 रुग्णालयामध्ये डे-केअर सेंटर सुरु करण्यात आलेली आहेत. त्याच प्रमाणे 4 मेडिकल कॉलेजेसमध्ये 8 ठिकाणी खास दोन बेडस्ची व्यवस्था केलेली आहे. 147 प्राथमिक आरोग्य केन्द्रोमध्ये सोल्युबिलिटी टेस्टची सुविधा आहे. 238 ग्रामीण रुग्णालयामध्ये रेफरलची सुविधा आहे. 88 ठिकाणी इलेक्ट्रोफॉरेसिसची सुविधा आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या संचालकांच्या अध्यक्षतेखाली सिकलसेलसाठी एक खास कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम अतिशय गांभीर्याने राबविण्यात येत आहे. प्राथमिक आरोग्य केन्द्रापासून जास्तीत जास्त ॲडव्हान्स ट्रीटमेण्ट देण्याची जबाबदारी शासनाने घेतलेली आहे आणि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : माननीय मंत्री महोदयांनी 3363 रुग्णांनी डे-केअर सेंटरचा लाभ घेतल्याचे सांगितले. सिकलसेलचे साडेतीन लाख रुग्ण आहेत. इलेक्ट्रोफॉरेसिसची सोय अद्याप जिल्हा रुग्णालयामध्ये झालेली नाही. आपण सर्व मेडिकल ऑफिसर्सची बैठक घ्यावी, त्या बैठकीत रुग्णाना बोलवावे, लोकप्रतिनिधींना बोलवावे आणि या रोगाची संपूर्ण माहिती घ्यावी.विदर्भामध्ये या रोगाचा जास्त प्रादुर्भाव झालेला आहे. मी मेडिकल ऑफिसर्स आणि रुग्णांची मिटींग घेतली आणि त्यामधून मला जी काही माहिती प्राप्त झाली ती मी या ठिकाणी सांगितलेली आहे. मी सांगितलेली माहिती खरी मानून खास विदर्भासाठी, जेथे सिकलसेलचे जास्त रुग्ण आहेत त्याठिकाणी विशेष व्यवस्था करण्यात येईल काय ?

प्रा. फौजिया खान : आदरणीय श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या विषयी आम्हाला खूप आदर आहे. सन्माननीय सदस्य जी माहिती सांगतात ती खरीच असते असे गृहीत धरण्यात येते. ज्या ज्या ठिकाणी गरज आहे त्या त्या ठिकाणी सुविधा देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे विदर्भासाठी यापेक्षा जास्त लक्ष देण्यात येणार आहे.

प्रा. फौजिया खान...

इलेक्ट्रोफॉरेसिसची सुविधा सर्व ग्रामीण रुग्णालयामध्ये, उप ग्रामीण रुग्णालयामध्ये, जिल्हा रुग्णालयामध्ये तसेच मेडिकल कॉलेजेसमध्ये केलेली आहे. 88 ठिकाणी ही सोय करण्यात आलेली आहे. ही सुविधा आणखी वाढविण्याची गरज असेल तर तसे करण्यास शासन तयार आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : आपण मेडिकल ऑफिसर्सची बैठक घेऊन आम्हाला न्याय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

प्रा. फौजिया खान : ठीक आहे.

---

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 2 व 3 संबंधी</u>**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील हे अमरावतीला गेलेले असल्यामुळे त्यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 2 नंतर घेण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 3 च्या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित असणे अपेक्षित आहे.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : परिवहन विभागाने वाहन नोंदणी, परमीट, बॅच, अपील इत्यादीच्या शुल्कात केलेली दुप्पट वाढ

**मु. शी.** : परिवहन विभागाने वाहन नोंदणी, परमीट, बॅच, अपील इत्यादीच्या शुल्कात केलेली दुप्पट वाढ यासंबंधी श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"परिवहन विभागाने दिनांक 15 जुलै, 2013 रोजीपासून वाहन नोंदणी, परमिट, बॅच, अपील यासह विविध प्रकारच्या शुल्कांमध्ये दुप्पट वाढ करणे, यामुळे माल वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या परमिट शुल्कात रुपये 200 वरून 600, खाजगी सेवा देणाऱ्या वाहनांच्या शुल्कात रुपये 200 वरून 400, नॅशनल परमिटमध्ये रुपये 300 वरून 700, तर मिटर तपासणीसाठी रुपये 2000 भरावे लागणार असणे, लायसन्स नुतनीकरणासाठी आता रुपये 200 ऐवजी 500 भरावे लागणार असणे, त्याचप्रमाणे, वाहनांवरील जाहिरात शुल्कापोटी माल वाहतूक करणाऱ्या वाहनावर रुपये 200 वरुन 2000 मोटारींवर रुपये 100 वरुन 1000 रूपये, रिक्षावर रुपये 60 वरून 500 इतके शुल्क वाढविण्यात आले असणे, परिणामी राज्यातील तमाम वाहन चालक, वाहन धारक, प्रवासी यांच्या मनात राज्य शासनाविषयी पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना"

श्री.सचिन अहिर (परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवीत असताना त्यामध्ये दुरुस्ती सूचवू इच्छितो.

निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदातील शेवटच्या ओळीतील "दिनांक 15.07.2013" या ऐवजी "दिनांक 24.07.2013" असे वाचावे.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ ST/ प्रथम श्री.शिगम 10:25

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, सर्वसामान्य गरीब लोकांच्या दृष्टीने अतिशय महत्वाची ही लक्षवेधी सूचना आहे. वाहन नोंदणी, परमीट,बॅच इत्यादी शल्कांमध्ये शासनाने वाढ केलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात शासनाने असे नमूद केले आहे की, 13 वर्षापासून या शुल्कांमध्ये वाढ करण्यात आलेली नव्हती. 13 वर्षे वाढ का करण्यात आली नाही ? 13 वर्षानंतर 200 पट, 400 पट, 800 पट वाढ केलेली आहे. आपण सीटी बसेस अथवा एसटी बसेस यांच्या प्रवासी वाहतुकीच्या दरात 10 टक्के, 20 टक्के, 50 टक्के अशी वाढ करीत असतो. तेवढी वाढ आम्ही समजू शकतो. परंतु या शुल्कांमध्ये 400 आणि 800 पट वाढ केली म्हणजे हा कोठला न्याय आहे ? लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात शासनाने असेही नमूद केले आहे की, या वाढी संदर्भात जनतेच्या हरकती व सूचना मागविल्या होत्या. रिक्षा आणि टॅक्सींना इलेट्रॉनिक मीटर बसविले त्यावेळी तुम्ही सर्व संबंधित संघटनांना बोलावून घेतले होते आणि या बाबतीत चर्चा केली. सदरहू वाढी संदर्भात हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या, त्यावेळी ग्राहक संघटनांना बोलाविण्यात आले होते काय, एखाद्या वाहतूक संघटनेला बोलाविले होते काय? ही वाढ करताना शासनाने कोणत्याही संघटनेला बोलाविले नव्हते. शासनाला एखादा सोयीचा निर्णय घ्यावयाचा असेल तर अशा वेळी सर्वांना बोलाविण्यात येते. त्यांच्याकडून हरकती घेतल्या जातात.

मी या ठिकाणी एक उदाहरण सांगू इच्छितो की, शाळेतील विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसेस संदर्भात हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. शासनाकडे प्राप्त झालेल्या हरकतींमधील किरकोळ अशी एखादी दुसरी हरकत स्वीकारली गेली. बाकीच्या हरकती स्वीकारल्या गेल्या नाहीत. आपल्याला सोयीचे असेल ते सर्व करावयाचे. या ठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे उत्तर दिलेले आहे ते अन्यायकारक आहे असे माझे ठाम मत आहे. शासनाने एका रात्रीत सदरच्या शुल्कांमध्ये 400 पट, 800 पट अशा प्रकारची वाढ केलेली आहे. गरीब रिक्षावाले आणि टॅक्सीवाले यांच्या बाबतीत शासनाने सहानुभूतीने विचार करावा आणि आता जी दरवाढ केलेली आहे, ज्या पटीने दरवाढ केलेली आहे, समजा 800 रुपये दरवाढ केली असेल 50 टक्के दरवाढ कमी केली तर 400 रुपये अशा प्रकारे सर्व शुल्कांमध्ये 50 टक्के दरवाढ कमी करण्यात येईल काय ?

2...

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये स्पष्ट केले आहे की, ही दरवाढ काही अचानक केलेली नाही. 13 वर्षे शासन दरबारी हा विषय प्रलंबित होता. गेल्या वर्षभरात सदर प्रस्तावाच्या बाबतीत पाठपुरावा केल्यानंतर त्यास शासनाने मान्यता देण्याची भूमिका घेतली. दिनांक 7.12.2012 रोजी या संदर्भात अधिसूचना काढून सजेशन-ऑब्जेक्शन मागविल्या होत्या, त्यासाठी एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता. त्या कालावधीत कोणाच्याही हरकती न आल्यामुळे ही दरवाढ केलेली आहे. या सदनाला माहिती असावी म्हणून सांगतो की, परमिटचे विविध प्रकार आहेत, त्यासाठी 15 रुपये शुल्क होते, ते 20 रुपये शुल्क केलेले आहे. काही ठिकाणी 100 शुल्क होते, ते 200 रुपये केलेले आहे. हे दर 5 वर्षानंतर रिव्हाईज होणार आहेत. 3 महिने अथवा 6 महिने किंवा वर्षभरामध्ये पुन्हा हे दर रिव्हाईज होणार नाहीत. ही दर वाढ 5-5 वर्षासाठी लागू केलेली आहे. आपण इतर राज्यांचा रेशो बघितला तर त्या तुलनेत ही जी वाढ केलेली आहे ती खूप कमी आहे. परमीट देण्यासाठी ज्या यंत्रणा आपल्याला वापराव्या लागतात, टोकन वाढ केलेली आहे. 200 पट, 800 पट दरवाढ झाली आहे असे सन्माननीय सदस्यांनी मत व्यक्त केलेले आहे. या बाबतीत सांगू इच्छितो की, ही दरवाढ 13 वर्षानंतर करण्यात आली आहे त्यामुळे अशा प्रकारची आकडेवारी आपल्याला दिसून येत आहे.

ॲड.आशिष शेलार : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. टोकन वाढ करण्यात आली आहे अशा प्रकारची माहिती लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद करण्यात आली आहे. लायसन्स नुतनीकरणासाठी 200 रुपया ऐवजी 500 रुपये शुल्क केले गेले. ही वाढ 13 वर्षानंतर दुप्पटीच्या वर केली आहे. इन्फ्लेशन रेट ऑफ रेशो पकडला तरी तो 10 टक्क्यांचा वर नाही. इन्फ्लेशनचा रेट सुध्दा सरकार दरबारी 10 टक्क्याच्या वर मानला जात नाही. माल वाहतूक करणाऱ्या वाहनास 200 रुपये शुल्क होते ते 2000 रुपये केले. ही वाढ तरी किती तरी पटीने झाली. शासनाने कोणता इन्फ्लेशनचा रेट पकडला? 13 वर्षानंतर दरवाढ करण्याचा निर्णय कोणत्या आधारावर घेतला गेला ?

श्री.सचिन अहिर : आपण इतर राज्यांची तुलना करुन रेशा धरला आहे. आंध्र प्रदेशात हे शुल्क 1 हजार एवढे आहे. कर्नाटक व छत्तीसगड राज्यात 1 हजार रुपये एवढे शुल्क आहे...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4..... श्री.सचिन अहिर .......

त्या व्यतिरिक्त 2000 इतकी वाढ आहे. त्या धर्तीवर आपण 100 रुपयावरुन 200 रुपये इतकी वाढ केली आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, दरवाढीप्रमाणेच आसन क्षमतेचा प्रश्न राज्यात निर्माण झाला आहे. नाशिक आणि अमरावती विभागात आसन क्षमतेमध्ये फरक आहे काय? या दोन्ही विभागात आसन क्षमता किती निश्चित केली आहे?

श्री.सचिन अहिर : सध्या आसन क्षमता रेग्युलर 4 इतकी असून ती 6 पर्यंत वाढविण्याचा शासनाचा विचार आहे.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, मुंबई, नवी मुंबई, ठाणे व पुणे या मोठ्या शहरांमध्ये नागरिकरण वाढल्यामुळे कुटुंबामध्ये एकापेक्षा अधिक वाहने खरेदी करण्याची पध्दत सुरु झाली आहे. काही वाहन कंपन्यांनी वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना बिनव्याजी कर्ज देण्याची योजना सुरु केली आहे. राज्य सरकारच्या परिवहन विभागाकडून भविष्यकाळात प्रती कुटुंब किती वाहने असावीत यावर बंधन घालण्यात येणार आहे काय? वाढत्या नागरिकरणामुळे आणि वाहनांच्या संख्येमुळे रस्ते अपुरे पडू लागले आहेत, नव्याने बांधण्यात येणारे पूल अपुरे पडू लागले आहेत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, हा विषय सेंट्रल ॲक्टच्या संदर्भातील आहे. सन्माननीय सदस्यांनी जी बाब मांडली ती रास्त आहे. वाहनांची वाढती संख्या ही चिंतेची बाब आहे. याचा विचार सेंट्रल ॲक्टमध्ये होत नाही तोपर्यंत राज्य सरकारला काही करता येणार नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मंत्री महोदय अतिशय अभ्यासू आणि कार्यक्षम आहेत. त्यांच्याकडून जनतेला न्याय मिळेल अशी अपेक्षा आहे. माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री महोदयांनी सांगितले की, इतर राज्यातील दराची तुलना करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, मागील 13 वर्षात महागाई निर्देशांकात वाढ झाली असल्यामुळे दरवाढ करण्यात आली. लेखी निवेदनातील उत्तर आणि सभागृहातील तोंडी उत्तरामध्ये विसंगती दिसून येते. मंत्री महोदयांनी म्हटले की, 10 ते 20 पट वाढ केली आहे. पूर्वी परमिट शुल्क किती होते आणि आता किती केले आहे? खाजगी सेवा देणाऱ्या वाहनांचे शुल्क 200 रुपयांवरुन किती वाढविले आहे? नॅशनल परमिट शुल्क पूर्वी किती होते आणि आता किती

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी..........

आहे? मीटर तपासणी शुल्क पूर्वी किती होते आणि आता किती आहे? रिक्षावर जाहिराती लावण्यासंबंधी पूर्वी किती शुल्क होते आणि आता किती आहे? रिक्षावर लावावयाच्या जाहिरातीचे शुल्क पूर्वी 60 रुपये होते ते वाढवून 500 रुपये केले आहे. ही वाढ 800 पट आहे. जे शुल्काचे प्रकार आहेत ते पूर्वी किती होते आणि आता त्यात किती टक्के वाढ झाली आहे? शुल्कामध्ये केलेल्या दरवाढीबाबत शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करुन 50 टक्के कपात करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.

श्री.सचिन अहिर : 13 वर्षानंतर शुल्कामध्ये वाढ केली आहे. शुल्कामध्ये वाढ करीत असताना महागाईचा निर्देशांक बेस धरला असला तरी इतर राज्यातील दराची तुलना करुन त्याचाही आधार घेतला आहे. एकूण 24 प्रकारचे वेगवेगळे परमिट दिले जातात आणि ते पाच वर्षानंतर रिन्यू केले जातात. त्याची माहिती मी पटलावर ठेवू शकतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, दरवाढ 50 टक्के कमी करावी. हा प्रश्न सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीकोनातून जिव्हाळ्याचा असला तरी माननीय सदस्यांच्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला जाईल.

ॲड.आशिष शेलार : सभागृहाच्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणण्याचे वचन मंत्री महोदयांनी दिले आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. निवेदनात म्हटले आहे की, महागाई निर्देशांक कन्सीडर केलेला नाही. इतर राज्यांचे दर कन्सीडर केले आहेत. इतर राज्यात असलेल्या वाहनांची संख्या आणि त्यापासून मिळणारा महसूल, दिल्या जाणाऱ्या सोयी आणि आपल्या राज्यात दिल्या जाणा-या सोयी या संदर्भात तुलनात्मक तक्ता आपल्या सदनाला दिला जाईल काय आणि तो केव्हा दिली जाईल?

श्री.सचिन अहिर : एक महिन्यात दिला जाईल.

-----

नंतर एच 1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील बारा बलुतेदारांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ बनविणे
**मु.शी.** :राज्यातील बारा बलुतेदारांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ बनविण्यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, अशोक उर्फ भाई जगताप,संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयप्रकाश छाजेड ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रात सुतार, लोहार, कुंभार, सोनार, शिंपी, साळी, नाभिक, गुरब, भोईर, परीट, परदेशी, बेलदार इत्यादी जातीचा बारा बलुतेदारांमध्ये समावेश असून आजही या पारंपारिक पध्दतीच्या व्यवसायाच्या माध्यमातून ते स्थानिक समाजाची सेवा करीत असणे, बारा बलुतेदार हे पूर्वीपासून ग्रामीण भागात राहात असले तरी भूमीहीन असून त्यांना दिवसाकाठी मिळालेल्या मोलमजुरीवर उदरनिर्वाह करावा लागत असणे, जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात यांच्या उद्योगधंद्यामध्ये इतरांनी शिरकाव केल्यामुळे काळाच्या ओघात त्यांचे उद्योगधंदे बुडणे, सामाजिक, आर्थिक, व्यवसायिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात हा वर्ग वंशपरंपरेने उपेक्षित व वंचित राहणे, परिणामी बारा बलुतेदार व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या सर्व बाबीं विचारात घेता राज्यातील बारा बलुतेदारांसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापून त्यांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास इत्यादी विविध बाबींमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा उपययोजना."

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना केवळ समाजाशी निगडित नाही तर ग्रामीण भागातील संस्कृतीशी, अर्थव्यवस्थेशी, उद्योग व्यवस्थेशी तसेच समाजातील तळागाळातील घटकांशी निगडित आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, "अमुक जाती, अमुक समाजामध्ये मोडतात त्यामुळे वेगळे महामंडळ केलेले आहे". बारा बलुतेदार हे केवळ जातीशी निगडित नाहीत तर ते ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेशी आणि ग्रामीण भागातील जनतेला विविध सेवा पुरविण्यासाठी शेकडो वर्षापासून कार्यरत असणारा हा वर्ग आहे. हा छोट्या उद्योजकाने आजपर्यंत देशातील ग्रामीण भागामध्ये उद्योगधंदा सुरु ठेवून सामान्य लोकांना न्याय दिलेला आहे. आपण निवेदनात म्हटले आहे की, याच्यासाठी हे महामंडळ केले आहे, "त्याच्यासाठी ते महामंडळ केले आहे". या प्रश्नासंदर्भात बारा बलुतेदारांनी ज्यावेळेस औरंगाबाद येथे मोर्चा काढला होता त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी बारा बलुतेदारांकरिता स्वतंत्र महामंडळ निर्माण करण्यात येईल असे आश्वासन दिले होते.

निवेदनामध्ये म्हटले आहे की, "या महामंडळामध्ये इतक्या जाती समाविष्ट होतात". त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, आपण ज्या जातींचा उल्लेख केलेला आहे व ज्या महामंडळाची नावे दिलेली आहेत त्यापैकी सुतार, लोहार, कुंभार, सोनार, शिंपी, साळी, नाभिक, भोईर, परीट आणि परदेशी या जातीमधील बारा बलुतेदारांपैकी किती लोकांना संबंधित असलेल्या महामंडळामधून कर्ज मिळालेले आहे आणि त्यापैकी किती लोकांनी नवीन उद्योग धंद्यांना सुरुवात केलेली आहे? यासंदर्भातील आकडेवारी काढली तर या बारा बलुतेदारांना पूर्णपणे न्याय मिळत नाही असेच दिसून येईल. बारा बलुतेदारांना न्याय मिळावा व ग्रामीण भागातील उद्योग ग्रामीण भागामध्येच रहावेत यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी बारा बलुतेदारांसाठी स्वतंत्र आर्थिक महामंडळ देण्याचे जे आश्वासन दिले होते त्या नुसार या लोकांना स्वतंत्र महामंडळ दिले जाणार आहे काय ? आपण जे इतर महामंडळ सूचित केलेले आहे त्यामध्ये असणाऱ्या बारा बलुतेदाराच्या जातीपैकी किती जातीना व किती लोकांना आतापर्यंत किती कर्ज मिळालेले आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सुतार, कुंभार, सोनार, शिंपी, नाभिक,गुरव, भोइर, परीट, परदेशी अशा 1350 लाभार्थ्यांना आतापर्यत 19 कोटी 47 लक्ष रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे.

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, बारा बलुतेदारांसाठी आर्थिक महामंडळ केले जाणार आहे काय ? या प्रश्नाचे माननीय मंत्री महोदयांकडून उत्तरच मिळालेले नाही. बारा बलुतेदाराच्या मोर्चामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आर्थिक महामंडळ बनविण्याचे जे आश्वासन दिले होते त्याबाबतीत काय झालेले आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, 8-10 महामंडळाची वेगवेगळया प्रकारे मागणी झालेली आहे. परंतु माझ्या माहिती प्रमाणे सन 2005 पासून एकही नवीन महामंडळ करण्यात येऊ नये अशा प्रकारचा निर्णय झालेला आहे. जी महामंडळे आहेत ती चांगल्या प्रकारे सुरु रहावीत यासाठीच शासनाचा प्रयत्न सुरु आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे बारा बलुतेदारांकडे अधिक लक्ष देऊन त्यांना कर्ज देणे, कर्जामध्ये वाढ करणे तसेच त्यांच्यासाठी अजून काही वेगळया योजना करता येतील काय हे पाहिले जाणार आहे. उदा. लोहार अशा काही विशिष्ट जातींसाठी योजना करुन त्यांना जास्त अर्थसहाय्य देण्याचा प्रयत्न शासन निश्चितपणे करणार आहे.

श्रीमती शोभा फडणवीस :सभापती महोदय, बारा बलुतेदारांचा विषय अतिशय गंभीर आहे. बारा बलुतेदार हे ग्रामीण भागात काम करणारे होते व त्यांची शेतकऱ्यांना मदत होत असे व यावरच बारा बलुतेदारांचे पोट चालत असे. परंतु आपण या बारा बलुतेदारांचे सर्व धंदे बंद केले आहेत. या बारा बलुतेदारांना आता महामंडळाच्या माध्यमातून सुख सोई देऊ लागलो आहोत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

परंतु, ग्रामीण भागात अद्याप पर्यंत कर्ज किंवा अन्य गोष्टी त्यांना मिळालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे माझा एकच प्रश्न आहे. आपण ग्रामीण भागातील गटई कामगारांना स्टॉल देणार होता ते अद्याप पर्यंत त्यांना मिळालेले नाहीत ही बाब खरी आहे काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, गटई कामगार योजने अंतर्गत देणारे स्टॉल हे फक्त चर्मकार समाजाच्या लोकांना तालुका स्तरावर देण्यात येतात. ही योजना मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो की, बारा बलुतेदारांमध्ये चर्मकार बांधव येत नाहीत. गटई कामगारांना स्टॉल देण्यासाठी जागा लागते, त्याच्याकडे लायसेन्स असणे आवश्यक आहे. आता काही महानगरपालिकांनी गटई कामगारांना स्टॉल देण्याचे बॅन केले आहे. ते जर उपलब्ध झाले तर आपण त्यांना स्टॉल देऊ.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, बारा बलुतेदारांना योग्य प्रकारे आर्थिक सहाय्य मिळणे हा या लक्षवेधी सूचने मागचा हेतू आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी महामंडळे स्थापन करण्यात आली आहे असे सांगितले आहे. त्यात बारा बलुतेदारांपैकी अनेक जातींचा समावेश देखील झालेला आहे. परंतु, काही जाती राहून गेल्या असतील तर त्यांच्यासाठी अधिकची तरतूद ते करणार आहेत. आपली जी महामंडळे आहेत त्यांचा कारभार व त्याबद्दलचे प्रश्न हे सभागृहामध्ये वारंवार उपस्थित केले जातात. त्याद्वारे असे लक्षात येते की, आर्थिकदृष्ट्या ही महामंडळे योग्य पद्धतीने चालत नाहीत. त्यामुळे त्यांनाच सपोर्ट करण्यासाठी आपल्याला काही तरी करावे लागते. त्यांचा मूळ प्रश्न सुटलेला नसेल तर या बारा बलुतेदारांचा प्रश्न सुटणार नाही. तेव्हा याबाबत शासनाने जाणीवपूर्वक विचार करून या बारा बलुतेदारांना न्याय दिला पाहिजे. कारण आज खेडेगावातील चित्र देखील बदलले आहे. आता छोट्या गावात सुद्धा नोकियाचे, मोबाईलचे बोर्ड दिसतात. त्यात लिहिलेले असते की, येथे चार्जिंग करून मिळेल, सीम कार्ड मिळेल. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मूळ पाया बारा बलुतेदार आहेत. त्यांना आर्थिक सहकार्य देण्यासाठी एक वेगळी विशेष अभिनव योजना शासन राबविणार आहे काय ? सदर योजना जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बारा बलुतेदारापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, बेलदार आणि लोहार हे भटक्या जमातीमध्ये येतात. त्यांचा समावेश वसंतराव नाईक विकास महामंडळामध्ये आहे. 9 बलुतेदार हे इतर मागासवर्गीय समाजामध्ये येतात. त्यांचा समावेश इतर मागासवर्गीयांसाठी असलेल्या महामंडळामध्ये होतो. त्यासंबंधातील माहिती मी सांगितलेली आहे. या बलुतेदारांवर लक्ष केंद्रीत करण्याच्या दृष्टीने आम्ही विचार करीत आहोत.

ॲड.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेचा अर्थ समजावून घ्यावा. जातीनिहाय महामंडळामध्ये त्याचे वर्गीकरण केले असले तरी या बारा बलुतेदारांचे प्रश्न समोर येत आहेत. ते एकत्र येत आहेत. मोर्चे काढत आहेत, उपोषण करीत आहेत. याचा अर्थ त्यांना न्याय मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. 2005 मध्ये कॅबिनेटने नवीन महामंडळे निर्माण न करण्याचा निर्णय घेतलेला आहे. गेल्या वर्षी काढण्यात आलेल्या मोर्च्याला आदरणीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले आहे. आपण कमीतकमी माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाबाबत कशा प्रकारे पूर्तता करता येईल याबाबत प्रयत्न करणार आहात काय ? याकरिता विशेष विभाग करून या बारा बलुतेदारांना ग्रामीण भागामध्ये कसे ठेवता येईल, तेथे त्यांचे जीवन सुखकारक कसे करता येईल याबाबत विचार करून आपल्या विभागाकडून विशेष योजना सुरू करण्यात येईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिले असेल ते पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सुतार, लोहार, कुंभार, सोनार, शिंपी, साळी, नाभिक हे गावापासून मोठ्या शहरात छोटे दुकान थाटून व्यवसाय करून आपली उपजीविका भागवत असतात. या सर्वांचा शासनाने सर्व्हे करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांना त्या त्या ठिकाणी व्यवसाय करण्यास दिला पाहिजे. मुंबई सारख्या शहरात या बलुतेदारांची दुकाने सर्रासपणे तोडून टाकली जातात व त्यांना व्यवसाय करण्यास बंदी करण्यात येते. तेव्हा त्यांचे दुकान चालविण्यासाठी शासन सहाय्य करू शकेल काय ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, असे काही व्यवसाय शहरामध्ये चालू शकतात. जसे आपण चर्मकार बांधवांसाठी केलेले आहे त्याप्रमाणे त्यांच्यासाठी देखील पुढील काळात तशी व्यवस्था करण्यात येईल.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : प्राध्यापकांनी संप काळातील पगार देण्याची केलेली मागणी

**मु. शी.** : प्राध्यापकांनी संप काळातील पगार देण्याची केलेली मागणी या संबंधी श्री.दिवाकर रावते,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मार्च-एप्रिल, 2013 मध्ये राज्यातील प्राध्यापकांनी संप करणे, सदर संप काळातील प्राध्यापकांना पगार न देण्याचा राज्य शासनाचा निर्णय, या संपकाळातील पगार देण्याची प्राध्यापकांनी आग्रही मागणी करणे, मोठ्या उन्हाळी सुट्टी अगोदर तीन महिने विद्यार्थ्यांना शिकविण्याचे काम न केल्यास सुट्टीचा कालावधी हा पगारासाठी ग्राह्य धरला जाऊ नये असे शासनाचे आदेश/ मार्गदर्शक तत्वे/ सूचना असणे, त्यामुळे संपकाळातील पगार देण्याची प्राध्यापकांची मागणी उचित नसणे, संपकाळातील प्राध्यापकांना पगार दिल्यास अशाच प्रकारची मागणी अन्य विभागातील तसेच खाजगी संस्थेतील संपकरी कर्मचारी/ कामगार यांचेकडून होण्याची भीती असणे, शासनाने प्राध्यापकांच्या संपकाळातील वेतन देण्याच्या मागणीबाबत कडक भूमिका घेण्याची आवश्यकता, या संदर्भात शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. राजेश टोपे ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी संप होतात, शासकीय कर्मचाऱ्यांचे संप होतात, नगरपालिका कर्मचाऱ्यांचे संप होतात. शिक्षकांचे संप होतात. या संपाबाबत तडजोड होते त्यानंतर संपकाळातील गैरहजेरीबाबत नेहमीच सकारात्मक निर्णय घेतला जातो आणि तसे आतापर्यंत घडत आले आहे. महाराष्ट्रामध्ये प्राध्यापकांचा संप गाजला. प्राध्यापकांच्या संपाबाबत मी एक बाब स्पष्ट शब्दात सांगतो की, त्यांचे नेतृत्व अतिशय हेकट पध्दतीने वागत होते. मला प्राध्यापकांचे प्रमुख भेटायले आले त्यावेळी मी त्यांना सांगितले की, आपण विद्यार्थ्यांकरिता प्राध्यापक आहात. विद्यार्थी नसतील तर आपणास प्राध्यापक म्हणून कोणीही मोजणार नाही. आपण विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याचा प्रकार चालविला आहे तो शासनाच्या आणि पालकांच्या दृष्टीने अतिशय गंभीर आहे. आपण संप चालू ठेवावा. परंतु " आम्ही विद्यार्थ्यांचे पेपर्स तपासण्यासाठी पैसे घेणार नाही, विद्यापीठाच्या मोठ्या हॉलमध्ये विद्यार्थ्यांचे पेपर्स तपासून निकाल लावू, आमचे जीवन विद्यार्थ्यांच्या हिताकरिता आहे. तेव्हा आम्ही विद्यार्थ्यांचे हाल होऊ देणार नाही आणि आमचा हक्क सोडणार नाही म्हणून आम्ही संप चालू ठेवू असे शासनास सांगावे." असा सल्ला मी त्यांना दिला. आमच्याकडे चर्चेसाठी आलेल्या सर्व प्राध्यापकांना हा सल्ला पटला, परंतु त्यांच्या नेतृत्वाला तो पटला नाही. त्यांनी असे केले असते तर सरकारला आपले पाऊल मागे घ्यावे लागले असते. कारण विद्यार्थ्यांचे हित आणि प्राध्यापकांच्या मागण्यांसाठी संप असे चित्र दिसले असते.

सभापती महोदय, प्राध्यापकांचा संप मिटावा म्हणून माननीय मंत्री महोदय बैठका घेत होते. आपण सतत आणि सातत्याने प्राध्यापकांचे म्हणणे ऐकून घेतले. मला हेही सांगितले पाहिजे की, हे प्रकरण आपल्या आवाक्याबाहेर जात आहे असे दिसल्यावर आपण आपल्या नेतृत्वाला आदरणीय श्री.शरद पवार यांना त्यामध्ये आणले. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी केंद्र सरकारकडून 1500 कोटी रुपये उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी घेतली. आपले हे सकारात्मक पाऊल होते. आपण घेतलेल्या सकारात्मक भूमिकेला त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्याचे कारण म्हणजे त्यांचे नेतृत्व हेकट होते, प्राध्यापक हेकट नव्हते. हेकट नेतृत्वामुळे संप काळामध्ये विद्यार्थ्यांची ससेहोलपट झाली.

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, माननीय न्यायालयाने सुध्दा या प्रकरणाबाबत सहानुभूतीपूर्वक विचार केला. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "माननीय उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीच्या वेळी संघटनेकडून सदर कालावधीतील वेतन अदा करण्याची मागणी करण्यात आली होती. तथापि, या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने कोणतेही आदेश न देता या बाबत संबंधित समितीशी चर्चा करुन निर्णय घ्यावा असे आदेशात स्पष्ट म्हटले आहे." याचा अर्थ न्यायालयाने सुध्दा सहानुभूतीपूर्वक भूमिका स्वीकारलेली आहे. न्यायालयाने शिक्षकांच्या बाबतीत असलेली सामाजिक बांधिलकी जपली त्याबद्दल न्यायालयाला धन्यवाद देतो. शासनाने देखील अशी बांधिलकी जपण्यास हरकत नाही. कारण या सर्व प्राध्यापकांचे आयुष्य शिक्षणामध्ये आणि विद्यार्थी घडविण्यामध्ये गेलले आहे. जो काही रागलोभ होता तो संपलेला आहे. त्यांच्या वेतनासाठी शासनाने 500 कोटी रुपये जमा केलेले आहेत.

सभापती महोदय, माझी शासनाला विनंती आहे की, प्राध्यापकांच्या संपाचा दोन-तीन महिन्यांचा कालावधी रजेचा करावा. शासनाने त्यांच्या गैरहजेरीचा आदेश काढलेला आहे. तेव्हा त्या संदर्भातील निर्णय शासन आजच जाहीर करणार काय ? प्राध्यापकांना तीन महिन्यांचा पगार दिला नाही तर त्यांच्यावर काय परिस्थिती ओढवेल हे मी वेगळे सांगावयास नको. ही सर्व उच्च मध्यमवर्गीय मंडळी आहेत. निवेदनात शेवटी नमूद केले आहे की, "शिक्षक संघटनेची बहिष्कार कालावधीतील वेतन अदा करण्याची मागणी उक्त राज्यस्तरावरील तक्रार निवारण समितीच्या विचारार्थ सादर करुन निर्णय घेण्यात येईल." माझा प्रश्न आहे की, आपण हा निर्णय किती कालावधीत घेणार आहात ? शासनाने या संदर्भात आज निर्णय घेतल्यास चांगले होईल. कारण या गोष्टींस खूप दिवस झालेले आहेत. समाज घडविणाऱ्या प्राध्यापकांच्या व शिक्षकांच्या बाबतीत एक चांगला संदेश जाईल अशी विनंती आहे. तेव्हा प्राध्यापकांना संपकाळातील पगार देण्याबाबत माननीय मंत्री महोदय आजच निर्णय घेणार काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्राध्यापकांशी संबंधित असलेल्या जिव्हाळ्याच्या विषयावर लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. मी आपल्या माध्यमातून एवढेच सांगू इच्छितो की, प्राध्यापकांनी दोन मुद्यांवर संप केला होता. त्यातील पहिल्या मुद्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, राज्य सरकारने वेतन आयोगाच्या थकबाकीचे 500 कोटी रुपये त्यांना दिलेले आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, प्राध्यापकांना पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी दोन टप्प्यात देण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात 500 कोटी रुपये देण्यात आलेले असल्यामुळे उर्वरित 750 कोटी रुपयांची पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली आहे. ही रक्कम 15 ऑगस्टपूर्वी वितरित केली जाईल. मी पुन्हा एकदा सांगतो की, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची 100 टक्के रक्कम 15 ऑगस्ट पूर्वी देणार आहोत.

महोदय, दुसरा मुद्दा नेट-सेट परीक्षेच्या बाबतीत होता. हा विषय खूप मोठा असल्यामुळे मी त्यावर सविस्तर बोलणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्राध्यापकांच्या संप काळातील पगाराबाबतचा पॉईंटेड प्रश्न विचारलेला आहे. मी त्यांना एवढेच सांगू इच्छितो की, ज्यावेळी प्राध्यापकांनी संप पुकारला होता त्यावेळी राज्य सरकारच्या माध्यमातून संपकरी प्राध्यापकांना सांगण्यात आले होते की, "No work No payment". त्यामुळेच राज्य सरकारने प्राध्यापकांना संप कालावधीतील पेमेंट देऊ नये असा निर्णय घेतला. परंतु माननीय उच्च न्यायालयाने हा विषय मार्गी लावण्यासाठी राज्य सरकारने तक्रार निवारण समिती गठीत करुन व त्या समितीने प्राध्यापकांच्या संघटनेशी चर्चा करुन या बाबत योग्य निर्णय घ्यावा असे सुचविले. न्यायालयाने सुचविल्यानुसार ही समिती आजच गठीत करण्यात येईल. त्या बाबतच्या नस्तीवर माझी सही सुध्दा झाली आहे. ती समिती गठीत करण्याबाबतचा शासन निर्णय आजच निर्गमित करण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत 15 ऑगस्टपूर्वी प्राध्यापकांच्या संघटनांशी चर्चा करुन, या विषयी निर्णय घेतला जाईल.

डॉ.दीपक सावंत : महोदय, माननीय मंत्र्यांनी नेट-सेट परीक्षेच्या बाबतीत बोलण्याचे टाळले. ज्या प्राध्यापकांनी नेट-सेट परीक्षा दिली आणि उत्तीर्ण होऊ शकले नाही असे प्राध्यापक आणि ज्यांनी शिक्षण किंवा प्राध्यापक संघटनांवर अवलंबून राहून ही परीक्षाच दिली नाही ते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

प्राध्यापक असे दोन भाग आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, ज्यांनी नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न केला पंरतु ते उत्तीर्ण होऊ शकले नाही अशा प्राध्यापकांच्या बाबतीत सरकार सहानुभूतीपूर्वक विचार करणार काय ? तसेच प्राध्यापकांच्या संपकालीन वेतनाबाबतची बाब राज्य सरकारने तक्रार निवारण समितीकडे सोपविली आहे. याचाच अर्थ राज्य सरकारने आपल्या डोक्यावरील ओझे तक्रार निवारण समितीच्या डोक्यावर टाकले आहे. त्यामुळे हा प्रश्न निकाली लावण्यासाठी तक्रार निवारण समितीला शासन वेगळे निर्देश देणार आहे काय, त्या समितीचा स्कोप केवळ पगारापुरताच मर्यादित ठेवणार आहात की वाढविणार आहात ?

श्री.राजेश टोपे : महोदय, प्राध्यापकांनी नेट-सेटची परीक्षा देण्यासाठी प्रयत्न करणे हा वेगळा भाग आहे. मुळात नेट-सेटची परीक्षा उत्तीर्ण होणे महत्त्वाचे आहे. जे प्राध्यापक प्रयत्न करुनही उत्तीर्ण झाले नाही त्यांना आणि ज्यांनी परीक्षा दिली नाही त्यांना नियम सारखाच आहे.

तसेच दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, उच्च न्यायालयाने सुचविल्यानुसार तक्रार निवारण समिती गठीत करण्यात येणार आहे. ती समिती शासनाची असणार आहे. ती समिती शासन निर्णयाच्या माध्यमातून गठीत झालेली असेल. या व्यतिरिक्त मंत्रिमंडळाला काही वाटले तर त्या बाबत मंत्रिमंडळाकडून योग्य तो निर्णय घेतला जाईल. परंतु समितीच्या माध्यमातून अगोदर प्राध्यापक संघटनांशी चर्चा करुन त्यांचे काय म्हणणे आहे तसेच त्यावर समिती काय निर्णय घेते हे पहावे लागेल. समितीकडून या विषयाची संपूर्ण तपासणी 15 ऑगस्ट पूर्वी केली जाईल. शेवटी राज्य सरकार सुप्रीम असते. समितीच्या निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यकता वाटल्यास कॅबिनेट स्तरावर निर्णय घेतला जाईल.

श्री.दिवाकर रावते : महोदय, माननीय मंत्र्यांनी तक्रार निवारण समिती 15 ऑगस्टपर्यंत निर्णय घेणार आहे असे सांगून सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु एम.फील आणि एम.ए.पीचडी च्या वेतनश्रेणीबाबत शासनाने दि.27 जून, 2013 रोजी शासन निर्णय काढलेला आहे. त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दि.27 जून, 2013 पासून होणार असल्याचे शासनाने जाहीर केले आहे.

नंतर श्री.बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या उच्चशिक्षितांना आपला हक्क त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून मिळावा ही त्यांची मागणी अयोग्य आहे असे मला वाटत नाही. म्हणून मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, या शासन निर्णयामध्ये योग्य तो बदल करुन प्राध्यापकांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून त्यांना हा लाभ मिळावयास पाहिजे. या संदर्भात आपण सहानुभूतिपूर्वक विचार करणार का ? पोलीस आणि शिक्षकांच्या बाबतीत नेहमीच शासनाने तशा पध्दतीने विचार करावा अशी माझी भूमिका आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्यांच्या मुख्य दोनच मागण्या होत्या. त्यामध्ये एक मागणी ॲरिअर्सच्या संदर्भात होती आणि दुसरी मागणी नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा ग्राह्य धरावी अशी होती. 90 दिवसांचा जो संप झाला तो याच मुद्यासाठी होता की, नियुक्तीच्या दिनांकापासून सेवा ग्राह्य धरावी आणि नियमित करावे अशी त्यांची जी मागणी होती ती मान्य केलेली नाही. शासनाने कॅबिनेटमध्ये विचारपूर्वक निर्णय घेतला. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, 1991, 1992, 1993 या वर्षामध्ये ज्यांच्या नेमणुका झाल्या असतील त्यांचे पगार 50 ते 60 हजार रुपयांपेक्षा जास्त आहेत. कारण त्यांना प्रत्येक वर्षी इन्क्रिमेंट देण्यात आलेले आहेत. परंतु त्यांची सेवा त्या तारखेपासून नियमित करता येणार नाही असा निर्णय कॅबिनेटने घेतलेला आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, कॅबिनेटने विचारपूर्वक निर्णय घेतलेला आहे. विचार न करता देखील कॅबिनेट निर्णय घेते का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, कॅबिनेट विचारपूर्वकच निर्णय घेते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, 1991, 1992 च्या नियुक्तीचा जो विषय आहे त्यामध्ये अशी परिस्थिती आहे की, त्यातील अनेक प्राध्यापक निवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तिवेतनामध्ये फरक पडतो. त्यातील काही प्राध्यापक मृत झाले. त्यांच्या वेतनावरुन त्यांच्या कुटुंबीयांना निवृत्तिवेतन मिळते त्याबाबतचा प्रश्न आहे. यामध्ये 200 ते 250 प्राध्यापकांचा प्रश्न आहे. यामध्ये शासनावर फार मोठा बोजा पडणार आहे असे नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीत जर आपल्या खात्याने या संदर्भात साधकबाधक आकडेवारी दिली असती तर जे प्राध्यापक 1991 पासून एम.फील आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

एम.ए., पी.एचडीसह शिक्षणाचे योगदान देत आहेत त्यांना न्याय देणे आवश्यक आहे. हे मूठभर शिक्षक आहेत. त्यांची संख्या हजारोमध्ये नाही. काही शेकड्यांमध्ये संख्या असलेल्या या शिक्षकांना न्याय देण्याच्या बाबतीत शासन सहानुभूतिपूर्वक विचार का करीत नाही ? काही प्राध्यापक निवृत्त झ ाालेले आहेत. यातील जे प्राध्यापक निवृत्त होऊन स्वर्गवासी झालेले आहेत त्यांच्या कुटुंबीयांना याचा लाभ मिळण्याची शक्यता आहे. हा प्रश्न तेवढ्यापुरता मर्यादित असल्यामुळे पुन्हा या विषयाच्या संदर्भात आपण मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव आणून याबाबत विचार करणार का ? आपण सर्वच शिक्षकांचा आदर करतो आणि तो केलाच पाहिजे. तो आदर लक्षात घेऊन शासन या संदर्भात पुनर्विचार करणार का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ज्या प्राध्यापकांनी सेवेत असताना पी.एचडी केली किंवा नंतर एम.फिल केले त्यांना ते ज्या तारखेला पी.एचडी झाले त्या तारखेपासून त्यांची सेवा नियमित करण्यात आलेली आहे. परंतु ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांचे असे म्हणणे आहे की, या प्राध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून लाभ द्यावा. या बाबतचा प्रस्ताव आम्ही मंत्रिमंडळासमोर घेऊन जात आहोत. हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर घेऊन गेल्यानंतर मंत्रिमंडळ जो निर्णय घेईल तो अंतिम राहील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आदरणीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, या संदर्भामध्ये विचार करण्यासाठी तक्रार निवार समितीचे गठन आजच करणार आहोत. त्या तक्रार निवार समितीची रचना काय असणार आहे, त्यामध्ये कोण प्रतिनिधी असणार आहेत, किती सदस्यांची तक्रार निवारण समिती असणार आहे ? ही तक्रार निवारण समिती प्राध्यापकांच्या फक्त आताच्या तक्रारीच्या संदर्भातच निर्णय घेण्यासाठी आहे की, मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार यापुढे प्राध्यापकांच्या तक्रारी, मागण्या, समस्या या संदर्भात विचारविनिमय किंवा त्याचे निवारण करण्यासाठी कायमस्वरुपी तक्रार निवारण समिती असणार आहे ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माझ्यासमोर शासन निर्णय आहे. या समितीचे अध्यक्ष उच्च व तंत्र शिक्षण मंत्री असतील, माननीय राज्यमंत्री उपाध्यक्ष, या समितीमध्ये एकूण 8 सदस्य आहेत. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, प्रधान सचिव, नियोजन विभाग, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, सह सचिव हे सदस्य सचिव आहेत. ही समिती कायम स्वरुपी राहील. पुढील काळामध्ये कोणत्याही प्राध्यापकांचे कोणतेही प्रश्न असतील त्या प्रश्नांसंबंधी ही समिती योग्य तो निर्णय घेण्याच्या दृष्टीने काम करील.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई उपनगरातील कांदिवली (पश्चिम) येथील न.भू.क्र.128/ए/59/1 या जमिनीवर मुंबई क्रिकेट असोसिएशन प्रस्तावित क्रिकेट ॲकॅडमी मनोरंजन संकुल या खेळाच्या मैदानावर तसेच इतर खेळांच्या मैदानांवर शासनाने विविध प्रकारच्या बांधकामांना दिलेली परवानगी

**मु.शी.**:मुंबई उपनगरातील कांदिवली (पश्चिम) येथील न.भू.क्र.128/ए/59/1 या जमिनीवर मुंबई क्रिकेट असोसिएशन प्रस्तावित क्रिकेट ॲकॅडमी मनोरंजन संकुल या खेळाच्या मैदानावर तसेच इतर खेळांच्या मैदानांवर शासनाने विविध प्रकारच्या बांधकामांना दिलेली परवानगी यासंबंधी श्री.रामदास कदम,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई उपनगरातील कांदिवली (प.) येथील न.भू.क्र.128/ए/59/1 या जमीनीवर मुंबई क्रिकेट असोसिएशन प्रस्तावित क्रिकेट ॲकॅडमी क्रीडा मनोरंजन संकुल, या खेळांच्या मैदानावरील बांधकामाबाबत राज्य शासनाने दिनांक 15 मे, 2000 ते 4 जुलै, 2003 पर्यंत देण्यात आलेली स्थगिती, त्यानंतर दिनांक 7 ऑगस्ट, 2003 ते 1 डिसेंबर, 2007 पर्यंत खेळाच्या मैदानावरील बांधकामावरील स्थगिती उठविणे, व सन 2007 ते आजमितीपर्यंत पुन्हा स्थगिती लागू करण्यात येणे, महानगरपालिकेच्या दिनांक 23 एप्रिल, 2004 च्या ठरावान्वये क्रिकेट ॲकॅडमी क्रीडा मनोरंजन संकुल येथे बांधकाम करण्याकरिता मंजुरी मिळणे, मात्र, त्यानंतर अन्य कोणत्याही खेळाच्या मैदानावरील बांधकामास परवानगी न मिळणे, पी.जी. प्लॉटवर नियमाप्रमाणे 15 टक्के बांधकाम करण्यास परवानगी असताना 23 टक्के बांधकाम करणे, महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे व विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे सदर संस्थेस क्रीडा संकुलात विविध सुखसुविधांसह

3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बांधकामास परवानगी देण्यात येणे, उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मैदानावर कोणतेही बांधकाम करू नये असे आदेश असताना सदर संस्थेने जिमखना/ क्लब क्रीडागार, तरणतलाव, जिम्नॅशियम, एक कार्ड हॉल, तीन रेस्टॉरंट, दोन दारूचे बार, विविध परदेशी खेळांसाठी हॉल अशाप्रकारे 23 टक्के बांधकाम करणे, मार्गदर्शक नियमावलीप्रमाणे क्लब हाऊसच्या सभासदांकडून सदस्यत्व फी 50,000/- रूपये असे बंधन असतांना या संस्थेने स्थानिकांना किंवा परिसरातील रहिवाश्यांना सभासत्व न देता या संस्थेच्या संलग्न असलेल्या क्लबना सुमारे 7 ते 10 लाखात सभासदत्व बहाल करणे, महापालिकेने काळजीवाहू तत्वावर हा भूखंड दिलेला असतांनाही मैदानाच्या कोणत्याही प्रवेशद्वारावर बृहन्मुंबई महापालिका प्रशासनाचा फलक व बोधचिन्ह लावण्यात न येणे, या संदर्भात शासनाने केलेली व करावयाची तातडीने कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.उदय सामंत ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले असते तर बरे झाले असते. माननीय राज्यमंत्र्यांना माननीय मुख्यमंत्र्यांना बोलविणे शक्य असेल तर बोलवावे अशी मी त्यांना विनंती करतो. कारण या लक्षवेधी सूचनेचा विषय व्यापक आहे. माननीय राज्यमंत्री उत्तर देण्यास सक्षम आहेत. सभापती महोदय, ज्या पध्दतीने शासनाने मुंबई क्रिकेट असोसिएशनला महावीरनगर, कांदिवली येथे परवानगी दिलेली आहे. मला त्यावेळचे मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त व विद्यमान आयुक्त श्री.सीताराम कुंटे यांचा अभिनंदन करणारा ठराव या सभागृहाने एकमताने मंजूर केला पाहिजे. त्यांनी किती तरी मोठे काम केलेले आहे. आदरणीय शिवसेनाप्रमुखांचा शिवाजीपार्क येथे अंत्यविधी झाला होता. त्यासबंधी आमची अशी मागणी होती की, 30 x 40 या साईजचा छोटासा बगिचा व मातीचा चबुतरा बांधण्याची परवानगी द्यावी. तो चबुतरा बांधत असताना पर्यावरणाची हानी होऊ नये याची काळजी घेण्यात येणार होती. परंतु त्या प्रस्तावाबाबत नियमावलीचा काथ्याकुट करण्यात आला. त्यावेळी आम्ही महापौर बंगल्यावर चर्चा करण्यासाठी बसलो होतो. परंतु त्यांना वेळ नव्हता. त्यांची इच्छा दिसली नाही. हा प्रस्ताव दि.5.2.2003 रोजी त्यांच्याकडे आला आणि त्यांनी दि.6.2.2003 रोजी परवानगी दिली. श्री.सीताराम कुंटे त्या रात्री झोपलेच नाही. त्यांनी रात्रभर अधिकाऱ्यांना बोलविले असेल. एका रात्रीत महानगरपालिकेत उलथापालथ झाली. दि.5.2.03 रोजी त्यांच्याकडे पत्र आल्यानंतर दि.6.2.03 रोजी परवानगी देऊन टाकली. शिवसेनाप्रमुखांच्या संदर्भात त्यांच्याकडे वेळ नाही.

मी त्याही पलीकडे सांगतो की, रेसकोर्सच्या जागेवर शिवसेना पक्ष प्रमुख श्री.उध्दव ठाकरे यांनी उद्यान तयार करण्याचा शासनाकडे प्रस्ताव दिलेला आहे. त्या ठिकाणी घोडे नाचविण्यापेक्षा, कोणाची तरी हौस भागविण्यापेक्षा तेथे उद्यान बांधण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. त्या ठिकाणी सबंध मुंबईतून, देशातून, परदेशातून येणाऱ्या पर्यटकांसाठी सुंदर उद्यान बांधण्याचा हा प्रस्ताव आहे. त्यासाठी सरकारकडे वेळ नाही. परंतु एका रात्रीमध्ये मघाशी सांगितल्या प्रमाणे त्यांनी परवानगी दिली. एका रात्रीमध्ये त्या प्रस्तावाची प्रक्रिया कशी पूर्ण करण्यात आली, सायंकाळचे 5 वाजल्यानंतर कोणते अधिकारी कार्यालयात असतात ? प्रस्ताव मागविणे, जागा बघून घेणे, प्रस्ताव नियमात बसते की नाही हे सर्व पाहणे. या सर्व प्रक्रिया पार पाडलेल्या नाहीत. एका रात्रीत परवानगी दिल्यामुळे महानगरपालिकेच्या नियमांचे कशा प्रकारे पालन करण्यात आले त्याचे मला उत्तर पाहिजे.

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये श्री.समीर देसाई यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याचे मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनाने दिलेले उत्तर माझ्याजवळ आहे. त्यात असे नमूद केले आहे की, "दि.8.5.2002 च्या मार्गदर्शक तत्वानुसार दत्तक योजनेंतर्गत सदरचा भूभाग आलेला आहे. याच तत्वावर महानगरपालिकेने आतापर्यंत 79 उद्याने, 70 मनोरंजनाची क्रीडांगणे, 83 क्रीडांगणे निरनिराळ्या संस्थांना दिलेली आहेत."

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

श्री. रामदास कदम पुढे सुरु...

याच नियमाच्या आधारे याही संस्थेला परवानगी दिलेली आहे असे म्हटले आहे ? मुंबई क्रिकेट असोसिएशनला सदरचा भूभाग प्रथम दत्तक तत्वावर देण्याचा निर्णय आणि आता काळजीवाहू तत्वावर देण्याचा प्रस्ताव हा त्या संस्थेच्या क्रिकेट या खेळाच्या विकासामध्ये असणा-या स्थानामुळे सादर करण्यात आलेला आहे. क्रीडा क्षेत्रामध्ये ज्या नामांकित संस्था दर्जेदार कामगिरी पार पाडत आहेत अशा नामांकित संस्थांच्या मदतीने क्रीडांगणाचा विकास आणि त्या माध्यमातून विविध खेळांचा विकास आणि खेळाडूंसाठी प्रशिक्षण सोय करणे या महानगरपालिका प्रशासन अनुकूल आहे यावरुन असे दिसून येईल की महानगरपालिकेचे प्रशासकीय धोरण दुटप्पी नाही. मग तेथे क्रिकट आहे काय ? क्रिकेट खेळण्यासाठी ती जागा देण्याचे मान्य करण्यात आल्यानंतर आता त्या ठिकाणी काय आहे ? त्या ठिकाणी तीन तीन दारुचे बार आहेत, ग्लास आणि बाटल्या आहेत. चायनीज हॉटेलही आहे. पत्ते खेळण्याचा कार्डरुम आहे. मुंबई महानगरपालिकेने 79 लोकांना परवानगी दिली त्या तत्वानुसार तुम्हाला देखील ती द्यायला पाहिजे. अशा पध्दतीने परवानगी दिलेली असेल तर जी संस्था क्रिकेटसाठी प्रख्यात असेल तर त्या संस्थेला क्रिकेटसाठी ती जागा द्या. त्या ठिकाणी आता दारुचे बार आहेत, पत्ते खेळण्यासाठी हॉल आहे. तेथे स्टेडीयम नाही. मी सर्व गोष्टी तेथे जाऊन पाहिलेल्या आहेत. या सर्व गोष्टी कोणत्या नियमामध्ये बसतात.

आपण या आरजी पीजीच्या प्रस्तावाला स्थगिती दिली ती कोणत्या तारखेला दिली, कोणत्या तारखेला ती स्थगिती उठविली ? ही संस्था सोडून कोणकोणेत्या संस्थांना परवानगी दिलेली आहे ? फक्त एकाच संस्थेला परवानगी दिली आणि पुन्हा स्थगिती दिली, अद्याप ती स्थगिती उठवत नाही. आयुक्तांना आता वेळ नाही. आपण आरजी पीजीची पॉलिसी थांबविली. ती पॉलिसी आपणाकडे नसताना महानगरपालिका या क्लबचे टेकओव्हर कसे करणार ? महानगरपालिकेने हा क्लब ताब्यात घेतल्यानंतर पॉलिसी प्रमाणे पुन्हा तो क्लब त्यांना देण्यासाठी जी प्रोसिजर आहे त्यास स्थगिती आहे. मग माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटनाचा घाट कशाला घातला ? या सर्व गोष्टी नियमबाह्य झालेल्या आहेत. त्या ठिकाणी झालेले बांधकाम हे ताज हॉटेलला देखील लाजविल असे झालेले आहे. मराठी माणसाची ती संस्था आहे. पण हॉटेल ती संस्था चालवित नाही. मुंबई महानगरपालिकेने ते त्यांच्या ताब्यात दिले नाही तोपर्यन्त ते एका इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला चालवायला दिलेले आहे. श्री. सिताराम कुंटे यांना बाकीच्या कामाला वेळ नाही. प्रश्न





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

असा आहे की आरजी पीजीच्या पॉलिसीला स्थगिती असल्यामुळे हा क्लब कधी ताब्यात घेणार आहात ? तुमची 33 वर्षाची किंवा 99 वर्षाची जी काही पॉलिसी ठरेल त्यानुसार हा क्लब मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात केव्हा देणार आहात ?

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. रामदास कदम : मी मघाशी विचारल्याप्रमाणे एका रात्रीमध्ये याला परवानगी कशी दिली गेली, स्थगिती उठविल्यानंतर तर हा एकच प्रस्ताव कसा मंजूर झाला ? आरजी पीजीच्या नियमाप्रमाणे 15 टक्के बांधकाम करता येते, त्या ठिकाणी 23 टक्के बांधकाम झालेले आहे. हे बांधकाम डिमॉलिश करुन संबंधितावर कारवाई करणार काय, संस्थेवर गुन्हा दाखल करणार काय, एमआरटीपी ॲक्टखाली कारवाई करण्यात येणार आहे काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी जी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली व त्या अनुषंगाने जे प्रश्न विचारलेले आहेत, त्यांना सविस्तर उत्तरे द्यावयाची आहेत. प्रश्न विचारणारे सदस्य रत्नागिरीचे आहेत, उत्तर देणारे मंत्री देखील रत्नागिरीचे आहेत आणि एमसीएचे अध्यक्ष देखील रत्नागिरीचे आहेत.

**उप सभापती** : मी देखील कोकणातील आहे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, आपण देखील कोकणातील आहात. या बाबतीत सर्व सदस्यांना सविस्तर माहिती होणे गरजेचे आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला की, 128/ए/59/1 हा भूखंड महानगरपालिकेने प्ले ग्राऊंड म्हणून आरक्षित ठेवलेला होता आणि ठेवलेला आहे. त्याचे क्षेत्रफळ 39950.5 स्केअर मीटर एवढे आहे. या ठिकाणी सांगण्यात आले की, एका दिवसात, एका रात्रीत कशी काय परवानगी दिली गेली. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, एमसीएने जी परवानगी मागितलेली होती, ती कोणत्याही बांधकामाची परवानगी नव्हती. त्या जागेवर खेळण्यासाठी आणि प्रॅक्टीस करण्यासाठी परवानगी होती ती ॲडीशनल कमिशनर म्हणून त्यावेळी देण्यात आलेली आहे. परंतु त्यानंतर 2005 च्या जी.बी.च्या ठरावाने महानगरपालिकेचे जे धोरण ठरले होते...

श्री.रामदास कदम : त्यांचे पत्र कोणत्या तारखेस आले आणि कोणत्या तारखेस परवानगी दिली गेली ? एका रात्रीत अशी परवानगी कशी काय देवू शकतात ?

**उप सभापती** : प्रथम सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.उदय सामंत : मी या ठिकाणी सविस्तर घटनाक्रम सांगतो आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी जे प्रश्न विचारले त्याचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये आहे. 2005 च्या जी.बी.च्या ठरावाने जे महानगरपालिका शासनाच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा संकुलाला भूखंड वाटपाचे धोरण ठरवील, त्या अटींना अधीन राहून 2005 ला जी.बी.ची परवानगी देण्यात आली. ती परवानगी देताना काही कंडीशनल ॲप्रूव्हल देण्यात आले. ते ॲप्रूव्हल दिनांक 29.12.2005 रोजी दिले. दिनांक 10.8.2006 रोजी प्लींथपर्यंतचे बांधकाम करण्याची परवानगी महानगरपालिकेने दिली. ही परवानगी देत असताना एमसीएने महानगरपालिकेस लिहून दिले की, या संदर्भात शासनाचे आणि महानगरपालिकेचे जे धोरण ठरेल, त्या सगळया अटींना अधीन राहून

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत..

आम्ही या ठिकाणी बांधकाम करु. सगळया नियमांचे पालन केले जाईल असे एमसीएने अंडर टेकींग दिले. त्यानंतर तेथे घटना घडली की, स्थानिक लोकांनी, स्थानिक लोकप्रतिनिधीं यांनी तक्रारी केल्या की, एमसीएचे बांधकाम योग्य पध्दतीने होत नाही. म्हणून दिनांक 29.12.2009 रोजी हे बांधकाम थांबविण्याचे आदेश पुन्हा महानगरपालिकेने दिले. सदरचे आदेश महानगरपालिकेने दिल्यानंतर एमसीएने शासनाकडे अपील केले. शासनाने या बाबतीत असा निर्णय घेतला की, दिनांक 1.7.2007 ला जी स्थगिती दिलेली आहे, त्याच्या अगोदर महानगरपालिकेचा ठराव असल्याने आणि महानगरपालिकेने कंडीशनल ॲप्रूव्हल दिलेले असल्यामुळे महानगरपालिकेने जो निर्णय दिला होता तो रद्द केला आणि पुन्हा एमसीएला बांधकामाची परवानगी दिली.

सन्माननीय सदस्यांनी विचारले होते की, या ठिकाणी 24 टक्के बांधकाम झाले आहे की 15 टक्के बांधकाम झाले आहे. त्या बाबतीत मी आकडेवारीनिशी सांगतो की, विकास नियंत्रण नियमावली 1991 या वर्षाची आहे. त्याच्यामध्ये 10 टक्के प्लींथपर्यंत बांधकाम करावयाचे असते आणि प्लींथच्या वरील बांधकाम एकूण क्षेत्रफळाच्या 15 टक्के करावयाचे असते. या ठिकाणी 3995.6 चौरस मीटर एवढे बांधकाम करावयाचे होते. त्याच्या अगेन्स एमसीएने 3885.82 चौरस मीटर बांधकाम केलेले आहे. ते बांधकाम 10 टक्क्यांच्या आत झालेले आहे. प्लींथच्या वर 15 टक्के बांधकाम करावयाचे होते, त्याप्रमाणे 5992.59 चौरस मीटर बांधकाम करावयाचे होते. त्याच्या अगेन्स 5883.04 चौरस मीटर एवढे डी.सी.रुलप्रमाणे बांधकाम केलेले आहे. उंचीच्या बाबतीत देखील प्रश्न विचारला गेला आहे. त्याबाबतीत सांगू इच्छितो की, उंची देखील नियमावली प्रमाणे आहे. या संदर्भात हायकोर्टात एक पिटीशन दाखल झाले. हायकोर्टाचे त्यावेळचे न्यायमूर्ती श्री.लोढा साहेबांनी निर्णय दिला की, या ठिकाणची सगळी बांधकामे थांबविण्यात यावीत. त्यानंतर संबंधित व्यक्ती पुन्हा सुप्रीम कोर्टात गेली. हायकोर्टाने जो निर्णय घेतलेला होता, त्यास सुप्रीम कोर्टाने स्थगिती दिली. त्यामुळे ते काम तसेच चालू राहिले. या ठिकाणी स्थानिकांचा प्रश्न आहे.

त्या ठिकाणी काय काय आहे या बाबतीत सन्माननीय सदस्यांकडून विचारणा केली गेली, त्या बाबतीतही सांगू इच्छितो की, या ठिकाणी क्लब हाऊस आहे, तरण तलाव आहे, जिम्नॅशियम आहे, तीन रेस्टॉरंट आहेत, एक समारंभासाठी हॉल केलेला आहे, तेथे बारची देखील परवानगी दिलेली आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 3..... श्री.उदय सामंत......

परंतु ओव्हरऑल बांधकाम 10 टक्के आणि 15 टक्केच्या आधीन राहून नियमावलीप्रमाणे झालेले आहे. अनधिकृत बांधकाम झालेले नाही. स्थानिकांना खेळण्यासाठी संधी देणार का, स्थानिकांना सदस्य करणार का असा प्रश्न विचारला आहे. या संदर्भात महापालिकेचे जे नियम आहेत त्या नियमांची सक्ती एमसीएवर केली जाईल. नियमाप्रमाणे 67 टक्के जागा स्थानिकांना खेळण्याकरिता द्यावी लागते. ती जागा ठेवली आहे. त्यासाठी वेळ ठरवावी लागते. ती वेळ डिस्प्ले करण्याची सक्ती महापालिका करेल. शेवटची सूचना महापालिकेचे बोधचिन्ह वापर करण्याबाबत केली आहे. बोधचिन्हाचा वापर करण्यात आला आहे.

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सभागृहाला सांगू इच्छितो की, यापूर्वी महापालिकेने ज्या ज्या जागा दिलेल्या आहेत, त्या ठिकाणी देखील महापालिकेचे बोधचिन्ह लावण्याची सूचना शासनामार्फत महापालिकेला दिली जाईल. ऑक्यूपेशन सर्टिफिकेट दिल्यानंतर महापालिकेचे जे नियम आहेत त्या नियमांची सक्ती एमसीएवर केली जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यासाठी जेवढा वेळ दिला त्या धर्तीवर मला देखील प्रश्न विचारण्यासाठी आपण अधिक वेळ द्यावा अशी विनंती करतो. सभापती महोदय, मुंबई शहराचा पहिला विकास आराखडा 1967 साली तयार झाला, दुसरा विकास आराखडा 1991 मध्ये तयार झाला. मुंबईमध्ये सध्या 242 उद्याने, 337 मनोरंजन केंद्रे आणि 288 क्रीडांगणे आहेत. मागील 6 वर्षामध्ये आरक्षित भूखंडांच्या 66 खरेदी सूचना मंजूर करुन भूखंड ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला गेला. मात्र महापालिकेने फक्त 2 भूखंड ताब्यात घेतले ही सत्यता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, ताज महाल या हॉटेलच्या वास्तूला लाजवेल असे बांधकाम कांदिवली येथील भूखंडावर झालेले आहे. खरे म्हणजे आपल्या सर्वांना याचा अभिमान वाटला पाहिजे. अशा ठिकाणी ताज महाल हॉटेलला लाजविण्यासारखे बांधकाम होऊ शकते याचा महापालिकेतील सत्ताधाऱ्यांना अभिमान वाटला पाहिजे. अशा सुविधा आपण देऊ शकतो. खेळाच्या विरोधासाठी आपले धोरण असेल याची कल्पना नव्हती. खेळाच्या विरोधाचे धोरण राबविले जाते असे म्हणावे लागेल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.............

सभापती महोदय, क्लब संदर्भात काही मुद्दे मांडले गेले. छोट्या क्लबच्या मेंबरशिपसाठी आपण वारंवार सांगत आहोत. विधानपरिषद सदस्यांना मेंबरशिप द्या. माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण हे प्रत्येक अधिवेशन हा मुद्दा वेगवेगळ्या आयुधाच्या माध्यमातून उपस्थित करीत असतात.

सभापती महोदय, जिमखाना, क्लब क्रीडागार, तरणतलाव, जिम्नॅशियम, एक कार्ड हॉल, तीन रेस्टॉरंट, दोन दारुचे बार, विविध परदेशी खेळांसाठी हॉल या सुविधा नसतील तर तो छोटा क्लब होतो. तेथे कोणाला मेंबरशिप नको असते. कारण तेथे पुरेशा सुविधा नाहीत. महापालिका आयुक्तांनी आणि एमसीएने या सर्व सुविधा देण्याचे काम केले आहे. असे असताना तेथे सुविधा देण्याचे काम का केले अशी भूमिका घेतली जाते. म्हणजे सुविधा नसतील तर का निर्माण केल्या नाहीत आणि सुविधा निर्माण केल्या तर का केल्या ही जी दुटप्पी भूमिका आहे ती मला कळली नाही. मुंबई महापालिकेमध्ये आपला पक्ष सत्तेत असताना अनेक सुविधा निर्माण करुन लोकांना आणखी काय देता येईल याबाबत प्रश्न विचारण्यात आला असता तर म्हणता आले असते की, महापालिकेतील सत्ताधारी लोकांच्या सोयी सुविधांसाठी प्रयत्न करीत आहेत.....(अडथळा).....त्यांनी प्रश्न मांडले आहेत ते मला खोडून काढायचे आहेत...(अडथळा)....

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, त्यांना या लक्षवेधी सूचनेबाबत प्रश्न विचारण्यासाठी मी दहा मिनिटे वेळ दिलेला होता. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर प्रश्न विचारत असताना त्यांना व्यत्यय आणू नये. माननीय सदस्य जे मुद्दे मांडत आहेत ते ऐकून घ्यावेत. सभागृहात एखादे माननीय सदस्य प्रश्न विचारत असतील तर त्यांना कोणी अडथळा आणू नये. गरज भासल्यास पीठासीन अधिकारी म्हणून मी त्यांना थांबवू शकतो.

श्री.किरण पावसकर : मी तुमच्या विरोधातील जास्त काही बोलणार नाही. जेवढे भूखंड खाल्ले ती प्रकरणे काढणार नाही. कला दालनासाठी, संयुक्त महाराष्ट्राच्या आठवणीला उजाळा देण्यासाठी, नेत्यांची स्मृती चिरंतन ठेवण्यासाठी.................

नंतर क्यू.1...

अग्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

जे कलादालन बांधले त्यासाठी 10 कोटी रुपयांची जास्तीची वाढ देण्यात आली असून त्यासाठी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता 52 कोटी रुपयांचे हे कलादालन बांधण्यात आलेले आहे. तरी सुध्दा आम्ही म्हणतो हे कलादालन चांगले आहे. हे कलादालन महाराष्ट्राची एक शान आहे. हे कलादालन उभारतांना नियम डावलून उभारण्यात आलेले असले तरी त्याचा उल्लेख मी येथे करणार नाही. तुमची सगळीच प्रकरणे काढावयास गेलो तर ती भरपूर आहेत. मातोश्री क्लब जागेश्वरी येथे उभारण्यात आलेला आहे. मातोश्री क्लब हाऊसमध्ये सुप्रिमो हॉल आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांना सदस्य म्हणून येथे जे काही सांगावयाचे असेल ते त्यांनी सांगावे त्याबद्दल मला काहीही म्हणावयाचे नाही. सन्माननीय सदस्यांनी कलादालनाचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात ज्यांनी बलिदान केलेले आहे त्यांचा गौरव निर्माण करणारे हे कलादालन असल्यामुळे या कलादालनाची तुलना क्लब बरोबर करण्यात येऊ नये. हे कलादालन महानगरपालिकेच्याच ताब्यात आहे. हुतात्म्यांचा अवमान होऊ नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

**उप सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना मला सांगावयाचे आहे की, आपल्याला जर लक्षवेधी सूचना महत्वाची वाटत असेल तर आपण लक्षवेधी सूचनेवरच बोलावे. लक्षवेधीच्या माध्यमातून कोणाच्याही उखाळया पाखाळया न काढता लक्षवेधी सूचनेवरच बोलावे अशी विनंती आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, कला दालन उभारले गेले ती महाराष्ट्राची शान आहे असे म्हटले होते. परंतु कलादालन उभारत असतांना काही परवानग्या घ्याव्या लागतात त्या परवानग्या न घेता केवळ निवडणुका डोळयासमोर ठेवून हे कलादालन बांधण्यात आलेले आहे. कलादालन बांधतांना नियमांचे उल्लंघन करण्यात आलेले आहे. तरणतलावाची निविदा काढण्यात आल्या नंतर बाजूला कलादालन बांधण्यात आले. परंतु त्याचीही परवानगी घेतली गेली नाही,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

या विषयी मी बोलत आहे. कलादालन ही महाराष्ट्राची शान आहे हे मी या ठिकाणी आवर्जून सांगतो आहे. परंतु कशा पध्दतीने बांधले गेले ते मी या ठिकाणी निदर्शनास आणून देत आहे.

जागेश्वरी येथे मातोश्री क्लब बांधण्यात आलेला आहे. त्यावेळी सांगण्यात आले होते की, गोरगरिबांना कार्यक्रम करण्यासाठी सुप्रिमो हॉल बांधला जाणार आहे. सुप्रिमो हॉल बांधला गेला. या सुप्रिमो हॉलचे आता 12 लाख रुपये भाडे घेतले जाते. त्यामुळे या ठिकाणी कोणता गरीब माणूस कार्यक्रम करु शकणार आहे ? महानगरपालिकेच्या जागा घेऊन अशा पध्दतीने कामे होणार असेल तर कसे चालणार ? या सुप्रिमो हॉलची तुलना आपण एमसीए बरोबर करु या. एमसीए ही काही कोणा एकाची संस्था नाही. एमसीएच्या अध्यक्षपदी माजी मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी सुध्दा होते. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामदास भाई आपण एवढे कडवट आहात, आपण एवढा घाम आणि रक्त गाळले असतांनाही आपल्याला या ठिकाणची मेंबरशिप न मिळता तुमच्या नेत्यांना मिळते, युवराजांना मिळते, त्याच्या पीए ला मिळते, त्यांचे जेवण करणाऱ्याला मिळते परंतु आपल्याला मिळत नाही याचे दु:ख आहे. आपल्याला या ठिकाणची मेंबरशिप मिळावी यासाठी मी विनंती करीन. अंधेरी येथे एक प्रबोधन क्रीडा संकुल आहे तसेच एक प्रबोधन क्रीडा संकुल गोरेगाव येथे आहे. या ठिकाणचे काय नियम आहेत, त्या ठिकाणी कोणते कार्यक्रम होतात ? लहान मुले त्या ठिकाणी मलखांब खेळण्यास जातात तेव्हा त्यांच्याकडून पैसे घेतले जातात, किती पटीने घेतले जातात व हे पैसे कित्येक वर्षापासून घेतले जात आहेत.

सभापती महोदय, दहिसर येथे स्पोर्ट फाऊंडेशन आहे. जर आपण मोर्चा घेऊन कांदिवलीला जाऊ शकता तर दहिसरला का जाऊ शकत नाही ? अंधेरी, गोरेगाव,जोगेश्वरी येथे का जाऊ शकत नाही ? या ठिकाणी जर वर्षानुवर्षे पैसे उकळले जात असेल तर त्यांच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ? मघाशी सन्माननीय सदस्यांनी श्री. देबोशीष चक्रवर्ती तसेच श्री.सिताराम कुंटे यांचे या ठिकाणी नाव घेतले आहे. चांगले अधिकारी असावेत यासाठीच त्यांची नावे घेतली गेली आहेत. परंतु ते यांचे काम करीत नाहीत त्यामुळे त्यांना टार्गेट केले जात आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

टार्गेट करत असताना आपण काय करतो आहोत हे देखील सदनाने लक्षात घ्यायला हवे. पाण्याची चांगली योजना केल्या मुळे आपण शिरपूर पॅटर्न म्हणून ती योजना डोक्यावर घेतली. एमसीए सारखी संस्था चांगले खेळाडू निर्माण करत असेल तर सगळ्या बनणाऱ्या क्लबना आपण एमसीए पॅटर्न लागू करून ते क्लब डोक्यावर का घेत नाहीत ? त्यातून आपण बोध घ्यावा. यातून चांगला उद्देश घेण्या सारखा आहे. शिरपूर पॅटर्न प्रमाणे एमसीए पॅटर्न देखील चालला पाहिजे. कुठलीही संस्था स्वत:च्या पक्षाची, आमदाराची, वैयक्तिक न होता एमसीए सारखी संस्था झाली पाहिजे. त्याप्रमाणे आपण त्यास प्राधान्य देणार आहात काय ? आपण फक्त राजकीय कारण करून त्याचे उद्‌घाटन थांबविले आहे. तेव्हा हे उद्‌घाटन थांबविण्याचे धंदे बंद करून ज्या ज्या क्लबवर अनियमितता झाली आहे त्या क्लबवर शासन कारवाई करणार आहे काय ? एमसीए क्लबचे चांगले काम झाले असेल तर महाराष्ट्रात एमसीए क्लब पॅटर्न राबविण्यात येणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, एमसीए क्लब सोडून बाकीच्या क्लब मध्ये काय काय होत आहे याची माहिती सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी दिलेली आहे. महाराष्ट्र शासना तर्फे क्लबमध्ये काय काय चालते याची तपासणी करून माहिती घेण्यात येईल. सुरूवातीला सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी प्रश्न विचारला की, एमसीएला परवानगी कधी दिली आहे ? एमसीए कडून दिनांक 5.2.2003 रोजी मुंबई महानगरपालिकेला पत्र प्राप्त झाले होते. त्यानुसार दिनांक 22.4.2003 रोजी परवानगी देण्यात आलेली आहे. येथे बांधकाम कसे झालेले आहे हे मी येथे सांगितले आहे. येथे मेंबरशिपसंबंधातील देखील विषय उपस्थित केलेला आहे. मेंबरशिप संबंधी स्थानिकांच्या बाबतीत काय होणार आहे, नगरपालिकांच्या सदस्यांबाबत काय होणार आहे हे देखील मी सांगितले आहे. त्याची फी किती असावी, एमसीएने काय करावे या संबंधातील कुठलेही धोरण महापालिकेकडे तयार नाही. त्यामुळे फी संबंधातील कुठलेही मोजमाप शासन किंवा महानगरपालिका करू शकत नाही. येथे जे बांधकाम झालेले आहे ते नियमाला धरून झालेले आहे. त्यामुळे त्याविरूद्ध कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आरजी/पीजी पॉलिसीला शासनाने स्थगिती दिलेली आहे. ती शासन कधी उठविणार आहे ? शासनाने 7 वर्षे ही स्थगिती ठेवलेली आहे. त्या मागचा शासनाचा नेमका उद्देश काय आहे ? मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. पण महानगरपालिकेला कुठलेही काम करू द्यायचे नाही. सगळे अधिकार आपल्याकडे ठेवायचे, आयुक्त आपल्या ताब्यात ठेवायचे असे धोरण शासनाने स्वीकारले आहे. आयुक्त शौचालयाला जाण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना विचारत नसतील. पण सगळ्या गोष्टी ते जो पर्यंत माननीय मुख्यमंत्र्यांना विचारात नाही तो पर्यंत कुठलाही निर्णय घेत नाही. त्यामुळे ही स्वायत्त संस्था नाही. त्यामुळे कधी कधी संशय येतो की, आयुक्त हे मुख्यमंत्री कार्यालयातील शिपाई आहेत का ? मुंबई महानगरपालिका ही आशिया खंडातील सर्वात मोठी महानगरपालिका आहे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात.)

**उप सभापती** : सर्वांनी सभागृहात शांतता राखावी......

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना बोलण्यासंबंधी वाद नाही. त्यांनी अधिकाऱ्यांबद्दल बोलावे यासंबंधी देखील प्रश्न नाही. माननीय मुख्यमंत्र्यांना विचारल्याशिवाय ते शौचालयाला जात नाही हे कृपा करून रेकॉर्ड वरून काढून टाकवे.

**उप सभापती** : मी आपणास सांगू इच्छितो की, आक्षेपार्ह मजकूर वगळावा हे सांगण्याकरिता उभा राहिलो होतो. आपण सर्वजण एकाच वेळी बोलत असल्यामुळे मला बोलण्याची संधीच मिळाली नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आवश्यक असेल ते ठेवावे, आवश्यक नसेल ते काढून टाकावे. मला काहीही अडचण नाही. मुंबई महागरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. मधल्या काळात शासनाने आदेश दिल्यानंतर मुंबईतील प्रत्येक क्लबची चौकशी झाली. प्रत्येक मैदानाची चौकशी झाली. प्रत्येक मैदानावर, क्लबवर आयुक्तांनी कोणालाही न सांगता, गोपनीय पद्धतीने चौकशीसाठी माणसे पाठविली आणि चौकशी करण्यात आली.

**उप सभापती** : आपली लक्षवेधी सूचना मर्यादित आहे, या लक्षवेधी सूचनेच्या मर्यादेत राहूनच बोलावे अशा प्रकारची विनंती मी सन्माननीय सदस्यांना एकदा नव्हे तर दोनदा, तीनदा केलेली आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी काही लोकांची चौकशी करावी असे सांगितले. शासनास तशी चौकशी करण्यास माझी काही अडचण नाही. जे चुकीचे असेल ते बाहेर येईल्. तसेच त्यांनी "यांना दिले, त्यांना दिले नाही असे सांगितले" ते आपसात भांडण लावत आहेत. तेव्हा हा भाग सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावा अशी माझी विनंती आहे. माझा प्रश्न आहे की, जी स्थगिती दिलेली आहे ती केव्हा उठविण्यात येणार आहे ? माननीय मंत्री हे धडाडीचे आहेत. ते आमच्या कोकणातील आहेत. त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल माझ्या मनात बिल्कूल शंका नाही.

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने प्रश्न विचारावेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझे प्रश्न आहेत की, शासन आरजीपीजीच्या संदर्भातील पॉलिसी किती दिवसांत घेणार आहे, जी स्थगिती दिलेली आहे ती किती दिवसांत उठविणार आहे ? त्या ठिकाणी जी मेम्बरशीप दिलेली आहे ती अन्य क्लबना दिलेली आहे. त्या क्लबना चार-चारचा कोटा दिलेला आहे. एकेका मेम्बरकडून 9-10 लाख रुपये घेतलेले आहेत. मी आपणास सुधार समितीचा ठराव वाचून दाखवितो. "महानगरपालिकेला अशी शिफारस करण्यात येते की, त्याठिकाणी सुविधा विकसित करुन ना नफा ना तोटा तत्त्वावर व्यवस्थापन व देखभाल करणे शक्य होईल. अशा त-हेने महानगरपालिकेचा दिनांक 25 मार्च 1988 चा ठराव क्रमांक 1203 अन्वये विहित केल्यानुसार रुपये पाच हजार मार्गदर्शक तत्त्वानुसार नमूद केल्याप्रमाणे उचित सदस्य शुल्क निश्चित करण्यास सूचनेप्रमाणे मंजुरी देण्यात यावी " म्हणजे महानगरपालिकेने पाच हजार रुपयांचा ठराव केलेला आहे. आता मेम्बरशीपसाठी 9-10 लाख रुपये घेतले जात असतील तर त्या संदर्भात चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करणार काय ? त्या ठिकाणी जी बांधकामे झालेली आहेत ती पुन: तपासून घ्यावीत. आपण चुकीचे उत्तर दिल्यास आपल्यावर हक्कभंगाची सूचना येईल. आपणास महानगरपालिकेच्या आयुक्तांनी चुकीची माहिती दिली असेल तर त्यांच्यावर कारवाई करणार काय ? त्या ठिकाणी शिर्के कंपनीने काम केलेले आहे आणि त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत. मी हवेत कधी बोलत नाही. तेव्हा त्या बांधकामाची पुनर्तपासणी करणार काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, "क्लबमध्ये येण्यासाठी तेथील स्थानिकांना एक ठराविक वेळ निश्चित करुन देण्यात येईल." स्थानिक लोकांना क्लबमध्ये प्रवेश आहे काय, त्यांच्यासाठी रेस्टॉरन्ट खुली असतील काय ? त्याठिकाणी काहीही नाही. मी तेथे जाऊन आलो आहे म्हणून शासनाला अधिकची माहिती देत आहे. माझे प्रश्न आहेत की, तेथील स्थानिकांना कोणत्या भावाने मेम्बरशीप देण्यात येईल, स्थानिकांना आतमध्ये कोठपर्यंत प्रवेश मिळणार आहे ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, बांधकामाच्या संदर्भात मी अगोदर सांगितलेले आहे. तरी सुध्दा पुन: एकदा सांगतो की, नियमावलीप्रमाणे 10 टक्के आणि 15 टक्के प्रमाणे काम झ ालेले आहे. प्लीन्थपर्यंतचे बांधकाम 10 टक्के म्हणजे 3885.82 चौ.मीटर झालेले आहे. प्लीन्थच्या वरील बांधक्ाम 5883.04 बांधकाम झालेले आहे म्हणजे 15 टक्के काम झालेले आहे. ते बांधकाम 24 टक्के झालेले नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्थानिकांच्या बाबतीत जो मुद्दा मांडला त्याबाबत सांगू इच्छितो की, महानगरपालिकेचे 10 टक्के प्राधान्याने मेंबरशीप देण्या संदर्भात जे रुल्स आहेत त्याप्रमाणे तेथील नगरसेवक, कर्मचारी यांना मोफत मेंबरशीप देणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे महानगरपालिका कार्यवाही करणार आहे. परंतु स्थानिकांना त्या क्लबमध्ये जाण्यासाठी किंवा हॉटेल्समध्ये जाण्यासाठी परवानगी देणे हा एमसीएच्या अखत्यारितील विषय आहे. परंतु स्थानिकांना तेथे खेळण्यासाठी 67 टक्क्े जमीन राखून ठेवलेली आहे आणि त्यावर कोणीही बंधन घालू शकत नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : महोदय, या लक्षवेधी सूचनेवर साधक-बाधक चर्चा सुरु आहे. परंतु हा विषय पॉलिसीचा आहे. पॉलिसीचा विषय असताना जो निकष एमसीएला लावला जातो तोच निकष या पॉलिसीखाली दिलेल्या क्लब, मैदानांना लावला पाहिजे. एमसीए मध्ये स्थानिकांना खेळण्यासाठी, वावरण्यासाठी आणि त्याचा उपभोग घेण्यासाठी संधी मिळावी अशी सर्वांची आग्रही मागणी आहे. यापूर्वी देखील अशा प्रकारचा आग्रह दोन्ही सभागृहात धरण्यात आला होता. परंतु त्यात काहीच बदल झाला नाही. एमसीएच्या माध्यमातून ही चर्चा आपल्यासमोर उपस्थित झालेली आहे. मुळात धोरणात्मक असलेला कायदा सर्वांनाच सारखा असला पाहिजे. मुंबईत या धोरणानुसार स्थापन झालेले जेवढे क्लब असतील त्या ठिकाणी स्थानिकांना सदस्यत्व देणार काय, स्थानिकांच्या मुलांना खेळण्यासाठी जागा देणार काय किंबहुना स्थानिकांचा जो अधिकार आहे तो त्यांना देणार काय, अशी सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केली आहे त्याला आमचा देखील पाठिंबा आहे. त्यामुळे माननीय राज्यमंत्र्यांनी मुळमुळीत उत्तर देऊ नये. कारण या लक्षवेधी सूचनेवर 10 वेळा तेच तेच उत्तर आलेले आहे. तसेच या संदर्भातील व्हिजिलन्स आपण कसा करणार आहात ? मी स्पेसिफिक विचारतो की, त्या ठिकाणी स्थानिकांना सुविधा मिळतात अशी माहिती आहे. पॉलिसीचा विषय असल्यामुळे तशाच प्रकारची सुविधा भविष्यात अन्य 89 क्लब्समध्ये स्थानिक रहिवाशांना देणार काय ?

श्री.उदय सामंत : महोदय, पॉलिसीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम व भाई जगताप यांनी सांगितले. शिवाय सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी स्थगितीबाबत सांगितले. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, राज्य सरकारने या पूर्वीच महानगरपालिकेला या संदर्भात स्वत:चे धोरण तयार करण्याबाबत सुचविले होते. त्यानुसार महापालिकेने धोरणाचे प्रारुप राज्य सरकारकडे सादर केले होते. राज्य सरकारने त्या प्रारुपामध्ये अन्य सूचना सुचवून ते धोरण पुन्हा महानगरपालिकेकडे पाठविले होते. त्यानुसार महानगरपालिकेकडून या संदर्भातील धोरण तयार झाले आहे. सध्या ते धोरण सुधार समितीकडे आहे. सुधार समितीकडून ते जी.बी. समोर गेल्यानंतर व जी.बी.ने त्यास मान्यता दिल्यानंतर ते राज्य सरकारकडे येईल. ते धोरण राज्य सरकारला प्राप्त झाल्यानंतर त्या बाबत विचार केला जाईल. दोन महिन्याच्या आत राज्य सरकारकडे ते धोरण येईल. राज्य सरकारकडे धोरण आल्यानंतर शासन त्या अनुषंगाने चांगल्या प्रकारचा निर्णय घेईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत....

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी पूर्वी काही क्लब्सना जागा दिल्याचे सांगितले. कोणकोणत्या क्लब्सना जागा दिलेल्या आहेत त्याची यादी माझ्याकडे आहे. परंतु मी त्या यादीतील नामोल्लेख करण्याचे टाळतो. दिलेल्या जागेपैकी 67 टक्के जमिनीचा वापर स्थानिकांच्या खेळण्यासाठी केला जातो काय, असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. माझ्याकडे असलेल्या यादीवरुन सांगतो की, त्या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असे आहे. महानगरपालिकेने देखील या बाबत शहानिशा केली आहे. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेनुसार पुन्हा एकदा ज्यांना ज्यांना या जागा दिल्या, ते महानगरपालिकेच्या नियमांचे पूर्णपणे पालन करतात काय याची चौकशी निश्चितपणे केली जाईल.

श्री.भाई जगताप : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी अशा प्रकारचा प्रकार होत नाही असे उत्तर दिले आहे. याचाच अर्थ क्लब्सकडून महानगरपालिकेच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे. ज्यांच्याकडून महानगरपालिकेच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

श्री.उदय सामंत : महोदय, या संदर्भात महानगरपालिकेने कारवाई करण्याचा प्रयत्न केला आहे. या मध्ये काही महत्त्वाचे विषय आहेत. त्यामुळे काही क्लब्सनी उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यामुळे कारवाई करण्यासंदर्भातील सर्व प्रक्रिया थांबलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या 89-90 क्लब्स बाबतची सविस्तर यादी तयार केली जाईल आणि ते नियम पाळतात काय याची देखील सखोल चौकशी केली जाईल.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबईच्या या सर्व जागांच्या विषयी, आरजी आणि पीजीच्या विषयी एक पॉलिसी आहे. ही पॉलिसी आल्यानंतर त्याला स्थगिती मिळाली. ही स्थगिती मध्ये उठविली आणि पुन्हा स्थगिती आली. स्थगिती उठविली आणि पुन्हा आली त्या काळात एमसीएला परवानगी मिळाली का ? जर त्या काळात एमसीएला परवानगी मिळाली असेल तर याचे एवढे वैशिष्ट्य काय आहे ? आपण सांगितले त्याप्रमाणे तुम्ही रत्नागिरीचे, श्री. रवी सावंत रत्नागिरीचे, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम रत्नागिरीचे की, तुमचे बॉस श्री. पवार साहेब, त्यांचे बॉस पवार साहेब ... यामध्ये नेमके काय कारण आहे ? (अडथळा) मला यामध्ये राजकारण आणावयाचे नाही. सभापती महोदय, श्री. पवार साहेबांचे नाव मी मागे घेतो. माझे असे म्हणणे आहे की, एमसीएने दुष्काळाला पैसे दिल्याचे आपल्याला आठवते का ? त्यांनी किती पैसे कमावले ? एमसीएने कधी पैसे दिले का ? मी त्यामध्ये जात नाही. हा एक खेळ आहे आणि त्या संदर्भातील ही एक संस्था आहे. काही लोकांना ती संस्था चांगली आहे असे वाटते तर काही लोकांना तसे वाटत नाही. मला त्याबाबत मत व्यक्त करावयाचे नाही. त्यांना ही स्पेशल ट्रिटमेंट मिळाली. स्थगिती उठविली आणि पुन्हा लावली त्या काळामध्ये एमसीएसोबत आणखी कोणत्या संस्थेला परवानगी मिळाली का ? असेल तर त्यांना का आणि नसेल तर यांना का, एवढेच आम्हाला जाणून घ्यावयाचे आहे.

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, मी सर्वप्रथम माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे साहेबांना मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी या ठिकाणी श्री. पवार साहेबांबद्दल उल्लेख केल्यानंतर या संपूर्ण प्रश्नामध्ये कोठेही राजकारण नको म्हणून स्वत:हून श्री. पवार साहेबांचा उल्लेख मागे घेतला. परंतु जी काही स्थगिती उठविलेली होती आणि परत स्थगिती देण्यात आलेली आहे त्या कालावधीमध्ये महानगरपालिकेने आपले या संदर्भातील धोरण देखील फायनल करण्याचा प्रयत्न केला होता आणि तशा पध्दतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. म्हणूनच ती स्थगिती उठविली गेली होती. एमसीएला ही परवानगी देता यावी किंवा एमसीएला काही तरी पाठिंबा देता यावा म्हणून महाराष्ट्र शासनाने ही स्थगिती उठविलेली नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी या विषयाच्या संदर्भात जे प्रश्न उपस्थित केले होते ते अतिशय महत्वाचे होते आणि त्याची उत्तरे मिळणेही आवश्यक होती. जर शासनाने या सर्व बाबी तपासून पाहिल्या असतील, मुंबई महानगरपालिकेने तपासून पाहिल्या असतील तर मला असे वाटते की, योग्य कायदेशीर चौकटीत राहून या सर्व गोष्टी झालेल्या आहेत. त्यामुळे आता सभापती म्हणून त्यांना विनाविलंब या परवानग्या देण्याचे निर्देश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, एमसीएचे प्रपोजल आले आणि त्यांना परवानगी दिली. या अगोदर विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न विचारला. त्यांच्या बरोबर आणखी काही प्रपोजल्स आले होते. त्या प्रपोजल्सला परवानगी न देता केवळ या एका प्रपोजलसाठी स्पेशल केस करण्यात आली. एमसीएच्या बरोबर बाकीचे जे प्रपोजल्स होते त्यांना परवानगी का देण्यात आली नाही ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, आपण एमसीएवरच फार चर्चा करीत आहोत. यामध्ये मी सुरुवातीलाच सांगितले की, 2003 साली पहिली जी परवानगी दिली गेली होती ती नुसती खेळण्यासाठी दिली होती आणि तेव्हापासून एमसीएची मागणी आहे. वैयक्तिक एमसीएला पंधरा दिवसासाठी किंवा दोन महिन्यासाठी स्थगिती उठवून परवानगी देण्यात आलेली नाही. महानगरपालिकेच्या 2005 च्या ठरावापासून ही सर्व प्रोसीजर सुरु आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. स्थगिती उठविली आणि फक्त एकाच प्रस्तावाला मंजुरी दिली आणि पुन्हा स्थगिती आणली. म्हणून मी मघाशी प्रश्न विचारला होता की, या प्रस्तावाच्या अगोदर महानगरपालिकेकडे किती प्रस्ताव आले होते ? त्या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. आपल्या गैरसोयीचे असेल ते आपण टाळता ? आपण लवकर तयार झाला आहात. या प्रस्तावाच्या अगोदरचे बाकीचे प्रस्ताव शिल्लक असताना त्या प्रस्तावांचा विचार न करता फक्त एकाच प्रस्तावाला मान्यता का दिली या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही ते उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे. तसेच या प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर बाकीच्या प्रस्तावांचा विचार न करता पुन्हा स्थगिती का आणली ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, यातील एक प्रश्न महत्वाचा आहे की, जी मागणी केलेली होती ती एमसीएने केली होती. एमसीएची पार्श्वभूमी सर्वांनी या ठिकाणी सांगितली. एमसीए सारख्या संस्थेमधून सचिन तेंडुलकर सारखा खेळाडू जगाला मिळालेला आहे त्यामुळे ही परवानगी देण्यात आली. परंतु एमसीएसाठीच ही बंदी किंवा स्थगिती उठविलेली नव्हती.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, इतरांनी परवानगी मागितली होती का, असेल तर त्यांना का परवानगी दिली नाही ? ही स्थगिती केवळ एम.सी.ए.करिता उठविलेली नाही, असे उत्तर देण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी असा उल्लेख केला होता की, दहिसर येथील फूड फाऊंडेशनला 2 एफएसआय ऐवजी 4 एफएसआय मिळण्यासाठी त्यांनी परवानगी मागितली होती. त्यांना परवानगी दिली नाही ती का दिली नाही ते आम्हाला कळणे भाग आहे.

या लक्षवेधीचे तीन महत्वाचे भाग आहेत. या निवेदनात असे नमूद केले आहे की, "तत्कालीन महापालिका प्रशासनाने दिनांक 22.4.2003 रोजी मुंबईतील क्रीडा असोएिशनला भूखंड देण्याचे पत्र दिले. परंतु या तत्वांतर्गत फक्त भांडार कक्ष आणि पहारेकरी एवढ्यापुरतेच दिले." तेवढीच मान्यता असताना त्या जागेवर पुढचे बांधकाम कोणाच्या परवानगीने व का झाले ? पुढे या निवेदनात असे नमूद केले आहे की,"शासनाचे सदर स्थगिती आदेश असताना देखील मुंबई क्रिकेट असोसिएशनने त्यांच्या क्रीडा संकुलाचे बांधकाम चालू ठेवले" यावरुन या असोसिएशनला असा विश्वास होता की, मी बांधकाम चालू ठेवले तरी माझे काम होणारच आहे. म्हणजे त्यांनी बेकायदेशीर काम चालू ठेवले. दिनांक 29.12.2009 रोजी महानगरपालिकेच्या ते लक्षात आले. त्यामुळे महापालिकेने बांधकाम थांबविण्याचे ठेकेदाराला आदेश दिले. मुळात बेकायदेशीर बांधकाम करणाऱ्या संस्थेची मान्यता रद्द होणे आवश्यक होते हा महत्वाचा मुद्दा आहे. आता सुधार समितीच्या ठरावाचा उल्लेख करण्यात आला आहे. त्या ठरावाच्या अनुषंगाने तेथे काम झालेले नसतानाही महापालिकेचा ठराव रद्द करण्याचे सरकारने आदेश दिले. महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असल्यामुळे तिला काही अधिकार आहेत. महापालिकेने वापरलेले अधिकार बाजूला सारुन तेथे सुरु असलेले बेकायदेशीर बांधकाम शासनाने नियमित केले. याच नियमानुसार मुंबईतील सर्व बांधकामे नियमित केली जाणार आहेत काय ?

या लक्षवेधीच्या निमित्ताने हा प्रश्न निर्माण झाला आहे. बेकायदेशीर बांधकाम नियमित करण्याचा अधिकार नसताना तेथे बेकायदेशीर बांधकाम निर्माण झालेले आहे. त्यांना ज्या अटींवर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

भूखंड देण्यात आला होता त्या अटींचा भंग झालेला असल्यामुळे ते काम तातडीने रद्द झाले पाहिजे. निवेदनात पुढे असे नमूद केले आहे की, "महापालिकेने दिलेल्या इरादा पत्रानुसार 250 चौ.मी.चे उपहारगृह आणि 400 चौ.मी.चा समारंभाचा हॉल बांधण्याचा उल्लेख केलेला आहे." असे असताना सुध्दा 5997 चौ.मी.बांधकाम देय आहे असे सांगण्यात येत आहे. महानगरपालिकेने केलेल्या नियमानुसार त्यांनी बांधकाम केले. याबाबत शासनाने खोडसाळपणे उत्तर दिलेले आहे. शासनाकडून आमची अशी अपेक्षा नाही. शासनाला हे सर्व ठिकाणी लागू करावे लागेल. निवेदनात असे नमूद केले आहे की, "परंतु विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अशी कोणतीही अट क्रीडा संकुलातील बांधकामांच्या सुविधांसंबंधी अंतर्भूत नाही." शासनाचा भूखंड म्हणजे जनतेचा आहे, महापालिकेचा भूखंड म्हणजे जनतेचा भूखंड आहे. तो भूखंड दिल्यानंतर अटींचे पालन करावे लागते. त्यापेक्षा वेगळे काम करता येत नाही. नियमावलीमध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही याचा आधार घेऊन शासनाकडून मान्यता दिली जाते. बेकायदेशीरपणे केलेल्या बांधकाला या शासनाने कोणत्या आधारे मान्यता दिली ? शासनाला अधिकार असले तरी कसेही ते वापरता येतील काय असा माझा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी वारंवार विचारले आहे की, त्या क्लबमध्ये सामान्य माणसांना सभासदत्व दिले जाईल काय ?

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण प्रश्न विचारावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारत आहे. या लक्षवेधीच्या बाहेर जाऊन मी एकही शब्द उच्चारलेला नाही. सदस्यत्वाबाबत निवेदनात असे नमूद केले आहे की, "संकुलातील सुविधा विद्यमान स्थानिक नगरसेवकांना आणि एकदंरित सभासदत्वाच्या 10 टक्के सभासदत्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांना" 10 टक्के सदस्यत्व दिले पाहिजे, हे मला मान्य आहे. 11 टक्क्यांपर्यंत सभासदत्वाची संख्या जाता कामा नये.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ 11:50

श्री. दिवाकर रावते....

त्या भागातील नागरिकांचे अर्ज मागवून सोडत काढून किंवा अन्य पर्यायी मार्ग स्वीकारुन त्यांना सदस्यत्व द्या. त्या भागातील नागकिरांना सदस्यत्व मिळाले पाहिजे. महानगरपालिकेचे कर्मचारी मध्येच कोठून आणले ? ही खाजगी मालमत्ता आहे की जनतेची मालमत्ता आहे ? हा अत्यंत विक्षिप्त असा विषय या ठिकाणी आणलेला आहे. त्या भागातील नागरिकांना सदस्यत्व मिळाले पाहिजे. या बाबतीत शासनाची काय भूमिका आहे ?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबई क्रिकेट असोशिएशनतर्फे वास्तुविशारद यांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला महानगरपालिकेस सादर केला आहे. परंतु काही कागदपत्रांच्या पूर्ततेची कार्यवाही मुंबई क्रिकेट असोशिएशनकडून चालू असून अद्याप सदर संकुलास भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. मग ही कार्यवाही चालू असून उद्घाटनाचा घाट का घातला ? महाराष्ट्राचे मुख्यमंत्री त्या ठिकाणी उद्घाटनासाठी का जाणार होते ? हा सामान्य माणसाचा क्लब आहे काय ? महानगरपालिकेच्या क्रीडांगणावर तिकडच्या भागातील खेळाचा विकास व्हावा यासाठी ते क्रीडांगण आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मला सांगितले की, हे तुमच्या विनंतीमुळे मला त्या क्लबचे सदस्यत्व देतील. पण ते मला परवडणारे नाही.

श्री. उदय सामंत : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, एमसीएला जागा देण्याचा निर्णय हा महानगरपालिकेच्या ठरावाने झालेला आहे. एमसीएला जेव्हा जागा देण्यात आली त्यावेळी दुस-या कोणत्याही संस्थेचा अर्ज आला नव्हता. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की त्या ठिकाणी 240 किंवा 400 चौ.मी.चे बांधकाम झालेले आहे. त्यासंबंधीचे कोणतेही धोरण किंवा नियमावली महानगरपालिकेने अंतिम केलेली नाही. परंतु ते जे बांधकाम आहे ते विकास नियंत्रण नियमावलीखाली झालेले आहे. कुठेही अनधिकृत बांधकाम झालेले नाही. 10 टक्क्याचा जो विषय या ठिकाणी मांडण्यात आला, ते महानगरपालिकेने निर्माण केलेले धोरण आहे. या सर्व गोष्टीमध्ये फक्त भोगवटा प्रमाणपत्र दिलेले नाही. ते प्रलंबित आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे : बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे झालेले असून सर्व अटी व शर्तीची पूर्तता करण्यात आलेली आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. सर्व अटी शर्ती पूर्ण झालेल्या असतील तर ओ.सी. का प्रलंबित ठेवण्यात आलेली आहे ? ही ओ.सी. लवकरात लवकर देण्यात येईल काय ?

श्री. रामदास कदम : तेथील स्थानिक लोकांना सभासदत्व देण्यात येणार आहे काय ? नियमाप्रमाणे 5 लाख रु. घ्यायला पाहिजे. आपण 10 लाख रु. घेत आहात. या क्लबवर कारवाई करणार आहात काय ? मुंबई महानगरपालिकेला बाजूला ठेवून आणि स्थगिती असताना केलेल हे अनधिकृत बांधकाम अधिकृत कसे करण्यात आले ? स्थगिती असताना बांधकामाची परवानगी देता येत नाही. तेथील स्थानिक माणसावर अन्याय होत आहे. भव्य बांधकाम केलेले आहे. 9-10 लाख रुपये घेऊन सदस्यत्व देण्याचा धंदा सुरु केलेला आहे. मुंबई महानगरपालिकेकडे या क्लबचा ताबा न देता उद्घाटन करण्याचे कटकारस्थान केले जात आहे. आम्ही या सर्व प्रकाराचा धिक्कार करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवर 52 मिनिटे चर्चा झालेली आहे. मी दोन्ही बाजूची चर्चा पूर्णपणे ऐकलेली आहे. या चर्चेतून असे दिसून येते की एमसीएने केलेले बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे व मंजूर आराखडया नुसार असल्याने त्यास भोगवटा प्रमाणपत्र देण्याच्या बाबतीत शासनाने मुंबई महापालिकेस सूचना देण्याची कार्यवाही करावी.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बेठक दुपारी 11.54 ते 12.15 पर्यंत स्थगित झाली.)

---

...नंतर श्री. गिते...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**उप सभापती** : आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनात आपले स्थान सर्वोच्च आहे. आपण जो निर्णय घेता त्या निर्णयाबद्दल कधीही प्रतिवाद करावयाचा नसतो ही गोष्ट मला मान्य आहे. आपण लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मघाशी निदेश दिलेत. एखादे काम बेकायदा असेल तर त्याबाबतीत आपण डायरेक्ट निदेश दिले की, तुम्ही हे करुन टाका. माझ्या दृष्टीने तरी तो निदेश अयोग्य वाटतो. ती प्रशासकीय बाब आहे.आपण कायदे बनवितो. तेथे सर्व काही कायद्यानुसारच होणार आहे. यात तुमचा आणि माझा वाद असता कामा नये. लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत शासनाकडून उत्तर आलेले आहे. आपण लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने जे निदेश दिलेत ते योग्य वाटले नाहीत. ही बाब आपल्या निदर्शनास आणून देण्याकरिता मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. आपण दिलेले निदेश योग्य वाटत असतील तर त्याबाबतीत आमचे काही म्हणणे नाही. परंतु ते निदेश अयोग्य वाटले म्हणून ही गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. आता प्रश्नोत्तराचा तास घेण्यात येईल.

--------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

**यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध यंत्रणांची खरेदी प्रलंबित असल्याबाबत**

**(१) * ४२६४८ डॉ.रणजित पाटील, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.प्रवीण पोटे-पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला विविध यंत्रणेच्या खरेदीसाठी २ कोटी २० लाख रुपये जिल्हा नियोजन समितीकडून देण्यात आले असतानाही सदरहू यंत्र खरेदी वैद्यकीय शिक्षण सचिवाच्या मनमानीमुळे प्रलंबित राहिल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०१३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सचिवस्तरीय समितीने यंत्रणेमध्ये तांत्रिक अडचणी दाखवून परवानगी दिली नसल्यामुळे सदर रुपये १ कोटी ५ लाख ६२ हजार एवढा निधी शासनाकडे जमा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लॅप्रोस्कोपी यंत्रणा नसल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन रुग्णांची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित** : (१) हे खरे नाही.

(२) वित्तिय वर्षामध्ये खरेदीची प्रक्रिया संस्था व संचालनालय स्तरावर पूर्ण होणे शक्य नसल्याने निधी शासनाकडे समर्पित करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सन २०१३-१४ साठी संस्थेस मंजूर अनुदानातून सदर यंत्र खरेदी करण्यात येईल.

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला विविध यंत्रणेच्या खरेदीसाठी २ कोटी २० लाख रुपये मंजूर करण्यात

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आले. त्यापैकी १ कोटी ५ लाख ६२ हजार रुपये शासनास समर्पित करण्यात आले. मंजूर झालेला निधी खर्च न करता परत करण्यात आला याबाबतीत ज्या अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा केला आहे, त्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात येईल? ही यंत्रणा खरेदी करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा विविध यंत्रणांची खरेदी करण्यासंबंधीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर टेंडर प्रक्रिया करण्यास सुरुवात केली. यंत्रणांची खरेदी करण्यासंदर्भात प्रथमतः एकच टेंडर आल्याने आपण मुदत वाढवून दिली. पुन्हा दुसऱ्या वेळी टेंडर काढण्यात आले, त्यावेळी देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली, त्यामुळे पुन्हा मुदत वाढवून दिली. त्यानंतर पुन्हा तिसऱ्यांदा टेंडर काढण्यात आले, त्यावेळी तीन टेंडर प्राप्त झाले होते. या टेंडरच्या संदर्भात छाननी करण्यात आली त्यात दोन टेंडर अपात्र ठरले. एक टेंडर शिल्लक होते. त्या टेंडरमध्ये यंत्रणांची किंमत जास्त होती असे इतर सदस्यांचे मत होते. त्या अनुषंगाने तज्ज्ञांची कमिटी बसविली, त्या कमिटीने सांगितले की, आपल्याला जे लॅप्रोस्कोप दाखविण्यात आले, त्याचा दर्जा बरोबर नाही. तसेच त्याची किंमतही जास्त आहे. त्यानंतर पुन्हा दुसरी कमिटी बसविली, त्या कमिटीमध्ये सुध्दा वेगवेगळी मते पडली आणि म्हणून त्यांचे लॅप्रोस्कोप घ्यावयाचे नाहीत अशा प्रकारचा निर्णय घेतला गेला. त्या लॅप्रोस्कोपची किंमत तिप्पट होती, तसेच त्याचा दर्जाही बरोबर नाही असे तज्ज्ञ समितीने मत व्यक्त केल्यामुळे लॅप्रास्क्‍ोप खरेदी केले नाहीत. या वर्षी १ कोटी २० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यातील ६५ लाख रुपये लॅप्रोस्कोप खरेदीसाठी ठेवले आहेत. सदर खरेदीची प्रक्रिया येत्या डिसेंबर, जानेवारी महिन्यांपर्यंत पूर्ण करु.

डॉ.दीपक सावंत : यासाठी दोन तज्ज्ञांच्या समित्या नेमल्या होत्या अशा प्रकारची माहिती माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिली. एखाद्या कंपनीचे एखादे यंत्र पुश करावयाचे असेल तर कंपनीचे प्रतिनिधी आपल्या अधिकाऱ्यांना ॲप्रोच होतात आणि आपलेच स्पेसिफिकेशन त्या यंत्रात ॲड करावयास लावतात. टेंडर डाक्यूमेंटच्या बाबतीत मोस्टली असे होत असते.

यानंतर श्री. भोगले...

अग्रिम प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.42648..... डॉ.दीपक सावंत....

संपूर्ण राज्यासाठी विविध यंत्रे खरेदी करण्याकरिता कायमस्वरुपी एक्स्पर्ट कमिटी नेमण्याचा धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, ज्या मेडिकल कॉलेजकरिता यंत्र खरेदी करावयाचे असते तेथील यंत्र वापरकर्त्यांच्या मर्जीनुसार ते यंत्र खरेदी केले जात होते. आता असा निर्णय घेतला आहे की, राज्य स्तरावर एक समिती नेमून ती समिती कोणते यंत्र खरेदी करायचे हे फायनल करेल. त्याप्रमाणे निश्चितपणे समिती फॉर्म होईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, ज्या पध्दतीने कॉम्प्युटर खरेदी केली जाते त्याचे कॉन्ट्रॅक्ट रेट निश्चित केले आहेत. त्याच धर्तीवर विविध रुग्णालयांकरिता लागणारी यंत्रसामुग्री खरेदी करण्याबाबत कॉन्ट्रॅक्ट रेट निश्चित करुन दिले तर प्रत्येक खरेदीच्या वेळी टेंडर प्रक्रियेमध्ये जो वेळेचा अपव्यय होतो तो टाळता येईल आणि उपलब्ध निधीचा विनियोग तातडीने होऊ शकेल. अशा स्वरुपाची यंत्रणा उभी केली जाईल काय?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, अशी यंत्रणा उभी करण्यामध्ये कोणतीही अडचण नाही. राज्य शासनाकडून वेगवेगळ्या प्रकारची यंत्रे खरेदी केली जातात. त्या यंत्राकरिता लागणारे पार्टस् वेगवेगळे असतात. त्यामुळे खरेदीचे रेट फिक्स करणे कठीण आहे. तसे करता येईल का हे तपासून पाहिले जाईल.

डॉ.सुधीर तांबे : आज वैद्यकीय क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञान आलेले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या वैद्यकीय विद्यार्थ्यांना या नवीन तंत्रज्ञानाचा चांगला सराव होणे गरजेचे आहे. लॅप्रोस्कोपी किंवा इतर यंत्रे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपलब्ध नसतात. म्हणून ससून, बी.जे.मेडिकल कॉलेज आणि इतर महत्वाच्या रुग्णालयांमध्ये आधुनिक यंत्रे तातडीने उपलब्ध करुन दिली जातील काय?

डॉ.विजयकुमार गावीत : आर्थिक परिस्थितीनुसार जे जे काही लवकर उपलब्ध करुन देता येईल ते निश्चितपणे करुन दिले जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : लॅप्रोस्कोपी मशिन नसल्यामुळे भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळाली नाही हे खरे आहे काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42648....

डॉ.विजयकुमार गावीत : लॅप्रोस्कोपी यंत्र आहे. परंतु त्या ठिकाणचे लॅप्रोस्कोपी यंत्र 2007 साली खरेदी केले होते. लॅप्रोस्कोपी यंत्र नाही म्हणून मान्यता मिळाली नाही हे म्हणणे उचित नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने यंत्रसामुग्री खरेदी करण्याकरिता जी प्रक्रिया अंमलात आणली जाणार आहे या प्रक्रियेमधील वेळेचे महत्व निश्चितपणे लक्षात घेतले पाहिजे. कारण ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खरेदीसाठी निश्चित केलेला कालावधी निघून जातो. मध्यंतरीच्या काळात त्या मशिनरीची नवीन आवृत्ती आलेली असते. अशा वेळेला मंजूर झालेली जुनी मशिनरी खरेदी न करता पुरवठादार कंपनीकडून वरच्या श्रेणीतील मशिनरी घ्यावयाची असेल तर बायबॅक पध्दतीने जुने मशिन न घेता नवीन मशिन घेता येईल अशा प्रकारची दुरुस्ती खरेदी प्रक्रियेमध्ये करता येईल का?

डॉ.विजयकुमार गावीत : जुनी मशिन खरेदीचे टेंडर काढले जाते आणि त्याच मशिनचे नवीन मॉडेल बाजारात येते असे होत नाही. सर्वसाधारणपणे त्याच वर्षामध्ये खरेदी प्रक्रिया केली जाते. माननीय सदस्यांनी सूचविलेली बायबॅक पध्दतीची सूचना तपासून पाहिली जाईल. तसे करता येत असेल तर निश्चितपणे करु.

---------

.....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## कोकणातील तिलारी प्रकल्पग्रस्तांना नोकरीऐवजी एकरकमी रक्कम देण्याबाबत

**(२) * ४१८४९ श्री.विनायक राऊत :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील तिलारी प्रकल्पग्रस्तांना नोकरीऐवजी एकरकमी रक्कम देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार तिलारी प्रकल्पाग्रस्तांना अद्यापी एकरकमी नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर मागणीसाठी माहे डिसेंबर, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान धरणग्रस्तांनी कालव्यात बसून बैठे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई त्वरित देण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता** : (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) धरणग्रस्तांनी केलेल्या सदर आंदोलनाचा कालावधी माहे डिसेंबर, २०१२ मधील आहे.
(४) प्रकल्पाग्रस्तांना नोकरीऐवजी एकरकमी अनुदान कशाप्रकारे देण्यात यावे, याबाबत शासनाने गठीत केलेल्या उपसमितीने अहवाल तयार केलेला असून तो आगामी आंतरराज्य नियंत्रण मंडळाच्या बैठकीत निर्णयासाठी सादर करण्यात येणार आहे.

नंतर झेड.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :41849** ......

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तिलारी प्रकल्प हा कोकणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रकल्प आहे. तिलारी प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याविषयीचा हा प्रश्न आहे. पहिला प्रश्न असा विचारण्यात आला आहे की, "कोकणातील तिलारी प्रकल्पग्रस्तांना नोकरीऐवजी एकरकमी रक्कम देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे का ?" या प्रश्नाला "नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. तसेच चवथ्या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आलेले आहे की, "प्रकल्पग्रस्तांना नोकरी ऐवजी एकरकमी अनुदान कशा प्रकारे देण्यात यावे, याबाबत शासनाने गठीत केलेल्या उपसमितीने अहवाल तयार केलेला असून तो आगामी आंतरराज्य नियमंत्रण मंडळाच्या बैठकीत निर्णयासाठी सादर करण्यात येणार आहे". या प्रश्नाला जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामध्ये विरोधाभास आहे. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, या प्रकल्प ग्रस्तांना एकरकमी पैसे देण्यासाठी आपल्या उपसमितीने जो अहवाल तयार केलेला आहे त्यामध्ये एकरकमी पैसे कशा प्रकारे दिले जातील, किती दिले जातील व कधी पर्यंत दिले जाणार आहेत ? तिलारी प्रकल्प हा आंतरराज्यीय प्रकल्प आहे. आपल्या राज्यात तिलारी प्रकल्पाचे किती प्रकल्पग्रस्त आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, तिलारी प्रकल्पाच्या आंतरराज्य नियंत्रण मंडळाची चौथी बैठक दि.8/1/2013 रोजी गोवा येथील पणजीमध्ये झाली होती. या बैठकीमध्ये नोकरी ऐवजी एकरकमी अनुदान देण्यासंदर्भात आपल्या राज्याच्या तसेच गोवा राज्याच्या मंत्र्यांनी सहमती दर्शवल्यानंतर एक उप समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपसमितीच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांना नेमके किती अनुदान दिले जावे यासाठी या उपसमितीची स्थापना करण्यात आली. या उप समितीची पहिली बैठक मुंबई येथे दि.7/2/2013 रोजी झाली व या उप समितीची दुसरी बैठक 20/5/2013 रोजी कोनाळ कट्टा येथे झाली. उप समितीने प्रकल्प बाधितांना एक रकमी अनुदान देण्याच्या संदर्भात अहवाल तयार केलेला आहे. समितीने तयार केलेल्या अहवालानुसार अंतरराज्यीय समितीच्या पाचवी बैठकीत हा अहवाल सादर करण्यात येणार आहे. यामध्ये दोन्ही राज्याच्या मंत्री महोदयांची आवश्यकतेनुसार चर्चा होईल व गरज भासली तर दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांसमवेत जी काही चर्चा होईल व त्यामध्ये ज्या काही सूचना असतील त्या सूचनांची अंमलबजावणी करुन सदर प्रकल्पग्रस्तांना एकरकमी रक्कम देण्याचा निर्णय घेतला जाईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :41849** ......

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, आपल्या राज्याचे जलसंपदा मंत्री माननीय श्री. सुनील तटकरे आणि गोव्याचे जलसंपदा मंत्री श्री.दयानंद मांजरेकर यांची एक बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये एकरकमी रक्कम देण्याच्या संदर्भात 31 मार्च रोजी उच्चस्तरीय समिती नेमण्यात आली. या बैठकीमध्ये नोकरी ऐवजी अनुदान देण्याचे निश्चित झालेले आहे. आता जुलै महिना संपत आलेला असून अद्याप पर्यंत तिलारी प्रकल्पबाधितांच्या संदर्भात काहीही निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रकल्प्रस्तांना आपण कधी पर्यंत अनुदान देणार आहात ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, 31 मार्च रोजी प्रकल्पग्रस्तांना एक रकमी रक्कम देण्यासाठी उप समिती गठीत करण्याचा निर्णय झाला होता व त्या प्रमाणे उप समिती नेमली गेली. प्रकल्पग्रस्तांना एकरकमी रक्कम देण्याच्या संदर्भात उप समितीने अहवाल तयार केलेला आहे. मी गेल्या सात आठ दिवसापासून गोव्याच्या जलसंपदा मंत्री महोदयांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत आहे तसेच त्यांच्या कार्यालयाकडे बैठक लावण्यासंदर्भात पत्रही दिलेले आहे तसेच आजसुध्दा मी त्यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता. येत्या 15/20 दिवसात यासंदर्भातील बैठक निश्चितपणे आयोजित करण्यात येईल. ज्यावेळेस गोवा येथे बैठकीसाठी गेलो होतो त्यावेळी मी गोव्याच्या मुख्यमंत्री महोदयांचीही भेट घेतली होती. तिलारी प्रकल्पग्रस्तांचे जेव्हा आंदोलन सुरु झाले होते तेव्हा माननीय केंद्रीय मंत्री श्री.पवार साहेबांनी आंदोलन कर्त्यांची भेट घेतली होती. त्यावेळेस गोव्यामध्ये पर्यटनाचा हंगाम मोठया प्रमाणात होता असे असतांना त्या ठिकाणी पाणी बंद झाल्यामुळे मोठया प्रमाणात परिणाम होणार होता. यासंदर्भात माननीय पवार साहेबांच्या हस्तक्षेपामुळे गोव्याला पाणी सोडले गेले. मी ज्यावेळेस गोव्याच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की, तुमच्या बैठकीत जो काही निर्णय होईल त्याचा गोव्याच्या सरकारकडून सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल. त्यामुळे ही बैठक येत्या 15/20 दिवसात घेतली जाईल. मघाशी राज्यमंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे कदाचित आवश्यकता वाटली तर गोव्याचे मुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा करुन यासंदर्भातील आवश्यक तो निर्णय प्रकल्पग्रस्तांच्या हिताच्या दृष्टीने घेतला जाईल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41849...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तिलारी प्रकल्पग्रस्त 15 ते 20 दिवस पाण्यामध्ये होते. देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार हे त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना ते स्वत:हून प्रकल्पग्रस्तांना भेटायला गेले ही बातमी आम्ही पेपरमधून वाचली होती. तेव्हा त्यांनी तोडगा काढण्याचा निर्णय घेतला होता. हे आंदोलन करून आता एक वर्षाचा कालावधी गेला आहे. सदर प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणत्या स्तरावर किती वेळा बैठका घेतल्या आहेत व त्यात कोणते निर्णय घेतले आहेत ? प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे धोरण असताना त्यांना नोकरी ऐवजी एकरकमी रक्कम देण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे हे धोरण सर्वव्यापी करण्यात येईल काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझे परममित्र श्री.जयंत पाटील यांनी नेहमी प्रमाणे प्रश्न विचारलेला आहे.

**उप सभापती** : मंत्री महोदय आपल्या उत्तरातील "माझे परममित्र" हा आक्षेपार्ह मजकूर आपण वगळावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, दिनांक 1 जानेवारी 2013 रोजी आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी भेट दिली होती. श्री.शरद पवार साहेब आणि गोव्याचे मुख्यमंत्री श्री.मनोहर पर्रिकर यांची चर्चा झाल्यानंतर आठव्याच दिवशी गोव्याला बैठक घेतली. त्यामुळे यात काही कालखंड केलेला नाही. त्यामुळे यासंबंधी लवकरात लवकर निर्णय होईल. येथे जो दुसरा प्रश्न विचारला आहे ती वस्तुस्थिती खरी आहे. मागे माननीय उपमुख्यमंत्री यांच्याकडे पुनर्वसन विभाग, जलसंपदा विभाग यांची बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये कोयना प्रकल्पग्रस्त किंवा राज्यातील अन्य जे धरणग्रस्त असतील त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीकोनातून विचारविनिमय झाला होता. आपण कायद्याप्रमाणे 5 टक्के धरणग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेऊ शकतो. आपल्याकडे उपलब्ध असलेली रिक्त पदे आणि प्रकल्पग्रस्तांतून 5 टक्के प्रमाणे भरावयाची पदे यांचे प्रमाण व्यस्त आहे. प्रकल्पग्रस्तांचे प्रमाण खूप असल्यामुळे त्यांना एकरकमी अनुदान देऊन कशा पद्धतीने मदत करता येईल याची सविस्तर चर्चा माननीय उप मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये झाली. त्यासंबंधी सहानुभूतीचे धोरण घेण्यासंबंधी शासन प्रयत्नशील आहे.

..2

ता.प्र.क्र.41849...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये दोन बेसिक प्रॉब्लेम आहेत. या विषयासंबंधी श्री.पर्रिकर साहेबांशी चर्चा झाली होती. श्री.शरद पवार साहेब आणि श्री.पर्रिकर गोव्यात ज्या लग्नाला भेटले तेथेही चर्चा झाली. त्या चर्चेच्या वेळी मी प्रत्यक्षात होतो. हा विषय सोडविला पाहिजे. सन 2005 च्या पुनर्वसन कायद्यानुसार मोबदला देण्यात येणार आहे की, सन 1977 च्या पुनर्वसन कायद्यानुसर मोबदला देण्यात येणार आहे हा यातील मुख्य प्रश्न आहे. हा प्रश्न अद्याप सुटत नाही. शेवटी हा आंतरराज्य प्रकल्प आहे. आपण आपला निर्णय घेऊ शकतो. गोवा राज्य हे सन 2005 च्या कायद्यानुसार मोबदला देण्याचे मान्य करणार नाही. कारण त्यांना एकदम मोठा मोबदला द्यावा लागेल. प्रकल्पग्रस्तांना सन 2005 च्या कायद्यानुसार मोबदला पाहिजे आहे. या प्रकल्पात गोवा राज्याचा 77 ते 78 टक्के वाटा असून आपल्या राज्याचा 28 टक्के वाटा आहे. त्यामुळे गोवा राज्य सरकारवर आर्थिक बोजा जास्त पडणार आहे. गोवा राज्य सरकार प्रकल्पग्रस्तांना पैसे देण्यास तयार असून त्यांनी बजेटमध्ये देखील तरतूद केली आहे. गोवा सरकार लगेच पैसे देण्यास तयार देखील आहे. यात वन टाईम सेटलमेंटद्वारे मोबदला दिला जाणार आहे. तो नेमका किती मिळणार आहे ? त्यावर काही तोडगा निघाला आहे काय, असल्यास, तो मोबदला आकस्मिक निधीतून दिल्यास खऱ्या अर्थाने प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळू शकेल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी बाब उपस्थित केली आहे ती खरी आहे. एकूण 1393 प्रकल्पबाधित कुटुंबे आहेत. एकूण 938 प्रकल्पग्रस्तांना दाखले देण्यात आले आहेत. राज्य सरकारने 194 दाखलेधारकांना आणि रोजंदारीवरील 26 दाखलेधारकांना म्हणजे एकूण 220 प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या दिलेल्या आहेत. म्हणजे 23 टक्के प्रकल्पग्रस्तांना आपण शासकीय सेवेत सामावून घेतलेले आहे. काहींना अजूनही सामावून घ्यावयाचे आहे. आपण पुनर्वसनाचे धोरण ठरवू तेव्हा ते सन 2005 च्या कायद्यानुसार ठरवायचे की, सन 1977 च्या कायद्यानुसार ठरवावयचे हे ठरवावे लागेल. यापेक्षा व्यवहारिक मार्ग काढण्याच्या दृष्टीने ही चर्चा होत आहे. माननीय मुख्यमंत्री,गोवा आणि आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांची चर्चा झाली होती. त्या चर्चेमध्ये सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे नक्की झालेले आहे. या बैठकीनंतर मी श्री.पर्रिकर साहेबांची भेट घेतली आहे. त्यांनीही सांगितले की, माझी आणि श्री.पवार साहेब यांची चर्चा झालेली आहे.

यानंतरश्री.अजित....

ता.प्र.क्र. 41849....

श्री.सुनील तटकरे...

आपल्या बैठकीच्या अनुषंगाने जो प्रस्ताव येईल त्यामध्ये गोवा राज्य सुध्दा सहानुभूतीपूर्वक विचार करील. गोवा शासनामध्ये रिक्त पदे नसल्यामुळे व त्यांना या प्रकरणी कायम स्वरुपी तोडगा काढायचा असल्यामुळे तो निर्धारित वेळेत निश्चितपणे काढला जाईल. आपणास निधीची उपलब्धता करुन द्यायची असेल तर माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती करुन सी.एफ.ॲडव्हान्स घेऊन आपल्या राज्याचा हिस्सा लवकर उपलब्ध करुन देण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रकरणी राज्य शासनाने वन टाईम सेटलमेंटचा निर्णय घेतलेला आहे. राज्यातील इतर प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत देखील शासन असेच धोरण घेणार काय ? राज्यासाठी हा धोरणात्मक निर्णय होईल काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, संपूर्ण राज्याकरिता असा निर्णय अजिबात राबविला जाणार नाही. गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प असल्यामुळे त्या प्रकल्पाबाबत हा निर्णय राबविण्यात आला.या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून 90 टक्के निधी आणि राज्य शासनाकडून 10 टक्के निधी देण्यात आला होता. हा प्रकल्प दोन राज्यांशी संबंधित आहे. कोकण विभागाला इतर विभागांच्या मानाने कमी मिळते म्हणून एक विशेष बाब म्हणून माननीय श्री.पर्रिकर साहेबांशी बोलून या प्रकल्पापुरता राज्य सरकार सकारात्मक निर्णय घेईल.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मराठवाड्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील धरणाचे पाणी देण्याबाबत**

**(3) * 43068 श्री.दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मराठवाड्यातील माहे एप्रिल-मे, 2013 मधील पाणी टंचाईवर तोडगा काढण्यासाठी नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील धरणातील पाणी सोडण्यास सदर जिल्ह्यातील जनतेने व लोकप्रतिनिधींनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मराठवाड्यातील पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनील तटकरे** : (1) होय.

(2) जायकवाडी धरणाच्या उर्ध्व भागातील जलाशयामधून जायकवाडी जलाशयाकरीता 9.13 टीएमसी पाणी सोडण्यात आले होते.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मराठवाड्यातील जायकवाडी धरणाचा हा प्रश्न आहे. मराठवाड्यातील पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी काय प्रयत्न करण्यात आले या प्रश्नाचे उत्तर संदिग्ध स्वरुपात दिलेले आहे. लेखी उत्तरामध्ये विलंब झालेला नाही असे म्हटलेले आहे. पण त्यासाठी खूप आंदोलन झालेले आहे. माझ्या लेखी प्रश्नातील दोन क्रमांकाच्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदय वेगळ्या पध्दतीने न्याय देतील काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, गेल्या वर्षी पर्जन्यमान कमी झाल्यामुळे जायकवाडी धरणामध्ये पाण्याचा साठा खूप कमी झाला होता. त्या संदर्भात माझ्या दालनात दिनांक 12 ऑक्टोबर, 2012 रोजी एक बैठक घेण्यात आली. त्या बैठकीमध्ये 2.54 टी.एम.सी.पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. जलाशयात 31 जुलै, 2013 पर्यंत पाणी साठा असावा अशा पध्दतीचे नियोजन करण्यासाठी दिनांक 9.10.2012 रोजी बैठक घेण्यात आली. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली ती बैठक झाली. त्या बैठकीस सर्व लोकप्रतिनिधींना बोलाविण्यात आले

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43068....

श्री.सुनील तटकरे....

होते. त्यावेळी देखील पाणी सोडण्याच्या दृष्टीने प्रयत्न करुन या जलाशयात 10 टी.एम.सी.पाणी उपलब्ध करुन देण्यात आले. या धरणावर औरंगाबाद शहर, जालना, अंबड, गेवराई, शेवगाव, नेवासा ही शहरे तसेच ग्रामीण भागातील 205 गावांच्या 37 पिण्याच्या पाण्याच्या योजना अवलंबून आहेत. या व्यतिरिक्त आपण औरंगाबाद औद्योगिक वसाहतींना देखील पाणी पुरवठा करीत असतो. आपण नियोजन करुन जे पाणी उपलब्ध करुन दिले त्याप्रमाणे 31 जुलै, 2013 पर्यंत पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे त्या ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झालेली नाही.

श्री.अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी 9 टी.एम.सी.पाणी दिले असे सांगितले. जायकवाडीच्या मूळ धरणामध्ये 206 टीएमसी पाणी उपलब्ध होते. त्यापैकी जायकवाडीच्या वरच्या धरणामध्ये 106 टीएमसी पाणी उपलब्ध होते आणि प्रशासकीय मान्यतेनुसार जायकवाडीसाठी 90 टीएमसी पाणी उपलब्ध आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ ST/ D/ पूर्वी श्री.अजित.... 12:40

ता.प्र.क्र.43068....

श्री.अमरनाथ राजूरकर....

116 टीएमसी पाणी नाशिक आणि नगर जिल्ह्याला घ्यायचे असताना तेथील धरणे 146 टीएमसी पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बांधण्यात आले. त्यातून 20-25 टीएमसी पाणी पिण्यासाठी घेण्यात आले. बंधारे, शेततळे इतकेच नव्हे तर कॅनॉल देखील भरुन घेण्यात आले. मी स्पेसिफिक विचारतो की, या ठिकाणी 165 टीएमसी पाणी जायकवाडीपेक्षा जास्त वापरले जाते हे खरे आहे काय ? सध्या 49 टीएमसी अतिरिक्त पाणी वापरले जात आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्यातील 12 (6)(c) या नियमाचा आपले अधिकारी वेगळा अर्थ लावतात. या निमित्ताने मी विचारतो की, कायद्यापेक्षा रुल्स मोठे होत आहेत हे खरे आहे काय ?

श्री.सुनील तटकरे : महोदय, पैठणच्या परिसरात जायकवाडी धरण करण्याचे नियोजन झ ाले. त्यावेळी त्यातील उपयुक्त जलसाठा 76.67 टीएमसी नियोजित होता. प्रकल्पीय साठा 102 टीएमसी होता. त्यातील उर्ध्व भागामध्ये किती पाण्याची उपलब्धता आहे त्या बाबत साकल्याने विचार झाला होता. तो विचार करीत असताना सन्माननीय सदस्यांनी अशा भावना व्यक्त केल्या की, उर्ध्व भागामध्ये उपलब्ध असलेल्या पाण्याच्या तुलनेत जादा क्षमतेची धरणे बांधण्याचा प्रयत्न केला गेला. होय, ही वस्तुस्थिती आहे. कारण त्या वेळी राज्याच्या हिताच्या दृष्टीने तशा प्रकारचे धोरण स्वीकारले गेले. 2004 मध्ये अशा प्रकारची स्थिती निर्माण झाल्यामुळे सिडोई मार्फत सर्वेक्ष्ंण करण्यात आले. त्यांच्या अहवालात पैठणच्या जायकवाडी धरणात जेवढा पाणी साठा अपेक्षित धरला होता तेवढा जाऊ शकत नाही असे नमूद करण्यात आले. ही स्थिती लक्षात घेऊन एमडब्ल्यूआरआरए चे नियम तयार झाले आहेत. त्या नियमांना प्रसिध्दी देखील दिली आहे. मध्यंतरी उच्च न्यायालयात या संदर्भात याचिका दाखल झाल्या होत्या. त्यातील एक याचिका तेथे प्रलंबित आहे. नव्याने केलेले नियम आणि कायदे या अनुषंगाने खोरे निहाय कसे नियोजन करायचे हे ठरविले आहे. दरम्यानच्या काळात श्रीरामपूर नगर परिषद तसेच अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यातील काही संस्था उच्च न्यायालयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात गेल्या. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली. पिण्यासाठी जेवढे पाणी आवश्यक होते तेवढे पाणी जायकवाडी धरणामध्ये उपलब्ध करुन दिल्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील त्यांची याचिका खारीज झाली. या संदर्भात नेमके काय धोरण ठरवावे. आज या विषयी उच्च न्यायालयामध्ये सुनावणी आहे.

..2..

ता.प्र.क्र.43068....

श्री.सुनील तटकरे....

महोदय, मेंढेगिरी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीमध्ये चार विभागांच्या मुख्य अभियंत्यांचा समावेश होता. त्या समितीचा अहवाल येत्या 8-15 दिवसांत राज्य सरकारला मिळणे अपेक्षित आहे. या सर्व गोष्टींचा सारासार विचार करुन योग्य तो निर्णय निश्चितपणे घेतला जाईल.

श्री.अमरसिंह पंडित : महोदय, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील धरणातील पाणी सोडण्यास सदर जिल्ह्यातील जनतेने व लोकप्रतिनिधींनी विरोध केला आहे हे खरे आहे काय, अशा प्रकारचा लेखी प्रश्न विचारण्यात आला होता. त्याला 'होय' असे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, माननीय मंत्री विरोध करणाऱ्या लोकप्रतिनिधींची नावे या सभागृहात जाहीर करतील काय ? तसेच प्रश्न क्रमांक-2 ला "जायकवाडी धरणाच्या उर्ध्व भागातील जलाशयातून जायकवाडी जलाशयाकरिता 9.13 टीएमसी पाणी सोडण्यात आले होते." असे लेखी उत्तर दिलेले आहे. मुळात हे पाणी सोडण्यास विलंब झाला होता. त्यामुळे लोकांनी शेतीसाठी वा निरनिराळ्या कामांसाठी पाणी उचलले आणि त्यामुळे जायकवाडी जलाशयात केवळ 3 टीएमसी पाणी उपलब्ध झाले. पूर्वीसारखी परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून या संदर्भातील नियोजन 30 ऑगस्टपूर्वी निश्चित करण्यात येईल काय ?

श्री.सुनील तटकरे : महोदय, पाणी सोडण्यास कोणी विरोध केला आणि कोणी न्यायालयीन दावे टाकले हे मी सांगतो. संजीवनी साखर कारखाना, श्रीरामपूर नगर परिषद, रामचंद्र निवृत्ती झ ाोरे, सोपान सदाफळ, ज्ञानेश्वर गोंदकर, मिनलताई खांडेकर, कोपरगांव सहकारी साखर कारखाना, महापौर, अहमदनगर महापालिका यांनी न्यायालयीन दावा दाखल केला. तसेच सन्माननीय श्री.शंकरराव कोल्हे, श्रीरामपूरचे विधानसभा सदस्य श्री.भाऊसाहेब कांबळे आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे माननीय खासदार श्री.भाऊसाहेब वाघचौरे यांच्या नेतृत्वाखाली जन-आंदोलने करण्यात आली.

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.बरवड....

ता. प्र. क्र. 43068 .... श्री. सुनील तटकरे ....

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सुध्दा जनआंदोलन केले. सर्वपक्षीय राहता मोर्चा आणि श्री. अशोक काळे, विधानसभा सदस्य यांनी जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भात निवेदन दिले. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी जे सांगितले त्या बाबतीत मघाशी उत्तर देत असताना मी सांगितले की आम्ही यावेळी नियोजन करीत आहोत. सुदैवाने या वर्षी अतिशय उत्तम पाऊस झालेला आहे. जायकवाडीमध्ये आता मृतसाठा 1 टीएमसी एवढाच राहिलेला आहे. पण आज ज्या पध्दतीने त्या ठिकाणी पाणी येत आहे त्यावरुन या चोवीस तासात मृतसाठा संपेल आणि लाईव्ह स्टोअरेजमध्ये पाणी येण्याची शक्यता निश्चितपणे आहे. परंतु एक गोष्ट नक्की आहे की, या वर्षी पूर्णपणे नियोजन करुन 30 ऑगस्ट पर्यंत, मेंढेगिरी समितीचा अहवाल, आज उच्च न्यायालयातील सुनावणीमध्ये न्यायालय काय आदेश देतील ते तसेच उपलब्ध असलेले पाणी याचे योग्य नियोजन करुन या बाबतीत निश्चितपणे निर्णय घेतला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मराठवाड्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेला आहे. फक्त या चर्चेमध्ये मघाशी मंत्री महोदय बोलताना असे म्हणाले की, यासंबंधात उच्च न्यायालयामध्ये याचिका प्रलंबित आहे हे एकून बरे वाटले. तरी काल जे सदस्य बोंब मारत होते ते सर्व सदस्य यावर प्रश्न विचारुन चर्चा करीत आहेत याचा मला आनंद आहे.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, 'बोंब मारत होते' हे शब्द कामकाजातून काढून टाकावेत.

**उप सभापती** : 'बोंब मारत होते' हे शब्द कामकाजातून काढण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांना सांगू इच्छितो की, मला आश्चर्य वाटले आणि बरेही वाटले की, मंत्री महोदय या संबंधी उच्च न्यालयालयामध्ये याचिका प्रलंबित आहे असे म्हणत असताना प्रश्न विचारण्यासाठी सर्व सन्माननीय सदस्यांचे हात वर आहेत आणि सर्व सदस्य बोलत आहेत. याच्या अर्थ तुमच्या मनात कोणते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 43068 .....

कामकाज चालवावयाचे आणि कोणते चालवावयाचे नाही हे क्लिअर आहे. हे सर्वांना कळले हे बरे झ ाले. सभापती महोदय, 2005 मध्ये जलसंपत्ती नियमन प्राधिकरण स्थापन झाले. नदी खोऱ्यातील पाण्याचे समन्यायी प्रमाणात वाटप करणे हे प्राधिकरणाचे मुख्य काम असताना अद्यापपर्यंत त्या पाण्याचे समन्यायी वाटप झालेले नाही. आज सगळीकडे चांगला पाऊस पडत आहे. पण जायकवाडी धरणाच्या बाबतीत काय परिस्थिती आहे हे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. समन्यायी पाणी वाटप आणि समन्यायी पाणीसाठा यामध्ये अंतर आहे. नंतर आंदोलने होतात. अहमदनगरमधील आमदार, खासदार, मंत्री पाणी सोडू नका असे म्हणतात आणि संभाजीनगर व मराठवाडा भागातील मंत्री पाणी सोडा असे म्हणतात. आधीच भांडणाचे विषय भरपूर आहेत आणि त्यामध्ये आणखी हा एक नवीन विषय आलेला आहे. त्यामुळे आताच यासंबंधात समन्यायी वाटप करण्याचा निर्णय कधी घेणार आहात, त्याची योग्य ती काळजी आतापासून घेणार का ? नंतर आंदोलने व्हावयास नको.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी जे म्हटले ते खरे आहे की, पांडुरंगाच्या कृपेने या वर्षी चांगला पाऊस झाला आणि गेल्या काही दिवसात वर्तमानपत्रातील आणि वेगवेगळ्या वाहिन्यांवर आमची सर्व धरणे भरत असल्याच्या बातम्या येत आहेत. ज्या धरणांबद्दल त्यांचा आक्षेप आहे ती सर्व धरणे अस्तित्वात आहेत आणि पाणी ओव्हर फ्लो होत आहे हे आपल्याला या निमित्ताने कळले हे आमच्या दृष्टीने बरे झाले. आम्ही 72 हजार कोटी रुपये खर्च करुन ही धरणे बांधलेली आहेत. पाणी नसेल पण धरणे आहेत. धरणात पाणी नसेल याचा अर्थ पाऊस कमी आहे. मघाशी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी या ठिकाणी एक मुद्दा उपस्थित केला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43068.... श्री.सुनील तटकरे....

त्यामुळे या वर्षी पाण्याचे नियोजन करीत असताना त्याप्रमाणे खबरदारी घेऊनच यासंबंधी उपाययोजना केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मराठवाड्यातील कोरड काय असते ती सामान्य माणसांनी अनुभवली आहे. सोलापूरचे श्री.देशमुख हे 4-6 महिने उपोषणाला बसले होते त्यामुळे राज्यात किती गोंधळ निर्माण झाला होता तोही आपण अनुभवला आहे. या सभागृहामध्ये जलसंपत्ती प्राधिकरणाचा कायदा मंजूर करण्यात आला. या शासनाने मागास भागावर जाणीवपूर्वक अन्याय होत आहे ही जाणीव निर्माण झाल्यानंतर या विभागाच्या सचिवांची नियमावली करण्याची जबाबदारी होती. त्यांनी 7 वर्षे नियम तयार केले नाहीत. हा या सभागृहाचा अवमान नाही का ? 7 वर्षे नियमच न केल्यामुळे पाणी सोडण्याबाबत घोळ निर्माण झाला आणि त्यातून 1 टीएमसी, अर्धा टीएमसी, पाव टीएमसी पाणी सोडण्याचा विषय सुरु झाला. या सदनाने समन्यायी पाण्याचे वाटप करण्याचा कायदा केल्यानंतर 7 वर्षे त्याचे नियम करण्यात आले नाहीत त्याला जबाबदार कोण आहे त्याचे मला उत्तर पाहिजे. हे प्राधिकरण निर्माण झाल्यानंतर संपूर्ण मराठवाड्यात, विदर्भात आणि खानदेशात समन्यायी तत्वावर पाणी देण्याची जबाबदारी शासनाची असताना त्याची अंमलबजावणी करण्यामध्ये अपयशी ठरलेले आहे. त्याला जबाबदार कोण आहे आणि त्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ?

आता नियम तयार झालेले आहेत. नियम क्र.12 (6) (ग) यानुसार समन्यायी तत्वावर पाणी दिले पाहिजे. श्री.सोडल नावाचे अधिकारी आहेत. संपूर्ण जलसंपदा खातेच जिरविण्याची मानसिकता असलेले ते अधिकारी आहेत त्यांनाच त्या प्राधिकरणात नेमलेले आहे. ते या खात्याचे पूर्वी सचिव होते. त्यांना आता प्राधिकरणावर नेमले आहे. नियम क्र.12 (6) (ग) मध्ये कोणतीही तरतूद नसताना त्यांनी 33 टक्के हा आकडा कोठून आणला ते मला समजलेले नाही. शासनाला आता टक्केवारीची सवय लागलेली आहे. 33 टक्के टंचाई असेल तर पाण्याचे समन्यायी वाटप केले जाणार आहे. या नियमांना बगल देण्यात आलेली आहे. हे प्राधिकरण निर्माण झाल्यानंतरही मराठवाडा व सोलापूरला कधीही पाणी मिळणार नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे. त्यासंबंधी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ते मला जाणून.....

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घ्यावयाचे आहे. नियम वाकविल्यामुळे जायकवाडी व उजनी धरण कोरडे पडणार असेल, बॅक वॉटरमध्ये भरलेले पाणी सोडले जाणार नसेल तर ते योग्य होणार नाही. समन्यायी तत्वानुसार सर्वांना सारखे दिले पाहिजे. बॅक वॉटरमध्ये पाणी भरल्यानंतर ते पुढील धरणामध्ये सोडणे हे या नियमामध्ये अभिप्रेत आहे. श्री.सोडल यांनी नियम वाकविल्यामुळे मराठवाड्याला व सोलापूरला कधीही पाणी मिळणार नाही. श्री.देशमुख यांना मरेपर्यंत उपोषणाला बसावे लागेल. यासंबंधी शासनाचे काय धोरण आहे ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 2-3 मुद्दे उपस्थित केले आहेत. देशामध्ये केवळ या राज्याने जलसंपत्ती प्राधिकरण नावाची ॲथोरिटी स्थापन केली आहे. हे त्यांनाही ज्ञात आहे. सभागृहाने त्यासाठी कायदा मंजूर केला, परंतु त्याचे नियम करण्यासाठी वेळ लागला ही गोष्ट खरी आहे. काल डॉ.राजेंद्र सिंह यांचे पाण्याचे नियोजन या विषयावरील विवेचन ऐकलेले आहे. पाण्याच्या वाटपाबाबत लोकांचा सहभाग कसा असावयास पाहिजे याबाबतचे त्यांनी उत्तम विवेचन केलेले आहे. एमडब्ल्युआरआरए निर्माण करणारे देशातील आपले पहिले राज्य आहे. त्या संदर्भात शासनाने पावले उचलली आहेत. (अडथळा)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 43068.... श्री. सुनील तटकरे...

तुम्ही त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे अभिनंदन केले होते, त्याची मी तुम्हाला आठवण करुन दिली. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे नियम बनविण्यासाठी विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु जोपर्यंत नियम होत नाहीत तोपर्यंत कायदा अस्तित्वात असतो आणि त्याची अंमलबजावणी होत असते. त्यामुळे कोणत्या गोष्टीसाठी आम्ही थांबलो आहोत असे नाही.

सन्माननीय सदस्यांनी श्री. सोडल या अधिका-यांचा उल्लेख केला. ते चांगले अधिकारी आहेत. त्यांना सदस्य म्हणून नेमेलेले आहे. नियुक्तीसाठी जाहिरात देऊन पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीमध्ये नावे ठरविली जातात. ती नावे माननीय राज्यपालांकडे पाठविली जातात आणि माननीय राज्यपाल त्यातील एक नाव निश्चित करतात. अशी नियुक्तीची प्रक्रिया आहे. यामध्ये आणखी एक बाब अशी आहे की, मराठीमध्ये "टंचाई" असा शब्द आहे आणि इंग्रजीमध्ये "डिस्ट्रेस" "तूट" असा शब्द आहे. यामध्ये श्लेष आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मांडलेल्या भावना लक्षात घेऊन या वर्षी आपण केलेला कायदा आणि उपलब्ध असलेले पाणी आणि गेल्यावर्षी निर्माण झालेली परिस्थिती याचे नियोजन या वेळी योग्य पध्दतीने निश्चितपणे केले जाईल मग ते उजनी धरणातील पाण्याचे असो अथवा जायकवाडी धरणातील पाण्याचे असो. हे धोरण व्यवस्थतपणे राबविले जाईल.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

श्री. अमरसिंह पंडित : पाणी सोडत असताना टंचाईची परिस्थिती जानेवारी महिन्यामध्ये लक्षात येईल. त्यावेळी सोडलेले पाणी पोहोचणार नाही. 30 ऑगस्ट पूर्वी निर्णय झाला नाही तर आम्हाला पाणी मिळणार नाही. MWRRAचे नियम आमच्या पथ्यावर पडत नाहीत.

श्री. अजित पवार : प्रश्न क्रमांक 43068च्या निमित्ताने एक महत्वाचा मुद्दा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. समन्यायी पाणी वाटप व्हावे यासाठी प्राधिकरण अस्तित्वात आणले. सभागृहाने एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. त्यासाठी मी पहिल्यांदा उजनीचे उदाहरण देतो. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी श्री. सोडल साहेबांचा उल्लेख थोडासा वेगळया पध्दतीने केला, तो योग्य नव्हता. अतिशय चांगले अधिकारी म्हणून त्यांनी माझ्या बरोबर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

काम केलेले आहे. ते मुळात सोलापूरचे आहेत. सोलापूरमध्ये त्यांची जमीन आहे. कोणतीही व्यक्ती काम करीत असताना सर्व गोष्टींचा विचार करते.राज्य सरकारने देखील तसा विचार केलेला आहे. वरसगाव, पानशेत, खडकवासला, टेमघर ही पुणे जिल्हयातील धरणे आहेत. इथे सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी आणि पुण्याचे प्रतिनिधीत्व करणारे सन्माननीय सदस्य यांना मी सांगू इच्छितो की, आज पुण्याला पिण्यासाठी 14 टीएमसी पाणी लागते. पवनीचे पूर्ण पाणी हे पिंपरी-चिंचवडसाठी दिले जाते. भामाआसखेड हे नवीन धरण केलेले आहे. त्याचे पाणी पिण्यासाठी चंदननगर, खराडीला देण्याचा निर्णय याच सरकारने घेतलेला आहे. शेवटी कोणतीही धरणे असली तरी त्या धरणातील पाण्यावर अवलंबून असणारी महत्वाची शहरे, या शहरांसाठी लागणारे हे पाणी वजा करुन शिल्लक राहिलेले पाणी हे शेतीचे गृहीत धरुन त्याचे वाटप केले जाते.

आपल्या राज्यातील पावसाळा 15 ऑगस्टला बंद होत नाही. नारळी पोर्णिमा झाल्यानंतर कोकणामध्ये पडणारा पाऊस कमी होतो. आपल्या राज्यामध्ये सप्टेंबरमध्ये देखील हस्त नक्षत्राचा पाऊस पडत असतो. ऑक्टोबरमध्ये पाणी येत असते. अलीकडेच सॅटेलाईट आणि हवामान खात्याच्या माध्यमातून पावसाळा कधी संपणार हे कळते.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43068....

श्री.अजित पवार....

मुंबई शहरात दोन दिवस अतिवृष्टी होणार असे हवामान खात्याकडून सांगितले गेले होते, त्याप्रमाणे अतिवृष्टी झाली. समुद्रात लाटा मोठया प्रमाणात उसळणार आहेत अशीही माहिती दिली गेली होती, त्याप्रमाणे समुद्रात मोठया प्रमाणात लाटा उसळल्या. सभापती महोदय, मराठवाडयाला सुध्दा पाणी मिळाले पाहिजे अशी आघाडी सरकारची भूमिका आहे. त्याकरिता तेथे बॅरेजेस् केलेले आहेत. वरच्या बाजूला गिरणा, निळवंडे, भंडारदरा, मुळा अशी अनेक धरणे आहेत. त्या धरणांमुळे मोठया शहरांचा पिण्याचा पाण्याचा पुढच्या वर्षीचा पावसाळा 15 जुलैला सुरु होणार आहे हे गृहीत धरुन तेथील पाण्याचे आरक्षण त्या त्या ठिकाणी करावे लागणार आहे. त्या विभागातील प्रतिनिधीत्व करणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी मागणी योग्य आहे. ते म्हणतात की, 15 ऑगस्ट पर्यंत करा. 15 ऑगस्ट पर्यंत आपण समन्यायी पाण्याचे वाटप केले आणि वरच्या धरणातील पाणी खाली सोडले व खालच्या धरणात पाणी अधिकचे आले तर खालच्या धरणाचे पाणी वर कोणही सोडू शकणार नाही. मी या राज्याचे प्रतिनिधीत्व अनेक वर्ष करीत आहे. मलाही माहिती आहे की, मराठवाडयाला न्याय दिला पाहिजे. मराठवाडयाला न्याय देण्यासाठी मी सर्वस्व पणाला लावण्यास तयार आहे. सोलापूरच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर आज उजनी धरणाचे पाणी 5 टी.एम.सी.ने वाढले. मी आज सकाळी ताबडतोबीने दोन्ही कॅनॉलचे पाणी सिना नदीत सोडण्याची सूचना केलेली आहे. पुणे जिल्हयामध्ये 16 धरणे आहेत. त्या ठिकाणच्या धरणांचे पाणी खाली जाण्यास सुरुवात झाली आहे. पवनी, खडकवासला, वीर धरणांमधील पाणी सोडलेले आहे. कधी कधी टंचाई सारखी परिस्थिती निर्माण होते. पाणी टंचाईच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या, त्या अनुषंगाने चर्चा होऊ शकते. परंतु मी सभागृहाला एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, ऑक्टोबर पर्यंत म्हणजे पावसाळा संपल्यानंतर नदी ओली असते, नदी वाहती असते. जायकवाडीला 9 टी.एम.सी.पाणी सोडत असताना बरेचसे पाणी टेलपर्यंत पोहोचले नाही. भामा आसखेड धरणाचे पाणी उजनी धरण्याच्या टेलपर्यंत पोहोचले नाही. पाणी अडीच टी.एम.सी.सोडले.परंतु सर्व पाणी नदीमध्ये पाझरले ही गोष्ट खरी आहे. माणूस हा अनुभवातून शहाणा बनत असतो. यावेळेस मात्र सुरुवातीलाच माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत आम्ही सर्वजण बसू आणि त्यावेळी वरच्या आणि खालच्या भागावर अन्याय होणार नाही अशी भूमिका आघाडी सरकार घेईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : जलसंपदा विभागाकडे माननीय श्री.अजित दादा पवार बारकाईने पाहतात हे आम्हाला कळले त्यांनी माननीय जलससंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांना आराम दिला आहे त्याबद्दल धन्यवाद. मागच्या वेळी पाणी सोडण्याच्या संदर्भात चर्चा झाली होती. पाणी सोडण्याच्या संदर्भातील नियम का केले गेले नाहीत, त्यासाठी 7 वर्षे का लागली हा विषय सभागृहात मांडत असताना मागच्या टंचाईच्या वेळी पाण्याच्या बाबतीत कंठशोष करीत होतो. तुमच्या अधिकाऱ्याने लेखी पत्र दिले की, 13 एप्रिल पर्यंत अधिनियम झालेले नसल्यामुळे आम्ही तुम्हाला पाणी देऊ शकत नाही. याबाबतीत कायदा अस्तित्वात आला. परंतु अशी कारणे सांगून कायदा मोडण्याचे काम आपल्या अधिकाऱ्यांकडून होत असेल तर ते योग्य नाही. माननीय श्री.अजित पवार साहेब, आपण या ठिकाणी अतिशय बरोबर सांगितले, त्याबद्दल मी तुम्हाला धन्यवाद देतो. आपण सांगितले की, वरची धरणे भरल्या शिवाय खालच्या धरणांमध्ये पाणी सोडू शकत नाही. खालून वर पाणी नेता येत नाही ही गोष्ट आम्हाला मान्य आहे.

मराठवाडयातील जायकवाडीसाठी 100 टीएम.सी.ची कमिटमेंट केलेली आहे. 86 टी.एम.सी.पाणी आहे. नाशिक विभागातील लोकप्रतिनिधी बाके वाजवित होते. फक्त तुमचा अधिकार 86 टी.एम.सी.पाण्यावर आहे. मराठवाडयाचा 100 टी.एम.सी.पाण्याचा अधिकार आहे. त्या ठिकाणी लहान मोठी धरणे बांधलेली आहेत. या ठिकाणी मी संपूर्णपणे लेखाजोगा दिलेला आहे. मराठवाडयाच्या वाटेला एक थेंबही पाणी येणार नाही अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे. हा कायदा मंजूर झालेला आहे. तेथील लहान मोठी धरणे भरतील की नाही हा नंतरचा भाग झाला. मराठवाडयाला जेवढे पाणी द्यावयास पाहिजे तेवढे पाणी देऊन त्यानंतर तेथील लहान मोठी धरणे भरण्याची व्यवस्था झाली पाहिजे अशा प्रकारचा आमचा नेहमीचा आग्रह आहे. वरच्या भागातील धरणे भरली पाहिजेत, त्या लोकप्रतिनिधींनी बाके वाजवून सांगितले पाहिजे की, मराठवाडयासाठी जेवढे पाण्याची कमिटमेंट केलेली आहे तेवढे पाणी त्यांना दिले पाहिजे. परंतु अशी परिस्थिती आहे की, आमचे पोट भरल्यानंतर उरले तर आम्ही तुम्हाला देवू. म्हणून माझी आग्रही मागणी आहे की, मराठवाडयासाठी जेवढया पाण्याची कमिटमेंट केलेली होती, तेवढे पाणी समन्यायी पध्दतीने

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

मिळालेच. आपण मघाशी सांगितले की, झालेल्या चूकामधून माणूस शिकत असतो. पाणी वाटपाच्या संदर्भात मराठवाडयावर कशा प्रकारे अन्याय केला गेला आहे, त्या अनुषंगाने तज्ज्ञांचे मंडळ आज माननीय मुख्यमंत्री महोदयांना भेटणार आहेत. मी श्री.सोडल साहेबांच्या बाबतीत एवढेच बोललो की, त्यांना जलसंपदा खात्याची परिपूर्ण माहिती आहे...

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43068...... श्री.दिवाकर रावते.....

ते इतके नॉलेजेबल आहेत की, कायदा कसा वाकवायचा हे त्यांना बरोबर माहिती आहे. म्हणूनच मराठवाड्याचा कंठशोष सुरु होता. या संदर्भात आपण विचार करणार असाल तर मराठवाडयाला जे तुम्ही 100 टीएमसी पाणी दिले आहे ते समप्रमाणात वरील भागातील धरणे भरुन वाहतात की नाही हे पाहून त्यांना त्या प्रमाणात द्यावे, आमच्या वाट्याचेही पाणी आम्हाला समप्रमाणात द्यावे. वरच्या भागात पाणी देऊन झाल्यानंतर खालच्या भागात द्यावे असा समन्वय असायला पाहिजे. त्या गोदावरी नदीच्या पाण्यावर अनेक शहरांचा पाणीपुरवठा अवलंबून आहे हे आपल्याला माहिती आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील संशयीत हवाला व्यापाऱ्यांकडून थकीत कराची वसुली करण्याबाबत**

**(४) * ४१६८४ श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्री.चंद्रकांत पाटील, श्री. विजय गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३६७३८ ला दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील संशयीत हवाला व्यापाऱ्यांवर कारवाई करणे क्रमप्राप्त असून त्यांचेवर निश्चितपणे फौजदारी कारवाई केली जाईल असे आश्वासन मा.वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१३ मध्ये दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्वासनानुसार किती हवाला व्यापाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन कारवाई केलेली आहे,
(३) नसल्यास, अद्यापपर्यंत सदर व्यापाऱ्यांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल न करण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच या प्रकरणी बुडालेल्या १३३३.९ कोटी रुपयांची कर वसूली शासन कधी व कशी करणार आहे, तसेच ज्या अधिकाऱ्यांनी उक्त हवाला व्यापाऱ्यांना टिन क्रमांक दिला अशा दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, कर वसूली न करण्याची कारणे काय आहेत,
(६) याप्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता :** (१) होय.
(२) विक्रीची खोटी बिजके देणाऱ्या संशयीत ३९२ व्यापाऱ्यांविरुध्द पोलिसांत तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. तसेच ज्या लाभार्थी व्यापाऱ्यांनी कर भरण्यास टाळाटाळ केली आहे अशा एकूण ३७ लाभार्थी व्यापाऱ्यांवर पोलीसांत तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.
(३) उर्वरित संशयित व्यापाऱ्यांच्या प्रकरणांमध्ये सखोल अन्वेषण चालू आहे. अन्वेषणाअंती दोषी आढळून आलेल्या प्रकरणांमध्ये फौजदारी कारवाई करण्यात येईल.
(४) आतापर्यंत एकूण ४१,८३२ लाभार्थी व्यापाऱ्यांनी सुमारे १५९५ कोटी रुपयाची चुकीची कर वजावट घेतल्याचे निदर्शनास आले आहे. यापैकी आतापर्यंत विभागाने रु.६९० कोटी इतकी वसुली केली आहे. तसेच लाभार्थी व्यापाऱ्यांच्या २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या निर्धारणा प्राधान्य तत्वावर दि.३० जून, २०१३ पर्यंत पूर्ण करण्यात येऊन, कर व शास्तीची मागणी करण्यात आली आहे. सन २००९-१० व २०१०-११ कालावधीसाठी व्यापाऱ्यांची कर निर्धारणा करण्यासाठी नोटीसा बजावण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

नोंदणी दाखला मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची पडताळणी करताना नोंदणी अधिकाऱ्याला काही मूलभूत कागदपत्रांच्या तपासणीनंतर उदा.त्या व्यक्तीचे ओळखपत्र (PAN CARD). धंद्याच्या ठिकाणाची कागदपत्रे तपासून त्वरित नोंदणी दाखला देणे बंधनकारक आहे. ऐच्छिक नोंदणी दाखला पध्दतीत धंदा सुरु करण्यापूर्वी ठराविक फी व अनामत रक्कम भरुन नोंदणी दाखला घेता येतो, त्यामुळे जे व्यापारी नोंदणी दाखला घेतल्यानंतर विक्रीची खोटी बिजके देतात किंवा सुरुवातीस काही दिवस खरा धंदा दाखवून नंतर खोटी बिजके देतात. अशा बाबी नोंदणी दाखला देतेवेळी निदर्शनास येणे सर्वसाधारणपणे शक्य होत नाही. वरील सर्व बाबी लक्षात घेता, संशयित व्यापाऱ्यांना देण्यात आलेल्या नोंदणी दाखला क्रमांकाबाबत संबंधित अधिकारी दोषी आहेत असे सर्वसाधारणपणे गृहित धरता येणार नाही.
तथापि ह्या संदर्भात चौकशी करण्यात येत आहे.
(५) लागू नाही.
(६) लागू नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मी हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, सकृतदर्शनी खोटी बिजके देणारे २०६० व्यापारी शोधले असून त्यांची १६०० कोटी रुपयांची कर चुकवेगिरी शोधण्यात विभागाला यश आले आहे. खोट्या बिजकाच्या आधारे वजावट घेणाऱ्या लाभार्थी व्यापाऱ्यांना विक्री कर वसुलीची नोटीस दिली आहे. २०६० व्यापाऱ्यांना हवाला म्हणून घोषित केले आहे. यातील १८९५ व्यापाऱ्यांचे नोंदणी दाखले रद्द केले असून इतरांवर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरु आहे.

सभापती महोदय, आजपर्यंत केवळ ३९२ व्यापाऱ्यांविरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. उर्वरित १६६८ व्यापाऱ्यांची आजही चौकशी सुरु आहे. त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केलेला नाही. मात्र त्यांना हवाला म्हणून घोषित केले आहे. आजपर्यंत १६०० कोटी रुपयांपैकी ६९० कोटी रुपयांची वसुली झालेली आहे. ज्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने हवाला व्यापाऱ्यांनी कर चुकविला आहे त्यांची चौकशी करु असे आश्वासन दिले होते. दिलेल्या आश्वासनानुसार आजपर्यंत किती अधिकाऱ्यांची चौकशी केली याची माहिती सभागृहाला देण्यात यावी. चार महिने उलटून गेले आहेत. मंत्री महोदयांनी दोषी हवाला व्यापाऱ्यांच्या विरोधात कोणताही तपास केलेला नाही. एका व्यापाऱ्याला टीन नंबर मिळतो तो दुसऱ्या व्यापाऱ्याला रेफर केला जातो. ज्यांनी टीन नंबर रेफर केला त्यांच्यामार्फत दुसऱ्या व्यापाऱ्याचा पत्ता शोधता येईल. अशी प्रोसीजर झाली आहे का? ३९२ व्यापाऱ्यांविरुध्द तक्रार दाखल केली त्यांना अटक झाली आहे का?

सभापती महोदय, ९०५ कोटी रुपये वसुलीची थकबाकी असून १६६८ व्यापाऱ्यांविरुध्द गुन्हा केव्हा दाखल करणार आहात? ज्याप्रमाणे मुंबई महापालिकेच्या फाईल गहाळ झाल्या आहेत त्याच पध्दतीने या प्रकरणातील फाईल गहाळ झाल्या आहेत. त्याची सविस्तर माहिती मला प्राप्त होणार आहे. त्यानंतर मी सभागृहात तो विषय मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. अधिकारी दोषी असतील तर त्यांच्याविरुध्द कारवाई करु असे आश्वासन सभागृहात दिलेले असताना एकाही अधिकाऱ्याविरुध्द कारवाई केलेली नाही. कारवाई केली असेल तर तसे सांगावे. नसल्यास पुढील १५ दिवसात कारवाई करण्यात येईल का?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सर्वप्रथम या संपूर्ण प्रकरणाबाबत हवाला शब्दाचा वापर केला जाऊ नये अशी माझी विनंती आहे. कारण की, हवाला या शब्दाचा वापर होतो तो....

नंतर २आय.१..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 41684......

श्री. राजेंद्र मुळक ...

दुसरीकडे पैसा ट्रान्सफर करण्यामध्ये जी मंडळी पकडली जाते त्यासंदर्भात हवाला शब्द वापरला जातो. विक्रीकर विभागाच्या संदर्भात हवाला शब्द वापरला जाऊ नये अशी विनंती आहे.

सभापती महोदय, खोटी बिले देणारी जी व्यापारी मंडळी आहे त्यांच्यावर विक्रीकर विभागाच्या माध्यमातून कारवाई केली जाते. अशा प्रकरणामध्ये जी व्यापारी मंडळी गुंतली आहे अशा सर्व व्यापाऱ्यांवर विक्रीकर विभाग कारवाई करीत असते. त्यामुळे "खोटी बिले देणारे व्यापारी" म्हणून विक्रीकर विभागामध्ये त्यांचा उल्लेख केला जातो त्यामुळे येथे हवाला शब्द वापरणे योग्य होणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी व्यापाऱ्यांवर कशा पध्दतीची कारवाई केली जाणार आहे, पैशाची वसुली कशी केली जाणार आहे, संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली जाणार आहे असे प्रश्न विचारण्यात आले होते. त्यावेळी भविष्यामध्ये कशा प्रकारे कारवाई केली जाणार आहे याचा उल्लेख करण्यात आला होता. तेव्हा पासून आतापर्यंत 165 व्यापाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आता ही संख्या 392 वर गेलेली आहे. एफआयआर दाखल करण्याच्या वेळी अनेक बाबी लक्षात घ्याव्या लागतात तसेच अनेक कागदपत्रांची जुळवणी करावी लागते. एफआयआर दाखल झाल्यानंतर त्या व्यापाऱ्यांवर जो काही गुन्हा दाखल होतो तो एफआयआर मध्ये उपस्थित केलेले जेवढे दस्तऐवज असतात त्यावर ते आधारित असतात व त्याची ग्रॅव्हीटी त्या पध्दतीने तयार होत असते. एफआयआर दाखल होत असतांना जी दक्षता घ्यावी लागते, कागदपत्रांची जी जुळवाजुळव करावी लागते त्यामध्ये खोटी बिले देणाऱ्या व्यापाऱ्यांची सर्व बँक अकाऊंट्स तपासली जातात. (अडथळा) विक्रीकर विभागाची प्रोसिजर काय आहे याची मी सभागृहाला माहिती देत आहे.

1600 लोकांवर एफआयआर दाखल करण्यासाठी यंत्रणा कशी लागते, कोणकोणती कागदपत्रे लागतात, अवधी किती लागतो याची माहिती द्यावीच लागणार आहे. एका दिवसामध्ये एक एफआयआर दाखल होऊ शकत नाही. एफआयआर दाखल करीत असतांना ज्या कागदपत्रांची आवश्यकता असते ती कागदपत्रे आपण जोपर्यंत तयार करीत नाही तोपर्यंत आपण एफआयआर दाखल करु शकत नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 41684......

श्री. राजेंद्र मुळक ...

एफआयआरसाठी अनेक कागदपत्रांची आवश्यकता लागत असते. कागदपत्रांची तयारी करीत असतांना अधिकाऱ्यांची आवश्यकता असते,रेग्युलर असेसमेंटचे काम सुरुच असते व या सर्व कारभारामधून अधिकाऱ्यांना काढून या कामामध्ये लावत असतांना अधिकाऱ्यांची आवश्यकता असते. 1600 संख्या ही फार मोठी आहे. या सर्व लोकांवर एफआयआर होणे क्रमप्राप्त आहे. परंतु हे सर्व करीत असतांना काही कागदपत्रांची जुळवणूक करणे आवश्यक असते. यासंदर्भात कोणकोणती कागदपत्रे लागतात, त्यांची संख्या किती असते हे मी या ठिकाणी सांगत आहे. उरलेल्या 1666 व्यापाऱ्यांवर आपल्यला एफआयआर दाखल करावयाचा असून त्यांच्यावर लवकरात लवकर एफआयआर दाखल केला जाईल. एफआयआर दाखल करीत असतांना 10/12 कागदपत्रांची जुळवणी करणे, खातरजमा करणे, त्यांचे अकाऊंट दुसरे कोणी ऑपरेट करीत असेल तर त्याचीही चौकशी करणे हे सर्व करणे क्रमप्राप्त असते.

सन्माननीय सदस्यांनी आतापर्यात वसुली कशा प्रकारे करण्यात आली असे विचारले होते. यामध्ये 618 कोटी रुपयांची वसुली करण्यात आलेली आहे. इतर जेवढी प्रकरणे आहेत त्यांची सर्व माहिती गोळा केली असून त्या सर्वांना डिमांड्स दिलेल्या असून रेग्युलर वसुलीही सुरु आहे. उर्वरित वसुलीही लवकरात लवकर होईल. यामध्ये काही व्यापारी अपिलात जातात व यासंदर्भात अपिलांचा जो काही निकाल लागेल तो लागेल. परंतु हे करीत असतांना कोणताही व्यापारी सुटणार नाही याची विभागाच्या माध्यमातून काळजी घेतली जात आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41684...

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, भविष्यामध्ये अशी प्रकरणे पुन्हा घडू नयेत म्हणून दक्षता घेण्यासाठी आपण अनेक उपाययोजना हातामध्ये घेतल्या आहेत. रिस्की कम्युनिटी म्हणजे पोलाद, केमिकल, बिल्डींग मटेरीयल या व्यवसायांच्या प्रतिष्ठाना पर्यंत जाऊन खातरजमा होत नाही तो पर्यंत अशा प्रतिष्ठानांना परवाना देणार नाही अशा प्रकारची दक्षता भविष्यामध्ये घेण्यात येईल. जेणे करून भविष्यात अशा प्रकरणांमध्ये आपल्याला आळा घातला येईल.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. आता तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एक प्रश्न विचारल्यानंतर आपण दुसरा उप प्रश्न विचारण्यास अनुमती का देत नाही ? मघाशी आपण लक्षवेधी सूचना पाऊण तास चालविली आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्यामुळे मी ती लक्षवेधी सूचना शेवटी घेतली होती. तत्पूर्वी कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनांवर सभागृहात प्रश्नोत्तरे झाली होती. लक्षवेधी सूचना आज दुपारी सव्वा बारा वाजेपर्यंत घ्यायच्या होत्या. त्यामुळे त्याचा आणि याचा संदर्भ लावणे योग्य होणार नाही. आपण जरूर विनंती करावी. मी येथे बसून काय करावे हे देखील मला आपण खाली बसून शिकवायला लागला आहात.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, पीठासीन अधिकारी या नात्यानेच आम्ही आपल्याला विनंती करीत होतो. आपण जो निर्णय द्याल तो आम्ही मान्य करू. 1600 कोटी रूपयांच्या महसुला संबंधी आम्ही चर्चा करीत आहोत. या प्रश्नासंबंधी आम्ही तीन अधिवेशनात सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. एका प्रश्ना नंतर दुसरा प्रश्न विचारण्यास आपण संधी दिली असती तर ते चालले असते असे आम्हाला वाटते. एरव्ही आपण अशा वेळी सर्वांना संधी देता. एवढ्या महत्वाच्या प्रश्नावर आपण दुसरा प्रश्न विचारण्यास संधी का देत नाही याचे आम्हाला आश्चर्य आहे.

..2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41684...

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे एवढेच मी म्हणालो आहे. यात मी काही चूक केली आहे काय ? प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपली होती. ते सांगणे माझे कर्तव्य आहे. आम्हाला प्रश्न विचारावयाचे आहेत अशी विनंती आपण मला करावी. पण आपण मला खाली बसून सांगत आहात.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रश्नावर उप प्रश्न विचारण्याची संधी द्यावी अशी मी आपल्याला विनंती केली होती.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये केवळ चार प्रश्न झालेले आहेत. आज अतिशय महत्त्वाचे प्रश्न होते. त्यामुळे किमान 7-8 प्रश्न तरी व्हायला पाहिजे होते. तेवढे प्रश्न होत नसल्यामुळे आमच्या भागाला न्याय देणे अडचणीचे होते.

**उप सभापती** : आपल्या भागाला न्याय देताना मला येथे केवढा त्रास होत आहे याचा आपण देखील विचार करावा. आपण नेमका प्रश्न न विचारता वेगळाच प्रश्न विचारता. सगळ्या प्रश्नांसाठी सर्वच सन्माननीय सदस्यांचे हात वर असतात. प्रत्येकाला संधी देणे शक्य नाही. आपण असे ठरवावे की, एका प्रश्नावर फक्त दोनच सन्माननीय सदस्यांनी दोन उप प्रश्न विचारावेत. त्यास आमची तयारी आहे. मी कित्येक वेळा दहा प्रश्न देखील प्रश्नोत्तराच्या तासामध्ये घेतले आहेत. मराठवाड्याचा पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा होता. त्यावर आपण प्रश्न उपस्थित करून माहिती घेणे हे देखील आवश्यक होते.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना विचारू इच्छितो की, किती लोकांवर एफआयआर दाखल करण्यात आले आहेत, उरलेल्या लोकांसंबंधी माहिती देण्यासाठी किती कालावधी लागणार आहे ? ज्या अधिकाऱ्याने यात चुकीची कार्यपद्धती अवलंबिली आहे, त्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे, याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी सुरूवातीलाच सांगितले आहे की, ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी 224 लोकांवर एफआयआर दाखल केला आहे. आजपर्यंत 392 लोकांवर एफआयआर दाखल केला आहे. या कालावधीत 168 लोकांवर एफआयआर दाखल करण्यात आला. उर्वरित 1600 लोकांवर एफआयआर दाखल करण्याची आमची प्रक्रिया जास्त वेगाने सुरू आहे. सुरूवातीच्या काळामध्ये कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यासाठी अधिकाऱ्यांची आवश्यकता होती. आम्ही ॲडिशनल फोर्स लावून तातडीने एफआयआर दाखल करून लवकरात लवकर कारवाई करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आमची न्यायालयीन चौकशी व बाकी चौकशी पूर्ण होत नाही तो पर्यंत अधिकाऱ्यांची चौकशी करण्यासंबंधीचा कोणताही विषय आमच्यापुढे नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, 41832 लाभार्थी व्यापारी आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर व्यापारी भ्रष्टाचार करतात तेव्हा त्या सिस्टीममध्येच चूक होती असे आपल्याला वाटत नाही काय ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.41684....

श्री.चंद्रकांत पाटील...

माझा दुसरा प्रश्न आहे की, एकूण संख्या पाहता आणि त्यांच्यावर एफ.आर.आय.नोंदविण्यासाठी लागणारा वेळ पाहता यासाठी एक वेगळा टास्क फोर्स निर्माण करणार आहात काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, भविष्यात अशी प्रकरणे होऊ नयेत म्हणून मी काही गोष्टींचा येथे उल्लेख केला. त्यामध्ये रिस्की कमोडीटीजला नोंदणी देण्यापूर्वी त्यांच्या एस्टॅब्लिशमेंटमध्ये जाऊन त्याची संपूर्ण माहिती घेऊनच त्यांना नोंदणी देणे असा विषय हाती घेणार आहे. पॅनकार्डवरुन माहिती घेतल्यानंतरच नोंदणी देणे, अशाप्रकारच्या विविध उपाय योजना हाती घेतलेल्या आहेत. आम्ही अधिकची माहिती गोळा करीत आहोत. अनधिकृत काम करणाऱ्यांवर आळा घालण्याच्या दृष्टीने पूर्णपणे दक्षता घेतली जाणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 40 हजार प्रकरणांचा उल्ले्ख केला. त्या बाबतीत मी सुरुवातीलाच उत्तर दिलेले आहे. ज्या असेसमेंट झाल्या त्यामध्ये दोन हजार लोकांना पकडण्यात आले. सुरुवातीच्या टप्प्यामध्ये 224 जणांवर एफ.आय.आर.दाखल करण्यात आला.त्यानंतर 165 जणांवर एफ.आर.आय दाखल करण्यात आला. ही संख्या 350 च्या जवळपास गेली आहे. रेग्युलर बेसीसवर कागदपत्रे गोळा करुन एफ.आय.आर.दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचा प्रश्नच येत नाही. 1665 व्यापाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नासंबंधीची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

डॉ.विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "आयुर्वेद होमिओपॅथी अभ्यासक्रमाच्या खाजगी संस्थांच्या मॅनेजमेंट कोट्याच्या फी रचनेच्या स्वरुपाबाबत" या विषयावरील डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामनाथ मोते, नितीन गडकरी,पांडुरंग फुंडकर, वि.प.स. आणि सर्वश्री अनंत तरे, अरविंद सावंत, विलास अवचट, अनिल परब, डॉ.अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, माजी. वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 9354 ला दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन 2005 मध्ये विचारलेल्या प्रश्नांची माहिती 2013 मध्ये म्हणजे आठ वर्षांनी ठेवण्यात येत आहे.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत येथे अधिकची माहिती छापावी. )

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "बुलढाणा जिल्ह्यात भृणहत्या होत असल्याबाबत " या विषयावरील श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री संदीप बाजोरिया, हेमंत टकले, विक्रम काळे, रमेश शेंडगे, जयवंतराव जाधव, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 38120 ला दिनांक 19 मार्च, 2013 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबत येथे अधिकची माहिती छापावी. )

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 26 जुलै,2013 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 25 जुलै, 2013 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार खालील अशासकीय विधेयकांना वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे. विचारार्थ

(गतसत्रात घेतलेल्या बॅलेटमध्ये आलेली अशासकीय विधेयके )

1. सन 2011 चे वि.प.वि.क्रमाक 8 - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, 2011 श्री.दिवाकर रावते, वि.प.स.यांचे — 40 मिनिटे
2. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 13- महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, 2011 श्री.विनोद तावडे, वि.प.स.यांचे — 40 मिनिटे
3. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, 2011 श्री.विजय सावंत, वि.प.स. यांचे — 35 मिनिटे
4. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 4 - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा ) विधेयक, 2011 श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचे- चर्चा अपूर्णावस्थेत. — 35 मिनिटे

**उप सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "प्राथमिक शाळांमधील लिपिक व सेवक वर्ग मंजुरीचे प्रस्ताव गेली अनेक वर्षे प्रलंबित ठेवणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 22 जुलै, 2013 रोजी दत्तोबा नामदेव म्हात्रे (रा.ता.मुळशी, जि.पुणे) यांचा तसेच नाशिक मध्येही एका महिलेचा स्वाईन फ्ल्यूमुळे झालेला मृत्यू, सदरची स्वाईन फ्ल्यूची लागण रोखण्याकरिता करावयाची उपाययोजना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "मुंबईतील माझगांव महानगर दंडाधिकारी न्यायालयात हजारो खटले प्रलंबित असून अचानकपणे बंद केलेले न्यायालय पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "ता.खेड, जि.रत्नागिरी येथील योगिता दंत महाविद्यालयातील राखीव संवर्गातील विद्यार्थ्यांची तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती शासनाकडून येणे बाकी असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "खामगांव-चिखली-जालना या रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे काम के.टी.कन्स्ट्रक्शन या कंपनीने गेली पाच वर्षे पूर्ण न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "रायगड जिल्ह्याचे निवासी उप जिल्हाधिकारी डॉ.जगन्नाथ बीरकर यांचे स्वीय सहायक विनोद लचके यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांच्या केबिनमध्येच मंगळवारी लाच घेताना रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली अटक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---------



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** :पूर्णा बॅरेज 2 (नेरधामणा) प्रकल्पाच्या वाढीव परिमाणास मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही प्रलंबित असणे, या बाबत सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया व डॉ.रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेंद्र मुळक ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-2.सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री.गोपिकिशन बाजोरिया : महोदय, पूर्णा बॅरेज-2 नेरधामणा प्रकल्पाला 2008 मध्ये रु.181.99 कोटी रुपयांच्या किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यानंतर 2011 मध्ये रु.638.35 कोटी रुपये किंमतीस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निवेदनामध्ये नमूद केले आहे की, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिशन बाजोरिया यांना दि.27/6/2013 रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पाबाबतची संपूर्ण माहिती अवगत करुन दिलेली आहे. महोदय, मला जे पत्र पाठविण्यात आले त्यामध्ये "पूर्णा बॅरेज-2 (नेरधामणा) या प्रकल्पाच्या वाढीव परिमाणास मान्यता प्रदान न करण्यात आल्यामुळे प्रकल्पाचे काम बंद आहे. वाढीव परिमाणास शासनाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव महामंडळ कार्यालय, नागपूर यांच्यामार्फत सादर करण्याचा पाठपुरावा सुरु आहे." असे नमूद केले आहे.

महोदय, 2008 मध्ये 181.99 कोटी रुपये किंमत असलेल्या प्रकल्पाची किंमत 2011 मध्ये 638.35 कोटी रुपये झालेली आहे. आता या प्रकल्पाच्या वाढीव परिमाणास गेल्या तीन वर्षांपासून मंजुरी मिळत नाही. या वाढीव परिमाणास मान्यता मिळण्यासाठी अधिकाऱ्यांची अकोला, अमरावती, नागपूर, मुंबई अशी संगीत खुर्ची सुरु आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या विषयी माननीय मंत्री महोदय आपल्या दालनात बैठक आयोजित करुन या प्रकल्पाच्या वाढीव परिमाणास मान्यता देतील काय ? तसेच वाढीव परिमाणास मान्यताच मिळाली नाही तर 278 कोटी रुपये खर्च कसे करण्यात आले ?

श्री.राजेंद्र मुळक : महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार या विषयी निश्चितपणे बैठक आयोजित करुन त्या बैठकीत सन्माननीय सदस्यांना या विषयी माहिती देण्यात येईल.

महोदय, या प्रकल्पाच्या 181.99 कोटी रुपयांच्या किंमतीस 2008 मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. प्रकल्पाची किंमत वाढल्यामुळे सुधारित प्रशासकीय किंमतीस मान्यता घ्यावी लागली. पूर्वीच्या तुलनेत प्रकल्पाच्या मूळ संकल्पनेत थोडासा बदल करण्यात आला, काही प्रमाणात व्याप्ती सुध्दा वाढविण्यात आली तसेच संकल्पचित्रात काही बदल करण्यात आले. त्यामुळेच या प्रकल्पाची किंमत वाढलेली आहे. सन्माननीय सदस्यांना या प्रकल्पाविषयीची सविस्तर माहिती बैठकीमध्ये निश्चितपणे देण्यात येईल.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक....

तसेच दुसरी बाब अशी की, 2013-14 मध्ये या प्रकल्पासाठी 95 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यातून या प्रकल्पाचे उर्वरित काम हाती घेणार आहोत. बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांना सविस्तर माहिती देण्यात येईल.

-----------

नंतर श्री.बरवड....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : अकोला येथील विमानतळ धावपट्टीचे प्रलंबित असलेले विस्तारीकरण याबाबत श्री. गोपीकिसन बाजोरिया, डॉ. रणजित पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. या विषयाच्या संदर्भात आतापर्यंत 6 वेळा नियम 93 अन्वये सूचना तसेच लक्षवेधी सूचना झालेल्या आहेत. आपले असे ठरले होते की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात किंवा आपल्या दालनात बैठक घेऊन हा प्रश्न निकाली काढावा लागेल. आता हे सातवे उत्तर आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, शरद सरोवर आहे ते तोडून हे मार्गी लावण्यात येणार आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, श्री. मधुसूदन पंढरी नंद यांनी उच्च न्यायालयामध्ये केस दाखल केली आहे. श्री. मधुसूदन पंढरी नंद यांच्याशी माझे आताच एक तासापूर्वी बोलणे झाले. त्यांनी सांगितले की, मी तडजोडीसाठी आणि चर्चेसाठी तयार आहे. आपण 15 दिवसाच्या आत माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात किंवा आपल्या दालनात बैठक घेऊन अकोल्याच्या हवाई पट्टीच्या विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा करणार का ? पुन्हा पुन्हा नियम 93 अन्वये सूचना आणि लक्षवेधी देण्यापेक्षा आपण 15 दिवसात आपल्या दालनात किंवा मंत्री महोदयांच्या दालनात बैठक घ्यावी. या संदर्भात आपण निर्देश द्यावेत.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माझ्या स्तरावर ही बैठक घेण्यात येईल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, त्या ठिकाणी 86.85 हेक्टर जमीन लागणार आहे. त्यातील 32.70 हेक्टर जमीन खाजगी आहे आणि त्याचे 29 खातेदार आहेत. 54.15 हेक्टर जमीन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची आहे.

**उप सभापती** : जो बैठक होगी उस मे सब डिसाईड कर लो.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न मिटलेला आहे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, यामध्ये खाजगी जागा नाही. मंत्री महोदयानी चुकीचे उत्तर दिलेले आहे. डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाने ही जागा ॲक्वायर केलेली आहे. त्यांनी ती जागा परत मागितलेली आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ती जागा खाजगी आहे.

**उप सभापती** : आप 15 दिन मे बैठक ले लीजिए और यह काम पूरा कर लीजिए.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : 15 दिवसात बैठक घेणार का ?

**उप सभापती** : मी याबाबत निदेश दिलेले आहेत.

-----

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी./मु.शी.** : प्रस्तावित सेंट्रल आयलँड एक्स्प्रेस वे याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत इ ाालेल्या निर्णयाची होत असलेली पायमल्ली याबाबत ॲड. आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, भाई गिरकर, चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. उदय सामंत ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, या विषयावर बऱ्याच वेळा या सभागृहामध्ये चर्चा झाली, महानगरपालिकेमध्ये चर्चा झाली तसेच मुख्य सचिवांच्या स्तरावर चर्चा झाली. हा मुंबईसाठी अतिशय आवश्यक आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. सेंट्रल आयलँड एक्स्प्रेस वे चे रिझर्वेशन डी.पी. मध्ये आहे. त्या रोडच्या बाबतीत खरोखर ॲक्विझीशन आणि रुंदीकरण करावयाचे असेल तर हेरिटेज स्ट्रक्चर असलेल्या विल्सन कॉलेजला सुध्दा पार्टली तोडावे लागेल. पुढच्या पारशी अग्यारीलाही तोडावे लागेल. गावदेवी पोलीस स्टेशन सुध्दा जाईल. पण त्यापुढे जुन्या भाडेकरुंच्या सेस बिल्डींगच्या रिपेअरचा, बांधकामाचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. डी.पी.मध्ये हे रिझर्वेशन राहिल्यामुळे गिरगाव चौपाटी ते लालबाग या भागामध्ये कोणाला साधी दुरुस्ती सुध्दा करता येत नाही. त्या ठिकाणी मेट्रो आणि मोनो असे रेल्वेचे दोन मार्ग प्रस्तावित आहेत. त्यामुळे प्रॅक्टीकली हे शक्य नाही. 2009 पासून चर्चा चालू आहे. आता सुध्दा असे उत्तर दिले आहे की, डी.पी.मध्ये याचा अंतर्भाव करण्यात येईल. डी.पी. येण्यासाठी तीन वर्षे लागणार आहेत. त्या अगोदर विल्सन कॉलेजला साधी दुरुस्ती सुध्दा करता येत नाही. कारण डी.पी. मध्ये परमीशन मिळत नाही. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, शासन मुंबई महानगरपालिकेला 154 खाली रुंदी कमी करण्याच्या सूचना देणार का किंवा मुंबई महानगरपालिकेला नियम 37(1) खाली तातडीने प्रस्ताव आणण्याबाबत निर्देश देणार का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, नवीन डी.पी. कलम 26 नुसार दिनांक 4.10.2013 रोजी प्रसिध्द होणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे डी.पी.मध्ये समावेश करण्यासंबंधीची कार्यवाही सुरु आहे. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झालेली आहे, हे देखील खरे आहे. सन्माननीय सदस्यांची मागणी त्यात समाविष्ट नसेल व माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सूचना डी.पी.मध्ये नसल्या तर त्याचा समावेश करुन तेथील लोक बाधित होणार नाहीत याची तजवीज केली जाईल.

ॲड.आशिष शेलार : डी.पी.मध्ये ते 3 वर्षांनी येईल. त्या रस्त्यावरील कोणत्याही इमारतीमध्ये साध्या दुरुस्तीलाही परवानगी मिळत नाही. 3 वर्षांमध्ये एखादी इमारत पडली तर त्याला जबाबदार कोण असेल ? त्यामुळे रुंदी कमी करण्याचा झालेला निर्णय महानगरपालिकेला तातडीने कळवून त्यांना निर्देश दिले जातील काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, रुंदी कमी करण्याचा निर्णय महापालिकेला कळविण्यात येईल आणि डी.पी.सुध्दा लवकरात लवकर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

-------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

**पृ.शी./ मु.शी.** :ठाणे शहराच्या वाहतूक व्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम सुरु होण्यासाठी झालेला विलंब याबाबत सर्वश्री विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, चंद्रकांत पाटील व श्रीमती शोभा फडणवीस वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.उदय सामंत ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 6 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ D/

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ठाणे शहराचा हा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे अधिक प्रश्न विचारण्याची संधी द्यावी अशी मला अपेक्षा आहे. ठाण्यातील मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीमचा हा विषय आहे. (अडथळा)

श्री.गोपीकिसन बाजोरिया (बसून) : आम्हाला आमचा प्रश्न मांडण्यासाठी 15 सेकंदही वेळ मिळत नाही. मी हा प्रश्न अनेकदा मांडलेला आहे. सभागृहात काही विषयांवर एकेक तास चर्चा केली जाते.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांना मी सांगू इच्छितो की, पीठासीन अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत आपण खाली बसून बोलणे बरोबर नाही. ही तुमची चूक आहे. मी कोणत्या प्रश्नाला एक तास वेळ दिलेला आहे ते आपण मला सांगावे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मी आपली माफी मागतो. परंतु सभागृहात अनेक प्रश्नांवर अर्धा अर्धा तास चर्चा केली जाते.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण प्रश्न विचारल्यानंतर मंत्री महोदयांकडून त्याची प्रॉपर उत्तरे मिळत नसतील तर त्याला पीठासीन अधिकारी जबाबदार आहेत काय, आपण 15 दिवसात बैठक घेण्यात येईल का असा प्रश्न विचारल्यानंतर आपल्या समक्ष मी मंत्री महोदयांना 15 दिवसात बैठक घेण्याचे निर्देश दिलेले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ठाण्यातील मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीमचा हा विषय आहे. मूळ विकास योजनेत टाऊन सेंटर या आरक्षणाच्या काही भागावर एमआरटीसचे कारशेड करिता 14.50 हेक्टर इतके आरक्षण प्रस्तावित केले होते. असे असताना शासनाने दि.24.8.2009 रोजी मे.कॅपस्टोन कन्स्ट्रक्शन प्रा.लि.ठाणे या कंपनीला माजिवडे येथील जमिनीवरील प्रस्तावित विशेष नगर वसाहत प्रकल्पास 119.13 एकर क्षेत्राकरिता लोकेशनल क्लिअरन्स दिला. ठाण्याच्या दृष्टीने मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम ही महत्वाची आहे. त्यासाठी कारशेड त्याहून महत्वाची आहे. असे असताना कारशेडने बाधित क्षेत्राबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत सदर क्षेत्राबाबत मे.कॅपस्टोन कन्स्ट्रक्शन,ठाणे यांना जे अधिकार दिले आहेत. त्यातून त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांनी मे.कॅपस्टोन कन्स्ट्रक्शन कंपनीला एक प्रकारे मदत केलेली आहे हे

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सिध्द होते. जनतेच्या हिताच्या मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीममध्ये अडथळा निर्माण केलेला आहे. ठाणे शहरासाठी मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम गरजेची आहे. या कारशेडसाठी असलेले आरक्षण कायम ठेवणार आहे काय ? जनहिताला प्राधान्य न देता 36.25 हेक्टर जागा आरक्षित असताना मास रॅपिड ट्रान्झिट सिस्टीमध्ये अडथळा निर्माण झाल्यामुळे मे.कॅपस्टोन कन्स्ट्रक्शन कंपनीला लोकेशनल क्लिअरन्स देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : ठाणे शहरामध्ये एमआरटीएसकरिता 14.50 हेक्टर जागा आरक्षित ठेवण्यात आली आहे. त्यासंबंधी वारंवार चर्चा झालेली आहे. या प्रकल्पाऐवजी मोनो रेल व मेट्रो रेल असे पर्याय सुचविण्यात आले होते. परंतु ठाणे महानगरपालिकेने स्पष्टपणे सांगितलेले आहे की, 14.50 हेक्टर जागेवर आम्हाला कारशेडच पाहिजे. तशा प्रकारचा महानगरपालिकेने ठरावही मंजूर केलेला आहे. फक्त नियम 37(2) अंतर्गत शासनाकडे महानगरपालिकेकडून कार्यवाहीची मागणी आलेली नाही. ती मागणी प्राप्त झाल्यानंतर त्यावर तत्काळ कार्यवाही केली जाईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

**पृ. शी./मु. शी.** : पोलीस निवासस्थानांची करावयाची दुरुस्ती
याबाबत ॲड. आशिष शेलार,वि.प.स. यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड. आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यात 86,491 पोलीस निवासस्थाने उपलब्ध असून उपलब्ध निवासस्थानांपैकी 20,005 निवासस्थानांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे, अशी माहिती पोलीस महासंचालक कार्यालाने दिलेली आहे. त्यासाठी रु. 300 कोटींची आवश्यकता असल्याचेही या कार्यालयाने कळविले आहे. चालू वित्तीय वर्षात पोलीस विभागाने दुरुस्तीसाठी 75 कोटींची मागणी केली होती. मात्र त्यापैकी रु. 40 कोटींचाच निधी मंजूर करण्यात आला. यापैकी रु. 20 कोटींची तरतूद अर्थसंकल्पात तर उर्वरित रु. 20 कोटींची तरतूद पुरवणी मागण्यांद्वारे केली गेली.

या गतीने शासनाने तरतूद केल्यास किमान पुढील 10 वर्षे तरी पोलिसांच्या निवासी इमारतींची दुरुस्ती होणार नाही. या शिवाय 81,063 पोलीस निवासस्थानांची आवश्यकता असून 8,934 निवासस्थाने राहण्या योग्य नसल्याने त्यांची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे व त्यासाठी रु.9,501 कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे, अशी माहितीही पोलीस महासंचालक कार्यालयाने दिलेली आहे. पोलीस गृहनिर्माण संदर्भातील ही परिस्थिती अत्यंत गंभीर स्वरुपाची असून यासंदर्भात शासनाने तातडीने निवेदन करुन कृती आराखडा सभागृहासमोर मांडावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी आता विशेष उल्लेखाद्वारे मांडलेला मुद्दा मी देखील या सभागृहामध्ये अनेक वेळा मांडलेला आहे. शासनाने अद्यापही पोलिसांच्या निवासस्थानाबद्दल आत्मीयता आणि जिव्हाळा दाखविलेला नाही. कृपया पोलिसांच्या निवासस्थानांची राज्य शासनाने तातडीने दखल घेऊन सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी जो विशेष उल्लेख दिलेला आहे त्या संदर्भात येत्या आठवड्यात निवेदन करावे.

--

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुंबईतील केईएम, शिव आणि वाडिया रुग्णालयात नवजात अर्भक अतिदक्षता विभागात व्हेंटीलेटर्स उपलब्ध करण्याची आवश्यकता याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"मुंबई येथील केईएम, शिव आणि वाडिया या रुग्णालयामध्ये नवजात अर्भक अतिदक्षता विभागामध्ये व्हेटीलेटर्सचा तुटवडा होत असल्यामुळे नवजात बालकांचे जीव धोक्यात आले आहेत. गेल्या दोन वर्षापासून उपकरणे खरेदीच्या फायली महापालिका प्रशासनाच्या मंजुरीविना पडून असल्यामुळे हा तुटवडा निर्माण झाला असल्याचे आढळून आले आहे. दिनांक 13 जून 2013 रोजी एका रिक्षा चालकाच्या पत्नीने दोन जुळया मुलींना जन्म दिला. या दोन मुलींची प्रकृती अतिशय नाजूक होऊन त्यांना व्हेटीलेटरची गरज असल्यामुळे या रिक्षा चालकाने या मुलींना केईम, शीव व वाडिया रुगणालयात नेले असताना या रुग्णालयापैकी कोणत्याही रुग्णालयात व्हेंटीलेटर्स उपलब्ध झाले नसल्यामुळे या जुळया मुलींचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना, यामुळे नागरिकामध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, पालिका व शासकीय रुग्णालयात त्वरित व्हेंटीलेटर्स उपलब्ध करण्याची त्याचप्रमाणे ही उपकरणे खरेदीस दिरंगाई व टाळाटाळ करणा-या संबंधित विभागातील दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, अशा या अतिशय गंभीर व महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

--

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ ST/ D/ 13:40

**पृ. शी./मु. शी.** : बीड जिल्हयातील परळी वैजनाथ येथील स्त्रीभ्रूण हत्या प्रकरणी निलंबित केलल्या पोलीस निरीक्षकाला दिलेली बढती याबाबत श्रीमती विद्या चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडते.

"बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील स्त्रीभ्रूण हत्या प्रकरणी निलंबित करण्यात आलेले पोलीस निरीक्षक रामराव गाडेकर यांची माहे मे 2013 च्या दरम्यान पदोन्नतीवर पोलीस उपअधिक्षक पदी जालना येथे बदली केलेली असणे, राज्यभर गाजलेल्या या स्त्रीभ्रूण हत्येप्रकरणी आरोपी डॉ. सुदाम मुंडे व त्यांची पत्नी सरस्वती मुंडे यांना सहकार्य केल्याचा गुन्हा दाखल असून ते निलंबित असताना अशा पोलीस अधिका-यांना देण्यात आलेल्या बढतीमुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व चिडीची भावना, सदर प्रकरणी शासनाने संबंधित अधिका-याची बदली रद्द करुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे. "

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : मुंबई पोलीस मुख्यालयातील इमारतीत पाणी गळत असल्यामुळे कागदपत्रांचे होणारे नुकसान याबाबत श्रीमती शोभा फडणवीस,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडते.

"मुंबई पोलीस मुख्यालयातील प्रवेशद्वारापाशी असलेल्या चार मजली इमारतीत सायबर गुन्हे शाखा, हरवलेल्या व्यक्तींचा शोध, बालसहायता केंद्र, मालमत्ता कक्ष, गुन्हे शाखेचा प्रशासकीय कारभार अशी महत्वाची ऑफिसेस आहेत. या इमारतीतील सर्व ऑफिस पाणी गळतीमुळे थबथबलेली असणे, गेल्या आठवडाभर सतत पावसामुळे ऑफिसमधील कॉम्प्युटर्स बंद ठेवावे लागणे, पावसाने भिजलेल्या सर्व फाईलचा खच गोलाकार जिन्यावर पडलेला असणे, अशी स्थिती पोलीस मुख्यालयाची असणे, अद्यापही या इमारतीच्या दुरुस्तीचा निर्णय न होणे, त्यामुळे महत्वाच्या कागदपत्रांचे होणारे नुकसान, शॉर्टसर्किटमुळे धोका निर्माण होण्याची कर्मचा-यांची भीती, याकडे शासनाने झालेले दुर्लक्ष, नवीन इमारत बांधकामाची गरज याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी./मु. शी.** : ग्रामीण भागातील 4थी ते 12वीच्या विद्यार्थीनींना मोफत सायकल

वाटण्याची योजना बंद असणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील,
वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"ग्रामीण भागातील 4थी ते 12वी पर्यंतच्या विद्यार्थीनींसाठी एस.सी., एन.टी.व्हीजेएनटी, एस.बी.सी. मुलींना मोफत सायकल वाटप करण्याची शासनाची योजना असणे, सदरहू योजना गेल्या 5 वर्षापासून बंद असल्याने ग्रामीण भागातील लाखो मुलींना या लाभापासून वंचित रहावे लागणे, ग्रामीण भागातील शाळा लोकवस्तीपासून 4 ते 5 कि.मी. अंतरावर असल्याने पायी प्रवास करताना विद्यार्थीनींची दमछाक होणे, सदरहू योजना तातडीने कार्यान्वित करुन ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना व पालकांना दिलासा देण्याची आवश्यकता, त्याकरिता शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.**: पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थानाचा कारभार संभाळणाऱ्या समितीवर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करणेबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

" सभापती महोदय, साडेतीन शक्तीपठापैकी एक पूर्ण पीठ असलेल्या करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदीर, श्रीक्षेत्र जोतिबा यांच्यासह सुमारे साडेतीन हजार मंदीराचा कारभार पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या माध्यमातून पहिला जातो. या समिती मार्फत वार्षिक उत्सव, सण, यात्रा आदि कार्यक्रमाचा कारभार पाहिला जातो. या समितीमध्ये अध्यक्ष, सदस्य, सचिव हे या समितीचे सदस्य असून त्यांची नेमणूक विधी व न्याय खात्याच्या वतीने होते. परंतु गेल्या चार वर्षापासून या समितीला अध्यक्षपदच मिळालेले नाही. या समितीचा कारभार तीन सदस्य व प्रभारी अध्यक्ष असलेले जिल्हाधिकारी यांच्याकडून सुरु असणे, परंतु आता दिनांक 23.7.2013 रोजी या तिघा सदस्यांची मुदत संपलेली आहे. परंतु सद्य:स्थितीत तीन सदस्यांपैकी एका सदस्यांना मुदतवाढ विधी व न्याय विभागाकडून मिळालेली आहे. ही समितीा सध्या एक सदस्य आणि प्रभारी अध्यक्ष यांच्यावर असल्याने पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थानांचा कारभार मात्र आलबेल सुरु असणे, याकरिता या देवस्थानाच्या समितीवर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती तातडीने करण्यात यावी, अशी मी विशेष उल्लेखाव्दारे विनंती करीत आहे."

**उप सभापती** :. मी कोल्हापूर येथे महालक्ष्मीच्या दर्शनासाठी वर्षातून तीन वेळा जातो. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून जी तक्रार केलेली आहे, ती रास्त आहे. त्या समितीमध्ये आता एकच सदस्य असल्यामुळे तेथील कारभार ठप्प झालेला आहे. मागच्या नवरात्रीमध्ये अध्यक्ष नव्हते. जिल्हाधिकाऱ्यांकडे कामाचा व्याप पाहता त्यांच्याकडे समितीचे प्रभारी अध्यक्षपद देणे हे बरोबर नाही. त्या ठिकाणी अनेक पुजाऱ्यांच्या नेमणुका झालेल्या नाहीत.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती....

एवढया मोठया महत्वाच्या महालक्ष्मी मंदिरात अशा प्रकारचा कारभार होत असेल तर ही बाब निश्चितपणे महाराष्ट्राला आणि महाराष्ट्र शासनाला भूषणावह नाही. या ठिकाणी अध्यक्ष व सदस्य नेमले जातील याची आतापर्यंत सर्वांनीच वाट पाहिली. मी शासनास निर्देश देतो की, या ठिकाणच्या समितीवर अध्यक्ष नेमणे, सदस्य नेमणे ही कार्यवाही एका महिन्याच्या आत करावी. या गोष्टीची पूर्तता करण्यासाठी फार वेळ झाला आहे, या बाबतीत अधिक वेळ वाट पाहणे हे योग्य होणार नाही.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आपल्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देईन.

-----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : भिवंडी येथील अक्सा गर्ल्स उर्दू माध्यमिक शाळेतील शिक्षकांची नियुक्ती 1994 ते 2004 या कालावधीत झालेली असून वेतन व पथक कार्यालयातून डी.सी.पी.एस.फॉर्म भरुन देण्यास नकार देण्यात येणे याबाबत ॲड.निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सभापती महोदय, भिवंडी (जि.ठाणे) येथभ्ल अक्सा गर्ल्स् उर्दू प्राथमिक शाळेस सन 2010 मध्ये 100 टक्के अनुदान प्राप्त होणे, तसेच, सदर शाळेतील शिक्षकांची नियुक्ती 1994 ते 2004 या कालावधीत झालेली असून वेतन व पथक कार्यालयातून या शिक्षकांच्या डी.सी.पी.एस.च्या फॉर्मची त्यांनी मागणी केलेली असतानाही वेतन व पथक कार्यालयातून फॉर्म भरुन देण्यास नकार देण्यात येणे, वास्तविक शासकीय नियमानुसार 2005 नंतर नियुक्ती झालेल्या शिक्षकांना डी.सी.पी.एस.चे फॉर्म देणे बंधनकारक असताना सदर शाळेच्या शिक्षकांना डी.सी.पी.एस.चे फॉर्म न दिल्यामुळे त्याच्यावर झालेला अन्याय. तरी या शाळेत झालेल्या शिक्षकांच्या नियुक्त्या 1994 पासून असून जुन्या योजनेप्रमाणे भरुन घेण्यात यावेत व त्यांना न्याय देण्यात यावा एवढीच मागणी हया विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाकडे करीत आहे."

---------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :बोरी, अटगाव, शहापूर, कंचनपूर, बोथा, वाहळा, प्रिप्री-धनगर आदि गावांना भार नियमन मुक्तीचा लाभ न मिळणे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"सभापती महोदय, दिनांक 20 जुलै, 2012 पासून वीज वितरण कंपनीच्या खामगाव उप विभागातील 83 गावांचा गावठाण फिडर सेप्रेशनचा प्रस्ताव मंजूर झाल्याने ही गावे भारनियमन मुक्त झाली आहेत. परंतु खामगाव तालुक्यातील बोरी अडगाव फिडर अंतर्गत येणा-या बोरी, अडगाव, शहापूर, कंचनपूर, बोथा, वाहळा, प्रिप्री-धनगर आदि गावांना भार नियमन मुक्तीचा लाभ अद्याप मिळालेला नाही. खामगाव तालुक्यातील गावठाण सेप्रेशनचे कंत्राट हैद्राबाद येथील एन.पी.सी. कंपनीला देण्यात आले असून या कंपनीने आतापर्यंत वेगवेगळी कारणे सांगून आतापर्यंत कामात चालढकल केली असून कामाची मुदत संपल्याने आजपर्यंत या कंपनीला दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. या एन.पी.सी.कंपनीच्या चुकीमुळे 10गावांतील नागरिकांना अंधारात रहावे लागत आहे. या कंपनीने केलेल्या कामात अनेक त्रुटी असून केलेले कामही निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. गेल्या काही दिवसात फिडर सेप्रेशनसाठी टाकण्यात आलेले खांबही कोसळण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

या कंपनीविरुध्द स्थानिक जनतेमध्ये संतापाचे वातावरण पसरले असून कामात चालढकल करणाऱ्या आणि वेळेवर काम न करणाऱ्या कंपनीला काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव वीज वितरण कंपनीच्या खामगाव उप विभागाकडून मुंबईच्या मुख्य कार्यालयाकडे पाठविला आहे. या कंपनीविरुध्द त्वरित कारवाई करण्याची मी या निमित्ताने मागणी करतो. खामगाव उप विभागाने या कंपनीला काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव पाठविला आहे. त्या प्रस्तावावर आजपर्यंत कारवाई झालेली नाही. सभापती महोदय, आपण शासनाला निर्देश द्यावेत अशी मी विनंती करतो.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या संदर्भात स्थानिक पातळीवरुन मुख्यालयाला अहवाल प्राप्त झाला आहे त्याची मी पूर्ण माहिती घेतो आणि अहवालामध्ये माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माहिती नमूद केली असेल तर निश्चित स्वरुपात कारवाई केली जाईल. त्या भागातील लोकांना विजेचा पुरवठा व्यवस्थित आणि लवकर होण्याच्या दृष्टीने कारवाई केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 10 गावे अनेक दिवसांपासून अंधारात आहेत. त्या गावांना वीज पुरवठा सुरु होण्याच्या दृष्टीने ही कंपनी काम करीत नाही.

श्री.राजेंद्र मुळक : जे इन्फ्रास्ट्रक्चरचे कामकाज आहे त्यामध्ये नवीन फिडर सेप्रेशनचा कार्यक्रम घेण्यात आला आहे. त्या कार्यक्रमांतर्गत ही कंत्राटदार कंपनी काम करीत होती. फिल्डवरील नेमकी माहिती मी घेतो आणि त्या 10 गावांना निश्चित स्वरुपात तातडीने वीज पुरवठा करण्याबाबत कारवाई केली जाईल.

-------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : नातूनगर मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक - 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-4....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, नातूनगर मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी तातडीने निधी देण्याबाबत सभागृहात 3 वेळा आश्वासन दिलेले आहे. केंद्र शासनाच्या एआयबीपी योजनेमधून निधी मिळण्याबाबत अद्याप मंजुरी मिळालेली नाही. परिणामी 95 टक्के पाणी वाया जात आहे. मंत्री महोदयांचा या प्रश्नाबाबत प्रामाणिक हेतू आहे याबद्दल मला शंका नाही. परंतु खालच्या पातळीवर अधिकारी ऐकण्यास तयार नाहीत. ते फाईल पुन्हा खाली पाठवतात. मंत्री महोदयांनी या संदर्भात बैठक बोलावली होती, मी त्या बैठकीला हजर होतो. या कामाच्या निविदा काढल्या आहेत. परंतु निधी वितरित केला जात नाही. 12 कोटी रुपयांचा निधी तातडीने उपलब्ध करुन दिला जाईल काय?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या कामाच्या संदर्भात सी.एफ.ॲडव्हान्स घेण्याबाबतची फाईल नियोजन विभागाला सादर केली होती. नियोजन विभागाने त्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी काढल्या होत्या. त्या त्रुटींची पूर्तता करुन फाईल पुन्हा नियोजन विभागाला सादर केली होती. त्या विभागाने फाईल क्लिअर करुन वित्त विभागाकडे पाठविली आहे. वित्त विभागाकडून फाईल क्लिअर झाल्यानंतर सी.एफ.मधून निधी देण्यात येईल. सी.एफ.ॲडव्हान्स घेतल्यानंतर तातडीने काम केले जाईल. वित्त विभागाचा राज्यमंत्री या नात्याने मी स्वत: या संदर्भात जातीने लक्ष घालीत आहे.

---------

....4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>**

**पृ. शी./मु. शी.** : इयत्ता 11 वी व 12 वीच्या बदललेल्या
अभ्यासक्रमानुसार कनिष्ठ महाविद्यालयीन
शिक्षकांना प्रशिक्षण देण्याबाबत श्री.विक्रम काळे,
वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या वतीने इयत्ता 11 वी व 12 वीच्या अभ्यासक्रमात बदल केला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाच्या वतीने नवीन पुस्तके बाजारात आलेली आहेत. परंतु बदललेल्या अभ्यासक्रमाबाबत कुठल्याही प्रकारचे प्रशिक्षण कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना दिलेले नाही. इयत्ता 11 व 12 वी च्या बदललेल्या अभ्यासक्रमानुसार राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम तालुका व जिल्हा पातळीवर आयोजित करावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

---------

नंतर 2आर.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** :आयटीआयमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होणे याबाबत श्री. अमरसिंह पंडित, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. अमरसिंह पंडित ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

आयटीआय प्रवेशासाठी राज्यभरातून लाखो विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश दाखल करणे, ऑनलाईन प्रवेश अर्जाची एक प्रत विहित शुल्कासहीत नजिकच्या शासकीय आयटीआय मध्ये जमा करणे, दिनांक 17 जुलै, 2013 रोजी तंत्रशिक्षण विभागाने जनरल मेरीट यादी प्रसिध्द करणे, या यादीत अर्ज केलेल्या हजारो विद्यार्थ्यांची नावे वगळल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, आयटीआय प्रवेशाच्या वेळापत्रकात दिनांक 19 जुलै,2013 रोजी पहिली प्रवेश फेरी होणार असल्याचे जाहीर होणे, सदोष संगणक प्रणालीमुळे पहिली प्रवेश फेरी रद्द होणे, ग्रामीण भागातील विशेषत: खेडी,वाडी, वस्तीवरील विद्यार्थी आणि पालकांना आयटीआय प्रवेशासाठी भर पावसात शासकीय आयटीआय मध्ये हेलपाटे मारावे लागणे,शासकीय आयटीआय मधून विद्यार्थी व पालकांना समर्पक उत्तर अथवा मार्गदर्शन न मिळणे, यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रमाचे व संशयाचे वातावरण निर्माण होणे, आयटीआयची प्रवेश प्रक्रिया सुरळीत करुन विद्यार्थ्यांना न्याय मिळावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : पुणे-बेंगलोर महामार्गाचे रुंदीकरण करतांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पावसाळी वाहिन्या न टाकणे याबाबत श्री.मोहन जोशी,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

पुणे-बेंगलोर महामार्गाचे रुंदीकरण करतांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पावसाळी वाहिन्या टाकण्यात न येणे, उक्त महामार्गाच्या दोन्ही बाजूस टेकडया आहेत. या टेकडयावरुन मोठया प्रमाणात पाणी रस्त्यावर येते, रस्ता रुंदीकरणापूर्वी पाणी निचरा होण्यासाठी जागा होती मात्र नव्याने रुंदीकरण सुरु असतांना या जागांवर भराव टाकण्यात आल्याने पाणी साठण्याची शक्यता असणाऱ्या बऱ्याच ठिकाणी पूर येण्याची शक्यता निर्माण होणे, पावसाळी वाहिनीसाठी महापालिकेकडून गेली सहा महिने पाठपुरावा केला जात आहे. परंतु प्राधिकरणाकडून कोणतीच दाद दिली जात नसल्याने टेकडयांवरील येणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या निचऱ्यासाठी सक्षम व्यवस्था न केल्याने शिंदेवाडीमध्ये झालेल्या प्रकाराची पुन्हा पुनरावृत्ती होण्याची शक्यता असल्याने याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे, यासाठी मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून ही बाब निदर्शनास आणून देत आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी**. :आयसीटी हा विषय शिकवण्यासाठी आवश्यक कॉम्प्युटर लॅब व इतर सुविधा उपलब्ध नसणे याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"विद्यार्थ्यांना माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्राची माहिती व्हावी या उद्देशाने राज्यभरातील शाळांमध्ये गेल्या वर्षी नववीच्या तर यावर्षी दहावीच्या अभ्यासक्रमात "आयसीटी" हा विषय सुरु केला गेला, मात्र हा विषय शिकवण्यासाठी आवश्यक असलेली कंप्युटर लॅब आणि सुविधा राज्यातील सुमारे 40 टक्के शाळांमध्ये उपलब्ध नसल्याने या अभ्यासक्रगमाचाच बोजवारा उडालेला आहे. "आयसीटी"या अभ्याक्रामाची 50 गुणांची परीक्षा आहे. यातील 40 गुण् लेखी तर 10 गुण अंतर्गत मूल्यमापनाचे आहे. हा विषय शिकवण्यासाठी शाळांमध्ये कॉम्प्युटर आणि इंटरनेट असायला हवे. ग्रामीण भागातील बहुतांश शाळांमध्येच एकच कॉम्प्युटर उपलब्ध असल्याने साठ विद्यार्थ्यांची एक तुकडी एकवेळी लॅबमध्ये बसून कॉम्प्युटरचे शिक्षण घेत आहे. चांगल्या क्षमतेची लॅब शाळांमध्ये असणे अपेक्षित असल्याने कॉम्प्युटर खरेदीसाठी निधी कोठून आणणार असा प्रश्न शाळांना पडला आहे. माहिती आणि तंत्रज्ञान सुविधांच्या नावाखाली खासगी शाळा पालकांकडून पैसे उकळत आहे. ग्रामीण भागात वीज नसल्याने तास होत नाहीत. या विषयासाठी राज्यातील सर्व शाळांमध्ये सुविधा उपलब्ध नसल्याने "आयसीटी"या अभ्यासक्रमाचा बोजवारा उडाल्याने जनमानसात असंतोष आहे. "आयसीटी" या विषयासाठी राज्यातील सर्व शाळांमध्ये सुविधा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

----

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी**. : महाविद्यालयीन निवडणुकीवर घातलेली बंदी मागे घेणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्य शासनाने 1994 पासून राज्यातील महाविद्यालयात विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकींवर बंदी घातली आहे. ही बंदी उठवून निवडणुका घ्याव्यात अशी विद्यार्थ्यांनी शासनाकडे वेळोवेळी मागणी केली आहे. परंतु अद्यापपर्यंत ही बंदी उठविण्यात आलेली नाही. निवडणुका होत नसल्यामुळे विद्यार्थी संघटना तसेच विद्यार्थी चळवळ नष्ट होत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. महाविद्यालयीन प्रशासनाचा हस्तक्षेप वाढल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा वाचा फुटत नाही. तसेच विद्यार्थ्यांना बऱ्याच सोयीसुविधा मिळत नाही. विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फुटत नाही. विद्यार्थ्यांची स्वायत्त संघटना नसल्यामुळे प्रशासनावर अंकुश नाही. अशाप्रकारच्या निवडणुकांमधून राज्याला चांगले तरुण नेतृत्व मिळण्याची शक्यता असल्यामुळे विद्यार्थी प्रतिनिधींची निवडणूक होणे आवश्यक आहे आणि विद्यार्थ्यांकडून देखील निवडणुकीसाठी मागणी होत आहे. तेव्हा महाविद्यालयीन निवडणूक व्हावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखद्वारे शासनास करीत आहे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

**पृ. शी./मु. शी.**: दुष्काळात फळबागा जगविण्याच्या हेक्टरी 30 हजारांच्या पॅकेजपासून नाशिक जिल्ह्यातील शेतकरी वंचित राहणे याबाबत श्री.हेमंत टकले,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

दुष्काळामध्ये फळबागा जगविण्याच्या हेक्टरी 30 हजाराच्या पॅकेजमधून नाशिक जिल्ह्यातील शेतकरी वंचित राहिले आहेत. हेक्टरी 15 हजारांचा पहिला हप्ता देण्याऐवजी अधिकाऱ्यांनी चुकीवर पांघरुण घालण्यासाठी सहा हजार रुपयांपासून दहा हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले आहे. प्रशासनाने सर्वेक्षण करुन वस्तुस्थितीदर्शक क्षेत्र न कळविल्यामुळे कळवण, बागलाण, मालेगाव व देवळा या हॉर्टीकल्चर बेल्टमधील डाळींब उत्पादकांना 27 कोटी रुपयांची झळ बसली आहे. कृषी विभागाच्या गलथानपणामुळे या पॅकेजमध्ये शेतकऱ्यांच्या तोंडाचा घास हिरावला गेला आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना मिळणाऱ्या मदतीची रक्कम कर्जापोटी कापू नये या शासनाच्या धोरणाला हरताळ फासून पॅकेजमध्ये देण्यात आलेल्या रकमा बँकांनी कापून घेतल्या आहेत. या भागातील शेतकऱ्यांना शासकीय निकषाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या हेक्टरी पंधरा हजाराच्या पहिल्या हप्त्यातील फरकाची रक्कम देण्यात यावी. तसेच कृषी विभागाने शासनाला कळविलेली लाभार्थ्यांची संख्या, क्षेत्र, प्रत्यक्षात उपलब्ध अनुदान आणि लाभार्थ्यांना दिलेले अनुदान याची सखोल चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**उप सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मी एका महत्वाच्या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधीत आहे. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये हाय-ॲलर्ट जाहीर करण्यात आले आहे. मी वरळी येथे राहते. वांद्रे-वरळी सी-लिंक वरुन आमच्यासारखे सामान्य लोक तसेच अनेक मान्यवर ये-जा करीत असतात. मागील काही महिन्यांपासून या सी-लिंकवर रात्री दहा नंतर काही मोटारस्वार धूम स्टाईलने मोटार सायकलवर कसरती करुन अतिवेगाने मोटार सायकल चालवित आहेत. हा प्रकार रात्रीच्या वेळी सुरु असतो रात्रीच्यावेळी या मार्गावरुन सर्वसामान्यांना तसेच विमानतळावरुन येणाऱ्या लोकांना त्याचा उपद्रव होत आहे. या संदर्भात अनेकांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी केलेल्या आहेत. सी-लिंकवर टोल असल्यामुळे तेथे वाहनांना प्रवेश मिळत नाही. असे असताना देखील सी-लिंकवर रात्रीच्या वेळी 25-30 मोटारसायकल स्वार कसरती करीत असतात.

सभापती महोदय, आपणास कल्पना आहे की, कालच विधानसभेतील पाच आमदारांचे निलंबन मागे घेण्यात आले. त्यावरुनही बरीच उत्तरे दिली जात आहेत. सी-लिंकवर उपद्रव देणाऱ्या मोटार सायकलस्वारांवर आता पर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई का करण्यात आली नाही ? हे युवक कोठून येत आहेत. त्यांचे संपूर्ण वर्तन संशयास्पद आहे. ते स्थानिक रहिवाशी आहेत किंवा नाहीत याबद्दल देखील शंका आहे. तेव्हा या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करावी. तसेच शनिवार आणि रविवार या दिवशी त्यांचा चालणारा धुमाकूळ थांबावावा यासाठी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्य शासनाने कुपोषण कमी केल्याबद्दल आणि अन्य कारणांमुळे सार्वजनिक आरोग्य विभागाला चार नॅशनल ॲवार्डस मिळाली. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. हे अभिनंदन करताना एक दु:खद बातमी सांगतो की, परवाच कु.प्रिया किरकिरा या कुपोषित मुलीचा मृत्यू झाला. या मुलीचे वजन 4.05 किलो होते. ती अकरा महिन्याची होती. तिला न्यूमोनिया झाला होता. मोखाडा रुग्णालयात तिच्यावर उपचार सुरु होते. मोखाडा रुग्णालयात तिच्यावर उपचार होऊ शकत नाही म्हणून तिला जव्हार रुग्णालयात आणण्यात येत होते आणि त्या दरम्यान तिचा मृत्यू झाला.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

ऑफिशियली त्या तालुक्यामध्ये 33 मुले कुपोषित आहेत. परंतु खरा आकडा 237 आहे. त्यामुळे राज्य सरकारचे अभिनंदन करीत असताना, ज्या कुपोषित बालिकेचा मृत्यू झाला आहे तिला न्याय देण्यात येईल की नाही, हा प्रश्न मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

काल सकाळी नाशिक येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात भारतीय जनता पार्टीने आयोजित केलेल्या निदर्शनाच्या वेळी वृत्तांकनासाठी आलेल्या पत्रकारांवर वाहन पार्किंगच्या वादातून हल्ला करण्यात येणे, पत्रकारांना शिवीगाळ करुन कॅमेरा हिसकावत बेदम मारहाण करण्यात येणे, पत्रकारांशी झटापटी केल्यामुळे स्थानिक वाहिनीच्या पत्रकाराचा कॅमेरा चोरीला जाणे, तर अन्य दोन पत्रकारांच्या कॅमेऱ्याचे नुकसान होणे, सदर घटनेबाबत पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवून घेण्यात पोलिसांनी टाळाटाळ करणे, आरोपींना अद्यापही अटक झालेली नसणे, पत्रकारांवरील हल्ल्यांबाबत शासनाने तत्काळ दखल घेऊन आरोपींना कडक शासन करावे आणि पत्रकारांच्या नुकसानीची भरपाई द्यावी, तसेच माननीय गृह मंत्र्यांनी यामध्ये तातडीने लक्ष घालावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करीत आहे.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेख</u>**

(पुढे सुरु.....)

**पृ.शी./मु.शी.** : शालेय शिक्षण विभागांतर्गत अस्तित्वात असलेले अधिनियम, शाळा संहिता व अन्य संबंधित नियमावलीच्या तरतुदीत सुधारणा करण्याबाबत श्री. नागो पुंडलिक गाणार वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.नागो पुंडलिक गाणार ( नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

शालेय शिक्षण विभागांतर्गत आज रोजी अस्तित्वात असलेले अधिनियम, शाळा संहिता व अन्य संबंधित नियमावलीच्या तरतुदी कालबाह्य झालेल्या असणे, त्यामध्ये योग्य त्या सुधारणा करणे अत्यावश्यक असणे, तसेच माध्यमिक शाळा संहितेस कायद्याचे वैधानिक स्वरुप देणे, या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयाने सुध्दा शासनास वेळोवेळी निर्देशित करणे, त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद व अन्य शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी वारंवार मागणी करणे, तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम-2009 अस्तित्वात आल्यानंतर शिक्षण विभागांतर्गत अस्तित्वात असलेले सर्व कायदे निरस्त होणे, त्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागांतर्गत प्रचलित अधिनियम, नियमावली, शाळा संहिता यामध्ये सुधारणा करण्यासाठी दिनांक 7 सप्टेंबर, 2011 रोजी शासन निर्णय निर्गमित करुन मान्यवरांची एक समिती स्थापन करणे, या समितीने बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम-2009 च्या तरतुदींना अनुलक्षून नवीन एकच कायदा कसा असावा याचे प्रारुप शासनास तीन महिन्यात सादर करण्याचे बंधन असणे, या बंधनाचे पालन समितीने न करणे, त्यामुळे शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेली कायदेशीर विसंगती व घटनात्मक विकृती, या प्रकरणी शासनाने तत्काळ दखल घेण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

-------

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : यवतमाळ जिल्ह्यातील नांदगव्हाण धरण फुटल्याने धावंडा नदीच्या पुरात बाधित झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन न होणे, याबाबत सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सचिन अहिर : (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-1सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, दिनांक 9 जुलै, 2005 रोजी यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस नगरपरिषदेच्या मालकीचे धरण फुटून धावंडा नदीच्या पुरात 952 कुटुंबांचे घरापासून सर्व सामान वाहून गेल्याची घटना घडली. या घटनेमुळे 952 कुटुंबे बाधित झाली आहेत. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न दि.9 जुलै, 2005 पासून अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने 819.315 लाख रुपये दिग्रस नगर परिषदेला उपलब्ध करुन दिले आहेत. ही घटना घडून 8 वर्षांचा कार्यकाळ झालेला असताना अद्यापपर्यंत एकही घरकुल तयार झालेले नाही. या निमित्ताने माझा एकच प्रश्न आहे की, बाधित झालेल्या 962 कुटुंबांना घरकूल देण्यासाठी किंवा त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी अजून किती वर्षे लागतील ?

श्री.सचिन अहिर : महोदय, बाधित 952 कुटुंबांपैकी 300 कुटुंबांनी स्पष्टपणे सांगितले की, आम्हाला पुढील काळात महापुराचा धोका नाही. त्यामुळे आम्हाला इतरत्र घरे नको. त्यामुळे ती कुटुंबे इतरत्र स्थलांतरित होण्यास तयार नाहीत. 952 पैकी 400 कुटुंबांनी स्थलांतरित होण्यास सहमती दर्शविलेली आहे. मार्च-2014 पर्यंत घरे बांधून 400 बाधित कुटुंबांना ती घरे उपलब्ध करुन देण्यात येतील. या व्यतिरिक्त त्यातील अन्य बाधितांनी घरांची मागणी केली तर त्यांना पुढच्या टप्प्यात म्हणजेच 2015 पर्यंत घरे देण्याचा शासनाचा निश्चितपणे प्रयत्न राहील.

---------

नंतर श्री.बरवड....

विउ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.10 ते 3.00 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली )

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ 15:00

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**पृ.शी.**: शासनाच्या भूमिकेमुळे सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत राज्यातील कोट्यवधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम

**मु.शी.**: शासनाच्या भूमिकेमुळे सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत राज्यातील कोट्यवधी जनतेमध्ये निर्माण झालेला संभ्रम, या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम जयंत प्र. पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम □ऱ्हे, डॉ.रणजीत पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....)

**उप सभापती** : आता आपण शासकीय विधेयकापूर्वी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करीत आहोत.

श्री. जयंत प्र. पाटील : उप सभापती महोदय, ही चर्चा कशी घ्यायची यासंबंधीचा निर्णय मी स्वत: घेईन असे काल माननीय सभापतींनी सांगितले होते.

**उप सभापती** : त्यांची तब्येत बरी नाही म्हणून त्यांनी मला पाठविलेले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : उप सभापती महोदय, या चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी मला दोन मिनिटे बोलायचे आहे.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते व या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेणा-या सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, या प्रस्तावातील मुख्य विषय राज्यातील सिंचनाच्या विविध घोटाळयासंबंधी चौकशी करण्याकरिता श्री. चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात येणा-या समितीची स्थापना, कमिशन ऑफ इन्क्वायरी कायद्यांतर्गत करणे व समितीची कार्यकक्षा वाढविणे असा आहे. माननीय उच्च न्यायालयाने या प्रकरणात अंतरिम आदेश दिलेले असून राज्य शासनाने शासन ठराव दिनांक 31 डिसेंबर 2012 अन्वये गठीत केलेल्या या स्पेशल इन्क्वायरी समितीमध्ये दोन किंवा तीन सदस्यांचा समावेश करावा व या समितीमध्ये काही जास्त टर्म्स आणि

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती...**

रेफरन्सचा समावेश करावा असा अभिप्राय व्यक्त करुन महाअभिवक्ता महाराष्ट्र राज्य यांनी माननीय राज्यपालांची या संदर्भातील प्रतिक्रिया जाणून घ्यावी असे सुचविले आहे. सदर बाब न्यायनिर्णय प्रक्रियेमध्ये असल्यामुळे चर्चेच्या दरम्यान कोणत्याही परिस्थितीत उच्च न्यायालय तसेच राज्यपाल महोदयांच्या कार्यकक्षेबाबत सभागृहात चर्चा होता कामा नये याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

श्री. जयंत प्र. पाटील : उप सभापती महोदय, मी काल या ठिकाणी बोलत असताना माननीय सभापतींनी मला अडवले. भारतीय संविधानाचा आधार घेऊन मी माझे विचार या ठिकाणी व्यक्त करीत आहे.

संविधानाच्या अनुच्छेद 211 मधील "विधानमंडळातील चर्चेवर निर्बंध" यामध्ये "सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाने आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत राज्याच्या विधानमंडळात कोणतीही चर्चा करता येणार नाही." असे नमूद केलेले आहे. म्हणजे कोणती चर्चा करता येणार नाही ? न्यायाधीशांच्या वर्तणुकीबाबत त्यांच्यावर कोणताही व्यक्तिगत आक्षेप घेता येणार नाही. अनुच्छेद 212 मध्ये "न्यायालयांनी विधानमंडळाच्या कामकाजाबाबत चौकशी करावयाची नाही" यासंबंधी देखील संविधानामध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे न्यायालयातील प्रकरणाबाबत आणि निर्णयावर या ठिकाणी चर्चा करता येते . मात्र न्यायाधीशांवर कोणतीही व्यक्तिगत टीका करता येत नाही. सभापती महोदय, आपण या ठिकाणी नियम 260 अन्वये चर्चा करीत आहोत. संविधानामध्ये किंवा नियमात अन्यथा तरतूद करण्यात आलेली असेल त्याखेरीज लोकांच्या सर्वसाधारण हिताच्या बाबीसंबंधी सभापतींच्या संमतीने आणलेल्या प्रस्तावावरील चर्चेव्यतिरिक्त कोणतीही चर्चा करता येणार नाही. आम्ही माननीय सभापतींकडे प्रस्ताव दिला. तो सभापतींनी मान्य केला आणि त्यावर आम्ही या ठिकाणी चर्चा करीत आहोत. संविधानाच्या अनुच्छेद 211प्रमाणे कोणत्याही विषयावर विधानसभेत व विधानपरिषदेत चर्चा करता येते असा उल्लेख आहे. या राज्याच्या विधानसभेत किंवा विधानपरिषदेत सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यायधीशाने आपली कर्तव्ये पार पाडताना केलेल्या वर्तणुकीबाबत राज्याच्या विधिमंडळात चर्चा करता येणार नाही असा यामध्ये उल्लेख आहे. याचाच अर्थ विधानसभेत आणि विधानपरिषदेत अन्य कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास निर्बंध

..3..



MSS/ 15:00

श्री. जयंत प्र. पाटील...

घातलेले नाहीत.

श्री. किरीट सोमय्या यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केलेली आहे. ती याचिका मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे व त्यांच्या कुटुंबीयांनी जमविलेल्या अवैध संपत्ती बाबत असून त्याची चौकशी करावी अशी मागणी केलेली आहे.

.....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

वरील प्रलंबित याचिकेत शासनातर्फे ॲडव्होकेट जनरल बाजू मांडत आहेत. या याचिकेची सुनावणी..(अडथळा) सभापती महोदय, मी घटनेला धरुन बोलतो आहे. मी आक्षेपार्ह असे काहीही बोललेलो नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. मी या ठिकाणी राज्य घटनेतील तरतुदी वाचून दाखवित आहे. या सभागृहात राज्य घटनेतील तरतुदी वाचून दाखववावयाच्या नाहीत काय ? काल पासून सभागृहात काय चालले आहे ? राज्य घटनेत कोणत्या तरतुदी आहेत, त्या आम्ही वाचून दाखववावयाच्या नाहीत काय ? आम्हाला घटनेने काय अधिकार दिलेले आहेत याची देखील माहिती सांगावयाची नाही काय ?

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.06 ते 3.21 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>स्थगितीनंतर</u>**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने जी बाब न्यायप्रविष्ठ आहे किंवा इतर ज्या बाबी आहेत त्या विषयाबाबत आमचे म्हणणे वेगळे आहे. ते सभागृहापुढे मांडावयाचे झाले तर सिंचन विभागातील अनेक घोटाळे आम्हाला उजेडात आणायचे आहेत ते मुद्दे उपस्थित करता येणार नाहीत. म्हणून आम्ही चर्चेला सुरुवात करण्याचा आग्रह धरीत आहोत.

सोमवार, दिनांक 29 जुलै, 2013 रोजी या संदर्भात विशेष चर्चा घेण्यात यावी अशी माझी सूचना आहे. आज सकाळी प्रश्नोत्तराच्या निमित्ताने बाब न्यायप्रविष्ठ आहे असे मंत्री महोदय म्हणत असताना त्यावर चर्चा झाली. प्रत्येक प्रश्नाबाबत गणित वेगळे आहे. एकदा redefine करण्यात यावे. सोमवारी दोन किंवा तीन तास या एकाच मुद्याबाबत चर्चा घेण्यात यावी. त्यावेळी ॲडव्होकेट जनरल यांना सभागृहापुढे पाचारण करण्यात यावे. एकदा या संदर्भात धोरण निश्चित झाले पाहिजे. बाब न्यायप्रविष्ठ आहे की नाही, त्या संदर्भात आम्हाला मत मांडण्याचा अधिकार आहे आणि तो अधिकार आम्ही राखून ठेवतो आणि या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करण्यात यावी अशी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो विषय मांडला आहे त्या विषयापुरते म्हणजे बाब न्यायप्रविष्ठ असल्याबाबतचा उल्लेख न करणे आणि माननीय राज्यपालांचा उल्लेख टाळणे. या सभागृहात एखादे प्रकरण न्यायालयात दाखल असल्यानंतर आम्हाला तो विषय या सभागृहात उपस्थित करता येतो की करता येत नाही या संदर्भात आम्ही चर्चा करीत आहोत. संविधानाने आम्हाला जो अधिकार दिलेला आहे तो कितपत योग्य आहे, कोणते अधिकार वापरायचे हे स्पष्ट करण्याबाबत घटनेमध्ये तरतूद केलेली आहे. त्या तरतुदीप्रमाणे या सदनापुढे ॲडव्होकेट जनरल यांना बोलावण्यात यावे. आमचे जे काही मत आहे ते आम्ही सभागृहासमोर मांडू, त्यावर त्यांनी आम्हाला मार्गदर्शन करावे. घटनात्मक तरतूद आहे. आपला त्यामध्ये संबंध येत नाही, कारण आपण विधिज्ञ नाही. नि:पक्ष पध्दतीने या सदनापुढे घटनात्मक बाबी लक्षात घेऊन सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी मुद्दा मांडला आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

कोणत्या न्यायालयाच्या संदर्भात काय बोलता येते, काय बोलता येत नाही हे एकदा स्पष्ट झाले पाहिजे. भविष्यात हा प्रश्न निर्माण होणार नाही यादृष्टीने ॲडव्होकेट जनरल यांना याच अधिवेशन काळात योग्य वेळ राखून ठेवून सदनामध्ये बोलावण्यात यावे. यापूर्वी काही प्रकरणात मत जाणून घेण्यासाठी ॲडव्होकेट जनरल यांना सदनापुढे बोलावण्यात आलेले आहे. त्यांच्या उपस्थितीत आम्ही आमचे प्रश्न उपस्थित करु. जे काही प्रश्न आहेत ते लेखी स्वरुपात हवे असतील तर लिहून देऊ. त्यानुसार त्यांनी सभागृहापुढे मतप्रदर्शन द्यावे. त्यांच्या मतप्रदर्शनामुळे कायमस्वरुपी सदनाला मार्गदर्शन होईल.

सभापती महोदय, माझ्याकडे उच्च न्यायालयाची स्पिकिंग ऑर्डर आहे. माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्या विभागातील अधिकाऱ्यांची सीआयडी मार्फत चौकशी करण्यात यावी आणि दोन महिन्यात न्यायालयाला अहवाल सादर करावा असे उच्च न्यायालयाने आदेशात म्हटले आहे. गहाळ झालेल्या दस्तऐवजाच्या संदर्भात उच्च न्यायालयाने काल हा आदेश दिलेला आहे. यावर सभागृहात चर्चा करायची की नाही? उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दोन महिन्यात चौकशी करुन अहवाल सादर करायचा आहे. घटनेमध्ये जी तरतूद आहे, नियमात जी तरतूद आहे. त्या तरतुदीचा वापर करुन तुम्ही आम्ही कायदेशीर काय करु शकतो हे एकदा स्पष्ट झाले पाहिजे. आम्ही कायदेतज्ज्ञ नाही. या सदनाला कायमस्वरुपी मार्गदर्शन होण्याकरिता ॲडव्होकेट जनरल यांना या सदनापुढे पाचारण करण्यात यावे.

नंतर 2वाय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, कामकाज पत्रिकेत सिंचनाच्या संदर्भात 260 चा प्रस्ताव आणून काल परवा पासून सभागृहात गदारोळ घातला जात आहे. विरोधी पक्षाने सिंचनाच्या संदर्भातील चांगला विषय या ठिकाणी उपस्थित केला असून या विषयावर आम्हाला सुध्दा आमचे मत मांडावयाचे आहे. सिंचनाच्या संदर्भात आरोप प्रत्यारोप होत आहेत परंतु सिचंनाच्या संदर्भात सत्य परिस्थिती काय आहे ती जनतेसमोर यावी यासाठी सभागृहात यासंदर्भात सविस्तर चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे. परंतु ज्या ज्या वेळी विरोधी पक्ष फक्त न्यायालय आणि न्यायालयाच्या बाबीवरच मुद्दा उपस्थित करीत आहे. सिंचनाच्या संदर्भात जे कोणी न्यायालयात गेले आहेत त्याबाबत न्यायालय योग्यवेळी योग्य निर्णय देईल आणि ती बाब जनतेसमोर येईल. परंतु अधिवेशनाच्या काळामध्ये सिंचनावर आपल्याला जे काही मुद्दे मांडावयाचे आहेत तसेच आम्हालाही सिंचनावरील सत्य परिस्थिती मांडावयाची आहे. सिंचनाच्या संदर्भात आम्ही जी सत्य माहिती देऊ ती सुध्दा आपल्याला पटेल. खरे म्हणजे या सभागृहातील सिंचनाच्या संदर्भातील चर्चा जनतेसमोर जाणे गरजेची आहे. परंतु ज्या ज्यावेळी आपण टेक्निकल गोष्टीवर बोलण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी न्यायालयाचा, आरोपाचा मुद्दा काढला जातो. परंतु मी म्हणेन की, सिंचनाबाबत जे आरोप करण्यात आलेले आहे ते आरोप चुकीचे कसे आहेत याबाबतीत आम्हालाही विचार मांडावयाचे आहे. या विषयावर जेव्हा चर्चा सुरु होईल त्यावेळेस आम्हीही आरोपाचे खंडन करु.

आपण सिंचनाच्या संदर्भात जी काही फिगर अँड फक्ट्स दिलेली आहे ती चुकीची कशी आहे व आम्ही मांडलेली फिगर अँड फॅक्ट सत्य कशी आहे हे आपल्याला आम्ही पटवून देऊ, नव्हे तर ती आपल्याला या सदनातही पटेल. परंतु (अडथळा) सभापती महोदय, दुष्काळामध्ये पाण्याची परिस्थिती वाईट असतांना विरोधी पक्षाला सिंचनाच्या संदर्भात अजिबात गांभीर्य वाटत नाही. जनतेच्या दृष्टीने महत्वाचे प्रश्न या ठिकाणी मांडावेत असे विरोधी पक्षाला वाटत नाही. विरोधी पक्षाला सिंचनाची खरी फिगर अँड फॅक्टस् जनतेसमोर जावी हे वाटत नाही. सिंचनाच्या संदर्भात 1970 पासून काय काय झालेले आहे त्याचा सर्व पुरावा देण्यासाठी आम्ही तयार आहोत. परंतु विरोधी पक्ष आम्हाला आमची बाजू मांडू देत नाही. सिंचनासारखा चांगल्या विषयावर नियम 260 प्रस्ताव आणल्याबद्दल मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे सुरुवातीलाच आभार मानले आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर

सभापती महोदय, विरोधी पक्ष सिंचनाच्या संदर्भात त्यांची बाजू मांडतील व आम्ही आमची बाजू मांडू. विधिमंडळाच्या माध्यमातून सिंचनाच्या संदर्भातील सच्चाई जनतेसमोर गेली पाहिजे, जनतेला खरे आणि खोटयाचा फरक कळला पाहिजे यासाठीच आज आपण सिंचनाच्या विषयावर या न्याय मंदिरात चर्चा करणार आहोत. सिंचनाच्या संदर्भात आम्ही ज्या ज्यावेळी चर्चा करण्यास सुरुवात करतो त्या त्यावेळी विरोधी पक्ष न्यायालयाचे काही तरी कारण काढतात. (अडथळा) आम्हाला या विषयावर चर्चा हवी आहे परंतु विरोधी पक्षाला ही चर्चा नको आहे असे वातावरण या सभागृहातील आहे. विरोधी पक्षाला या विषयाच्या संदर्भात गोंधळ घालावयाचा आहे. विरोधी पक्षाला सिंचनाच्या संदभातील सत्यता सभागृहासमोर येऊ द्यावयाची नाही हाच त्यांचा एकमेव कार्यक्रम दिसतो आहे. विरोधी पक्षाला सिंचनाच्या संदर्भात जनतेची दिशाभूल करावयाची आहे. सिंचनाच्यासंदर्भात जी काही वस्तुस्थिती आहे ती जनतेसमोर जाऊ नये यासाठी आम्हाला थांबवण्याचा प्रयत्न होत आहे. मी सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांना विनंती करु इच्छितो की, जलसंपदा विभागाच्या संदर्भात श्वेतपत्रिकेमध्ये जे काही पॉईंटस् आहेत त्यामध्ये आतापर्यंत किती क्षेत्र सिंचनाखाली आले आहे त्याची माहिती देण्यात आलेली आहे. सिंचनाच्या सदंर्भातील सर्व गोष्टी जनतेसमोर गेल्या पाहिजेत यासाठी या विषयावर चर्चा करण्यासाठी जास्तीत जास्त वेळ दिला जावा व इतर जे 260 चे प्रस्ताव आहेत ते बाजूला ठेवून सिंचनाच्या 260 च्या प्रस्तावावर योग्य रीतीने चर्चा व्हावी, जेणेकरुन सिंचनाच्या संदर्भात खरे काय आणि खोटे काय आहे हे जनतेसमोर जावे. सिंचनाच्या संदर्भात आम्ही आमची बाजू मांडत असतांना आमचा मुख्य उद्देश काय आहे तो मला मांडू दिला जात नाही. त्यामुळे सिंचनाच्या संदर्भात विरोधी पक्षाचे इन्टेशंन काय आहे ते समजून येते. विरोधी पक्षाची आयडीया आणि इन्टेंशन वेगळे आहे. त्यामुळे माझी सदनापुढे एवढीच मागणी आहे की, सिंचनाच्या संदर्भात या सभागृहात चांगल्या वातावरणात चर्चा घडून यावी एवढीच आहे.

**उप सभापती** : सिंचनाच्यासंदर्भात निकोप वातावरणात चर्चा व्हावी यासंदर्भात दोन्ही बाजूने कृपया दक्षता घ्यावी व आता सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सिंचनाच्या संदर्भातील चर्चा सुरु करावी.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी जो मुद्दा उपस्थित केला होता त्याचे काय .....

(सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील संविधानाचे पुस्तक हातात घेऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती** : आता सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना या विषयाच्या संदर्भात काही बोलावयाचे आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : माझा यावर आक्षेप आहे.

**उप सभापती** :सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो तपासून घेऊन त्यावर उत्तर दिले जाईल. आता विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी अशी मी त्यांना विनंती करतो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, यावर बोलण्यासाठी आपण मला अनुमती दिली पाहिजे.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेला सुरूवात करावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्यासह आम्ही म्हटले होते की, आमचा आजचा चर्चेवरील फोकस हा सिंचनामध्ये झालेला भ्रष्टाचार, चितळे समिती, श्वेतपत्रिका आहे. त्यावर आम्हाला चर्चा घडवायची आहे. काल बोलताना मी न्यायालय आणि माननीय राज्यपालांसंबंधीचा उल्लेख केला. तो उल्लेख वगळता बाकी न्यायालयाने जे अंतिम निर्णय दिलेले आहेत त्यासंबंधी उल्लेख करण्यास कोणतीही अडचण नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : हे माननीय सभापती महोदयांनी सांगितले पाहिजे.

.... (अडथळा) .....

श्री.विनोद तावडे : मी आपणास सांगतो ना. मला माननीय सभापतींनी बोलण्याचे थांबविले आहे काय ? सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांच्या भावना मी ओळखू शकतो. न्यायालयीन बाबी चर्चा करता येते किंवा नाही यासंबंधी आपल्याला स्वतंत्र चर्चा घडवून आणता येऊ शकेल. त्यासाठी आपण अधिवक्त्यांना बोलावू शकतो. हे आपल्याला कधीना कधी रिडिफाईन करावे लागणार आहे. आज दिवसभरात आपण दोन न्यायालयीन बाबीवर चर्चा केली, तर दोन न्यायालयीन बाबीवर चर्चा केली नाही. त्यामुळे हे आपण रिडिफाईन केले पाहिजे. त्यासंबंधी आपण सर्वांनी एकत्रितपणे ठरविले पाहिजे.

आम्ही म.वि.प.नियम 260 अन्वये प्रस्ताव दिला आहे. चितळे समितीला जे अधिकार प्राप्त झाले पाहिजेत ते होत नाहीत असा वारंवार आग्रह आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांकडे धरला आहे. इन्क्वायरी ऑफ कमिशन ॲक्ट खाली ही चौकशी आणली पाहिजे असा आमचा आग्रह आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांच्या भाषणात मला व्यत्यय आणावयाचा नाही. मी आपले लक्ष महाराष्ट्र विधान परिषद नियम 34 (2) (एक) कडे वेधत आहे. यात नमूद केले आहे की, "भारताच्या कोणत्याही भागात अधिकारिता असलेल्या न्यायालयाच्या अभिनिर्णयाधीन असेल अशा कोणत्याही बाबींचा उल्लेख करता कामा नये." हा नियम अगदी स्पष्ट आहे. असे असताना त्यासंबंधीचा प्रस्ताव आणणे नियमाला धरून नाही. ज्या गोष्टीसंबंधी न्यायालयात केसेस सुरू आहेत, सिंचनासंबंधी केसेस सुरू आहेत, अशा विषयाची चर्चा लावणे व करणे हे नियमाला धरून नाही हे परत एकदा आपल्या लक्षात आणून देतो. अशा विषयावर चर्चा करावयाची काय,यासंबंधी आपण निदेश द्यावेत. यावर चर्चा करू नये असे माझे स्पष्ट मत आहे. नियमातच ते नमूद केले आहे. त्यामुळेच त्या विषयाच्या अनुषंगाने एका शब्दाचीही चर्चा करू नये असे मला सांगावयाचे आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम पुस्तिकेतील नियम 34 "चर्चेवरील मर्यादा" या नियमातील नियम (2) (एक) येथे वाचून दाखविला. त्या नियमामध्ये नमूद केले आहे की, "भारताच्या कोणत्याही भागात अधिकारिता असलेल्या न्यायालयाच्या अभिनिर्णयाधीन असेल अशा कोणत्याही बाबींचा उल्ल्ेख करता कामा नये."

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, याच नियमातील 34 (चार) मध्ये असे म्हटले आहे की, "भारत सरकारहून विभिन्न आहे असे मानून राष्ट्रपतींच्या आचरणावर किंवा राज्य सरकारकडून विभिन्न आहे असे मानून कोणत्याही राज्यपालांच्या आचरणावर ठपका ठेवता कामा नये ." माननीय राज्यपालांनी काय केले पाहिजे या संदर्भात देखील चर्चा करता येणार नाही. तेव्हा या प्रस्तावावर चर्चा होऊ शकत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण या ठिकाणी नियम वाचून दाखविला. आपण न्यायालयाच्या कोणत्याही कामकाजामध्ये हस्तक्षेप करु शकत नाही हे आपणा सर्वांना माहीत आहे. ही बाब आपल्याला नवीन नाही. सिंचना संदर्भात तीन जनहित याचिका दाखल झालेल्या आहेत. एक नागपूर विभागामध्ये जनहित याचिका दाखल झालेली आहे. मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झालेली आहे आणि ते आपणा सर्वांना माहीत आहे. न्यायालय हा आमचा विषयच नाही. या ठिकाणी जो विषय ठेवण्यात आला आहे त्या संदर्भात न्यायालयाच्या कामकाजात कोणताही हस्तक्षेप होईल असे आम्हाला बोलायचे नाही. यापूर्वी येथे अनेक वेळा न्याय प्रविष्ठ बाबींवर चर्चा झालेली आहे. आज सकाळी माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी सांगितले की, "ही बाब न्याय प्रविष्ठ आहे." बाब न्याय प्रविष्ठ असली तरी आपण त्यावर चर्चा केली नाही असे आतापर्यंत झालेले नाही. फक्त न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे किंवा न्यायालयाच्या कामकाजामध्ये व्यत्यय येईल, न्यायालयाच्या निर्णयावर परिणाम होईल अशाप्रकारचे कोणतेही स्टेटमेंट करता येणार नाही. परंतु आम्हाला न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयावर काही बोलायचे नाही. आपण या संदर्भात दिलेला निर्णय पुढे कायम स्वरुपी राहणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, शिवसेना पक्षाचे गट नेते सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे या ठिक्‍ाणी ॲडव्होकेट जनरल यांना सोमवारी बोलवावे तोपर्यंत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा. आम्हाला देखील त्यांना प्रश्न विचारता येतील. ॲडव्होकेट जनरल जो निर्णय देतील त्याचा आपणास भविष्यात देखील उपयोग होणार आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

आपण आज यावर घाईघाईने कोणताही निर्णय देऊ नये, अशी माझी विनंती आहे. त्यामुळे आज या प्रस्तावावरील चर्चा थांबवून ती सोमवारी घ्यावी, अशी मी विनंती करतो. या प्रकरणी ॲडव्होकेट जनरल जो निर्णय देतील त्या नुसार सभागृहाचे कामकाज चालवावे.

**उप सभापती** : सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांनी विधानपरिषद नियम-34 मधील कलम-2 (1) चा संदर्भ दिला आहे आणि तो अत्यंत योग्य आहे. त्या संदर्भानुसार ही चर्चा निकोप वातावरणात होणार नाही असे मला वाटते. म्हणून मी नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा थांबवित आहे.

श्री.विनोद तावडे : महोदय, आज या प्रस्तावावरील चर्चा थांबविल्यानंतर, या चर्चेचे पुढे काय होणार आहे ?

**उप सभापती** : या बाबत मी माननीय सभापतींशी चर्चा करतो.

(विरोधी पक्षाचे काही सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या संदर्भाच्या अनुषंगाने मी माझा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे मी दिलेल्या निर्णयावर आता चर्चा करता कामा नये. मी पुन्हा एकदा निदर्शनास आणून देतो की, मी या प्रस्तावावरील चर्चा थांबविलेली आहे.

(विरोधी पक्षाचे काही सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक अर्ध्या तासासाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.41 वाजता अर्ध्या तासासाठी स्थगित करण्यात आली.)

-----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 30 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 4.11 वाजता 30 मिनिटांसाठी स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक एक तास स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 4.41 वाजता 1 तासासाठी स्थगित झाली. )

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या शुक्रवार, दिनांक 26 जुलै 2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 41 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 26 जुलै 2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही